कुरआनची महानता



The Qur'an
An Abiding Wonder

- मराठी अनुवाद
ज्योती आफळे

मौलाना वहीदुद्दीन खान



NON-VIOLENCE AND PEACE-BUILDING

IN ISLAM



For other details please contact:
www.goodwordbooks.com

ही पुस्तिका खालील पत्त्यावर मिळेल.

अब्दुस समद खलिल अहेमद

१०५०, रविवार पेठ, पुणे – ४११००२

फोन नं. : 020 24472830 मोबा. नं.: 9665059035

कुरआनची महानता

The Qur'an
An Abiding Wonder

- मराठी अनुवाद
ज्योती आफळे

-मौलाना वहीदुद्दीन खान-

प्रस्तावना

या संग्रहामध्ये- कुरआनच्या दोन पैलूंची संक्षिप्त चर्चा करण्यात आली आहे. पहिला, त्याचे अस्तित्व हाच कुरआन हा ईश्वरी ग्रंथ असण्याचा पुरावा आहे आणि दुसरा इसवी सनाच्या सातव्या शतकात ज्याप्रमाणे अरबी प्रेषित मुहम्मद यांच्यावर त्याचे जसे प्रकटीकरण झाले, त्याप्रमाणे त्याच्या मूळ स्वरुपाचे जतन!

कुरआनपूर्वी श्रध्दावंतांसाठी ईश्वराकडून अनेकवेळा ग्रंथांचे प्रकटीकरण करण्यात आले होते आणि श्रध्दावंतांनीही ते निष्ठेने लिहून ठेवले होते. या सर्व पार्श्वभूमीवर पवित्र इस्लामिक ग्रंथ पूर्वीच्या ग्रंथांपेक्षा विशेष वेगळा ठरतो. केवळ कुरआन परिपूर्ण आहे आणि ईश्वराकडून प्रकटीकरण झालेले इतर ग्रंथ अपूर्ण आहेत असे म्हणता येणार नाही. पवित्र ग्रंथाची या प्रकारे वर्गवारी करणे प्रेषितांमध्येच वर्गवारी करण्यासारखे होईल. मग कुरआन आणि इतर ग्रंथांमध्ये फरक काय? तो एकच की, कुरआनच्या मूळ मजकुरात कधीही हस्तक्षेप करण्यात आलेला नाही. याउलट इतर ग्रंथांचे स्वरुप आणि मजकूर यांत फार वर्षांपूर्वी हस्तक्षेप करण्यात आला. मूळ स्वरुपाचे आणि रचनेचे जतन हेच कुरआनचे महात्म्य आहे. ईश्वराचे मार्गदर्शन आणि पापमुक्तीचे असाधारण साधन म्हणून त्यापूर्वीच्या ग्रंथांपासून ते वेगळे आहे, ज्याची सप्रमाणता अंतिम दिवसापर्यंत अस्तित्वात राहील. कुरआनचे जतन हे लक्षणीय कौशल्याचे आणि समर्पणाचे त्याचप्रमाणे कष्टाचे काम होते. त्यापूर्वीच्या ग्रंथांचे मूळ स्वरुप आणि रचना अस्तित्वात राहिली नाही. या पार्श्वभूमीवर कुरआन जतन करण्याच्या कार्याचे महत्त्व उमगते. केवळ कुरआन हाच जतन करण्यात आलेला धर्मग्रंथ म्हणून सुरक्षित राहिला आहे. या चराचर सृष्टीवर ईश्वराची सत्ता आहे. त्याने या ऐहिक जगात माणसाला पूर्ण स्वातंत्र्य दिले, मात्र ते केवळ त्याची कसोटी घेण्यासाठी. या स्वातंत्र्यामुळेच पूर्वीच्या धर्मग्रंथांमध्ये माणसाने फेरबदल केले. अगदी त्याचा नाशही केला. माणसाने त्याला प्राप्त झालेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग केला. अखेर माणसासाठी कृपा म्हणून ईश्वराने कुरआनच्या माध्यमातून आपले अंतिम मार्गदर्शन भावी पिढ्यांसाठी पाठवले. त्याचबरोबर त्यांनी ते जतन करावे यासाठी योजनाही आखल्या. अशाप्रकारे ईश्वराचे प्रेषित आणि त्यांचे सहकारी अपराध्यांविरोधात दीर्घकाळ लढण्यात आणि जगाच्या इतिहासात नव्या जगाची स्थापना करण्यात यशस्वी झाले. जुन्या जगाच्या जागी नव्या जगाची स्थापना करण्यातही ते यशस्वी झाले. या नव्या जगाचे सत्याशी अतूट नाते असल्याने त्यातून कोणताही धोका न पत्करता कुरआनच्या चिरकालीन जतनाची हमी मिळते.

- वहीदुद्दीन खान

❊ भाग पहिला ❊
कुरआनचा युक्तिवाद

प्रकरण १

कुरआनः ईश्वराचा ग्रंथ-

प्रेषित मुहम्मद यांनी जेव्हा दावा केला की, कुरआन हा मानवाच्या मार्गदर्शनासाठी ईश्वराने त्यांच्यावर प्रकट केलेला ग्रंथ आहे, तेव्हा त्यांच्यावर विश्वास न ठेवणारे अनेक होते. त्यांच्यासाठी हा पवित्र धर्मग्रंथ ही ईश्वराची रचना असण्याऐवजी मानवी होती. मग कुरआनने या संशय घेणा-यांना आव्हान दिले की, त्यांचे म्हणणे खरे असेल तर त्यांनी " यासारखा धर्मग्रंथ " निर्माण करावा. (५२:३४) याशिवाय कुराआनने स्पष्ट शब्दात हेही घोषित केले, की सगळ्या मानवजातीने आणि जिन्न यांनी त्यासारखा ग्रंथ निर्माण करण्याचे सामुहिक आणि निकराचे प्रयत्न केले तरी त्यात त्यांना अपयश येईल. (१७:८८)

कुरआन शाश्वत ग्रंथ असल्याने पृथ्वीवरच्या प्रत्येक मानवासाठी निवाड्याच्या दिवसापर्यंत सततचे आव्हान आहे. आता प्रश्न असा आहे की या पवित्र ग्रंथाची काय वैशिष्ट्ये आहेत, ज्यामुळे त्यासारखा ग्रंथ निर्माण करणे अशक्य बनले आहे. कुरआनात त्याच्या अद्वितीयतेचे अनेक पैलू आहेत, त्यापैकी एक म्हणजे सुसंगती. "कुराअनसंबंधी सखोल विचार करत नाहीत का? तो अल्लाहकडून प्रकट झाला नसता तर त्यांना त्यात अनेक विरोधाभास जाणवले असते."(४:८२) प्राध्यापक अरबेरी यांनी 'इख्तेलाफ' या अरेबिक शब्दाचे भाषांतर ' विसंगती ' असे केले आहे. ग्रंथामध्ये विरोधाभास, विषमता आणि भेद असा अर्थ देण्यात आला आहे. संपूर्ण सुसंगती हा अतिशय दुर्मिळ गुण असून, ते ईश्वराचे असाधारण गुणवैशिष्ट्य आहे. त्यामुळे ज्यात विरोधाभास नाही असा ग्रंथ लिहिणे कुठल्याही माणसाच्या कुवतीबाहेरचे आहे. एखादी रचना अगदी निर्दोष होण्यासाठी तिच्या निर्मात्याचे सृष्टीतील ज्यात भूतकाळ आणि भविष्यकाळ सामावला जाईल, अशा ज्ञानावर प्रभुत्व असले पाहिजे. त्यातून प्रत्येक गोष्टीचा विचार हा झालाच पाहिजे आणि त्याचे अत्यावश्यक स्वरुप समजून घेण्याच्या त्याच्या पद्धतीवर संशयाची सावली नसावी. त्याचप्रमाणे त्याचे ज्ञान थेट परिचयाच्या पायावर उभे असावे. ते इतरांकडून अप्रत्यक्षपणे मिळवलेल्या माहितीवर आधारित नसावे. त्याच्याकडे आणखी एक असाधारण गुण असावा. कुठल्याही गोष्टीबद्दल मनात पूर्वग्रह नसावा. वास्तव जसे आहे तसे पाहण्याची क्षमता त्याच्याकडे असली पाहिजे. हे सगळे असाधारण गुण ईश्वराकडे असू शकतात. या कारणाने, त्याचेच बोल

शाश्वतासाठी सगळ्या विसंगतीपासून मुक्त राहतील. याउलट, माणसाने केलेल्या कामाला नेहमी अपरिपूर्णतेचा शाप असतो. कारण तो स्वतःच अपरिपूर्ण आहे. विरोधाभास नसलेला मजकूर लिहिणे हे काम त्याच्या आवाक्यातले नाही.

मानवी युक्तिवादातील विरोधाभास -

माणसाचे काम विरोधाभासांनी भरलेले असणे हा योगायोग नाही. मानवी मेंदूच्या कार्यावर जन्मजात मर्यादा असल्याने ते अटळ आहे. निर्मितीचे स्वरूप असे असते की ते फक्त त्याच्या निर्मात्याचा विचार स्वीकारते. त्याच्या विचारसरणीशी सुसंगत नसलेल्या कुठल्याही तत्त्वाला या विश्वात जागा नाही. ते स्वतःलाच खोडून काढेल. कारण या विश्वापासून ते फार वेगळे असेल. त्यातून निसर्गाच्या नियमांचे पालन होत नसल्याने ते विसंगत असेल. या कारणामुळे माणसाच्या कल्पनेतील कुठल्याही सिद्धांतामध्ये बौध्दिक विसंगती दिसून येते. उदाहरणे घेऊन आपण हा मुद्दा स्पष्ट करु.

डार्विनवाद -

चार्लस डार्विन (१८०९ - १८८२) आणि त्याच्यानंतरच्या वैज्ञानिकांनी सजीव सृष्टीच्या निरीक्षणातून उत्क्रांतीचा सिद्धांत मांडला. पृथ्वीवर आढळणारी सजीवांची अनेक रुपे बाहेरुन एकमेकांपासून वेगळी असल्याचे त्यांना दिसले. तरीही, जैविकदृष्ट्या त्यांच्यात लक्षात येण्याजोगे साम्य होते. उदाहरणार्थ. मागच्या दोन पायांवर उभ्या असलेल्या घोड्याचा आकार मानवी सांगाड्यासारखा होता. या निरीक्षणावरुन त्यांनी असा निष्कर्ष काढला की, माणूस ही वेगळी प्रजाती नसून इतर प्राण्यांसारखाच तो साधारण गुणसूत्रांपासून निर्माण झालेला आहे. बौध्दिक विकासाच्या एकापाठोपाठ येणा-या टप्प्यांमधला महान उत्क्रांतीचा प्रवास सगळ्या संजीवांचा समावेश करणारा होता. सरपटणारे प्राणी, चार पायांचे प्राणी आणि माकडे उत्क्रांतीच्या सुरुवातीच्या अवस्थेत होते. तर माणूस प्रगत अवस्थेत होता. सुमारे शंभर वर्षे माणसाच्या विचारांवर या सिद्धांताचा प्रभाव होता. पण यात अनेक उणिवा असल्याचे पुढच्या संशोधनात उघड झाले. हे निर्मितीच्या चौकटीनुसार नव्हते. संपूर्ण सृष्टीची एक सुव्यवस्था आहे. या सिद्धांतामध्ये या सुव्यवस्थेसंदर्भात मूलभूत मतभेद होते. उदाहरणार्थ, पृथ्वीच्या वयाचा प्रश्न. वैज्ञानिक हिशेबानुसार पृथ्वी दोन अब्ज वर्षांची असल्याचे मानले जाते.

डार्विनच्या कल्पनेतून उतरलेली डार्विनची प्रक्रिया प्रत्यक्षात येण्यासाठी हा कालावधी लहान आहे. शास्त्रीयदृष्ट्या हे सिध्द झालेले आहे की प्रथिन रेणूचे फक्त एक संयुग उत्क्रांत होण्यासाठी लक्षावधी वर्षांपेक्षा जास्त काळ लागला असावा. सध्या पृथ्वीवर जैवविविधतेचे किमान लाखभर वेगवेगळे नमुने अस्तित्वात आहेत. तर दोन लाखांहून जास्त पूर्ण विकसित झालेल्या वनस्पतींच्या प्रजाती आहेत. फक्त दोन अब्ज वर्षात हे सगळे कसे विकसित झाले असतील? तेवढ्या कालावधीत उत्क्रांतीच्या टप्प्यात खालच्या पातळीवर असणारा एखादा प्राणीही विकसित होऊ शकला नसेल. अगणित उत्क्रांतीचे टप्पे पार केल्याने माणसासारखे प्रगत सजीव स्वरुप साकार झाले असावे. प्राध्यापक पॅटो या गणित्तज्ज्ञाने उत्क्रांतीच्या सिद्धांतामध्ये गृहित धरलेल्या जैविक बदलांविषयी काही अंदाज व्यक्त केले आहेत. त्याच्या मते कुठल्याही प्रजातीत किरकोळ बदल घडून येण्यासाठी हा दहा लाख पिढ्यांचा काळ गेला असेल.

उदाहरणार्थ, कुत्र्यापासून घोडा बनण्यासाठी किती प्रदीर्घ कालावधी लोटला असेल याची कल्पना यावरून येईल. या गुंतागुतींच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत समाविष्ट असलेला बदल घडून येण्यासाठी फारच मोठा कालावधी लागला असावा. माणसाचे या जगातले आयुष्यमान विचारात घेतल्यावर या कालावधीची व्याप्ती लक्षात येते. फ्रेड हॉयल आपल्या द इंटेलेक्चुअल युनिव्हर्स या ग्रंथात म्हणतात. "वेगवेगळया मार्गांचा वापर करुन स्वानुभवातून शिकण्याच्या पद्धतीने (ट्रायल अँड एर्र मेथड) जनुकीय माहिती किती कमालीच्या मंद गतीने जमा होते हे एका साध्या उदाहरणावरुन पाहू. आपण अगदी रुढ अर्थाने एक शक्यता गृहीत धरु. डीएनए आराखड्याच्या एका छोट्या तुकड्यावर विशिष्ट प्रथीन सांकेतिक भाषेत लिहिले आहे. समजा डीएनएच्या दुपेडी सर्पाकृतीत त्यासाठी फक्त दहा रासायनिक साखळ्या वापरल्या आहेत. या दहाही साखळ्या योग्य क्रमाने नसतील तर त्या प्रथिनाचे कार्य चालणार नाही. सुरुवातीला या सगळ्या साखळ्यांचा क्रम चुकीचा आहे असे मानू. अनेक स्वैर चुका पार करुन सगळ्या साखळ्या आणि ते प्रथीन योग्य स्थितीत येण्याआधी साखळ्यांच्या आवृत्ती काढण्याच्या किती पिढ्या लोटल्या असतील? डीएनए साखळ्यांच्या चुकीच्या आवृत्ती निघण्याचे प्रमाण लक्षात घेऊन याच्या उत्तराचा अंदाज लावता येईल. प्रयोगातून हा आकडा स्थापित झालेला आहे.

"चुकीच्या आवृत्ती काढतकाढत दहाही साखळ्यांचा योग्य क्रम मिळवण्यासाठी त्या डीएनएला त्या प्रजातीच्या सर्रास दहा कोटी सदस्यांमध्ये

स्वतःचे पुनरुत्पादन करावे लागेल. हे सदस्य पुन्हा पुनरुत्पादन करणारे असतील. या गतीने आवश्यक ती फेरमांडणी असणारा एक जरी सदस्य निर्माण व्हायचा असेल तर त्यासाठी दहा लाख पिढया जाव्या लागतील. समजा हे शक्यतेच्या मर्यादेत बसेल असे वाटले तर मग एखादे प्रथिन जास्त किचकट असेल आणि त्यासाठी डीएनएच्या दहाऐवजी वीस साखळ्या लागत असतील तर काय घडेल याचा विचार करा. तर मग एक लाख कोटी पिढ्या जाव्या लागतील. शंभर साखळ्या लागत असतील (बरेचदा असेच असते)तर मग पिढ्यांची संख्या अशक्य कोटीने जास्त असेल. कारण हे साधण्यासाठी पुनर्स्थापनेचा वेग जेवढा असावा लागतो तेवढा कुठल्याही सजीवात आढळत नाही. म्हणजे नव डार्विनवादाचा सिद्धांत पुराव्यानिशी कुचकमी ठरला आहे. उत्क्रांतीच्या ओघात गुणसत्रांमध्ये किंचित बदल शक्य असू शकेल, पण विशिष्ट लांबीच्या आणि विशिष्ट क्रमाच्या डीएनएच्या साखळ्यांची उत्क्रांती उघडपणे अशक्य आहे." (पृष्ठ ११०)

हॅायलने पूर्वीच सांगीतल्यानुसार, काही झाले तरी, डीएनए सांकेतिक साखळी यांच्या स्थानांची अदलाबदल नुकसानकारक असते, कारण त्यामुळे वैश्विक जनुकीय माहीतीत सुधारणा होण्याऐवजी तिचा नाश होण्याची शक्यता असते.

ही समस्या सोडवण्यासाठी, पॅनस्पर्मिया सिद्धांत हा आणखी एक सिद्धांत मांडला गेला. जीवनाचा उगम बाहेरच्या अवकाशात झाला असे त्यासंदर्भात गृहित धरले गेले. तिथून ते पृथ्वीवर आले. पण या सिद्धांताने नव्या समस्यांना जन्म दिला. जीवन विकसित होण्यासाठी अनुकूल परिस्थिती असणारा ग्रह असणे आवश्यक आहे. या संपूर्ण विश्वात एक पृथ्वी सोडली तर, अशी परिस्थिती कुठे आहे ते अजून तरी कुणाला कळलेले नाही. त्यानंतर बुध्दिवंताच्या एक गटाने 'उद्‌भवलेली उत्क्रांती' या सिध्दांताचा पुरस्कार केला. या सिद्धांतानुसार जीवन - किंवा त्याची निरनिराळी रुपे - एकाऐकी अस्तित्वात आली. पण हा सिद्धांत पोकळ आहे. कोणत्याही बाह्य बलाच्या हस्तक्षेपाशिवाय जीवन असे एकाऐकी अस्तित्वात येणे कसे शक्य आहे? त्यामुळे आपण जिथून सुरुवात केली तिथे परत आलो आहोत. तो मुद्दा म्हणजे बाह्य बल किंवा निर्माता यामुळे इतर सगळे सिद्धांत निष्प्रभ ठरले आहेत.

वस्तुस्थिती अशी आहे की, निर्मात्याला गृहित धरल्याशिवाय जीवनाचे सबळ स्पष्टिकरण देता येत नाही. दुसरा कुठलाही सिद्धांत विश्वाच्या आकृतीबंधांशी अजिबात जुळत नाही. जीवनाच्या स्वभावाशी विसंगत असल्याने, इतर सिद्धांतांना भक्कम मूळ धरण्यात अपयश आले

आहे. निरनिराळ्या क्षेत्रातल्या प्रमुख बुध्दिवंतांनी एनसायक्लोपीडिया ऑफ इग्नरन्स (अजाणतेपणाचा विश्वकोश) या ग्रंथाचे योगदान हे योग्य मानले होते, हे विशेष महत्वाचे आहे. हा ग्रंथ लंडनमध्ये प्रकाशित झाला होता. त्याच्या परिचयात म्हटले आहेः 'या ग्रंथात साठ सुप्रसिद्ध वैज्ञानिकांनी संशोधनाच्या वेगवेगळया क्षेत्रांचा आढावा घेऊन विश्वाबद्दलच्या आपल्या ज्ञानात कशा लक्षणीय उणीवा आहेत हे दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे'

या कामातून प्रत्यक्षात या वस्तुस्थितीला शिक्षणक्षेत्राची पोच मिळते,की विश्वाच्या निर्मात्याने त्याची रचना अशी केली आहे, ज्याचे स्पष्टीकरण कोणत्याही यांत्रिक विवेचनातून देणे शक्य नाही. उदाहरणार्थ, जॉन मेनार्ड स्मिथ यांनी लिहीले आहे, 'उत्क्रांतीचा सिद्धांत त्याच्या मांडणीतच समाविष्ट असलेल्या काही समस्यांनी ग्रासलेला आहे. या समस्यांचे काही उत्तर दिसत नाही. कारण आपल्याला सिद्धांताचे बोट धरुन चालावेच लागते. पण भक्कम पुरावा असल्याशिवाय आपण आपल्या सिद्धातांना पुष्टी देऊ शकत नाही.

कुरआननुसार, मानव आणि जीवनाची इतर सर्व रुपे ईश्वराने निर्माण केली आहेत. याउलट उत्क्रांतीचा सिद्धांत सांगतो की, ते एका आंधळ्या यांत्रिक प्रक्रियेतून निर्माण झाले आहेत. कुरआननुसार आकलन स्वतःचे स्पष्टीकरण देते, कारण ईश्वर त्याच्या इच्छेला येईल ते करु शकतो. कोणत्याही भौतिक साधनसंपत्तीविना तो त्याच्या इच्छेला येईल ते निर्माण करु शकतो. उत्क्रांतीच्या सिद्धांताचे असे नाही. कुठलीही घटना घडण्यासाठी काहीतरी कारण असले पाहिजे अशी त्याची मागणी आहे. अशी कारणे सापडू शकत नाहीत. त्यामुळे उत्क्रांतीचा सिद्धांत स्पष्टीकरणाशिवाय राहीला आहे. आपण म्हणू शकतो की तो बौध्दिक पोकळीत हरवला आहे; परंतु कुरआनने देऊ केलेल्या जीवनाच्या स्पष्टीकरणाविषयी असे म्हणणे शक्य नाही.

राजनैतिक तत्त्वज्ञानाचेही असेच आहे. एनसायक्लोपीडिया ब्रिटानिकाच्या १९८४ च्या आवृत्तीनुसार : राजनैतिक तत्त्वज्ञान आणि राजनैतिक संघर्ष मूलतः कुणाची सत्ता कुणावर असावी यातून उद्‌भवलेले आहेत. (१४/६९७). पाच हजार वर्षांपासून नामांकित विचारवंत या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी कठोर परिश्रम घेत आहेत. पण अजूनही ते पाया उभा करु शकले नाहीत, ज्यावर तर्कसंगत राजनैतिक तत्त्वज्ञान मांडता येईल. स्पीनोझाने याला 'वैज्ञानिक पाया' ही संकल्पना वापरली आहे.

एकूणच, राजनैतिक विचाराच्या बाराहून अधिक विचारधारा आहेत. त्यांचे दोन मुख्य वर्ग पडतात. बेबंदशाही आणि लोकशाही. बेबंदशाहीला तीव्र

हरकत घेतली गेली. याचे कारण म्हणजे एका किंवा अनेक देशांच्या संपूर्ण लोकशाहीवर एकाच व्यक्तीने जुलूमशाही का करावी याचा सबळ तर्क मिळू शकलेला नाही. याउलट लोकशाहीला मात्र फार मोठा लोकप्रिय आधार मिळू शकला. तरीही ती राजनैतिक किंवा व्यावहारिक समस्यांचा बिनतोड तोडगा देऊ शकली नाही. लोकशाही या शब्दाचे मूळ ग्रीक भाषेत मिळते. लोकांकडून चालवले गेलेले राज्य असा याचा शब्दशः अर्थ होतो. हा संकेत म्हणजे सगळ्या रोगांवरचा रामबाण इलाज असल्याचे मोठ्या प्रमाणात मानले गेले. पण कोणत्याही देशांत संपूर्ण जनतेचे राज्य स्थापित करणे अशक्य असल्याचे सिद्ध झाले आहे. सगळ्यांनीच शासन चालवायचे असेल तर त्याच वेळेस - त्यांना कोण शासित करणार? त्यांच्यावर कुणाचे शासन चालणार? एकाच वेळेस सगळ्यांना सत्ता मिळत नसेल तर सगळ्या लोकांचे प्रशासन स्थापन तरी कसे होणार? यासाठी अनेक निरनिराळे सिद्धांत मांडले गेले. त्यापैकी रॉसच्या सिद्धांताला सगळ्यात जास्त मान्यता मिळाली. प्रशासन कुणाचे असावे ते सर्वसाधारण इच्छेनुसार ठरवावे असे त्यात म्हटले गेले. जनमत घेऊन ते ठरवायचे होते. पण ही फार वेळखाऊ आणि अकार्यक्षम प्रक्रिया असल्याने, त्यातून होणा-या खर्चावर न बोललेलेच बरे. लोकांकडून चालवले गेलेले प्रशासन परिणामी निवडून आलेल्या मूठभर लोकांकडून चालवले गेलेले प्रशासन बनले. लोक त्यांच्या इच्छेनुसार मतदान करायला मोकळे असू शकतील, पण त्यानी निवडून दिल्यानंतर, पुन्हा एकदा त्यांच्यावर निवडलेल्या गटाचे राज्य लादले जाते. जगभरातले लोकशाहीतून निवडून आलेले राज्यात आता पूर्वीप्रमाणेच एकाधिकारशहाची भूमिका वठवताना दिसतात.

स्वातंत्र्याचा संकेत परंपरेने लोकशाहीशी जोडला गेला आहे. पण इथेही, एक राजनैतिक व्यवस्था म्हणून लोकांना एखाद्या उघड जुलमी राजवटीपेक्षा जास्त स्वातंत्र्य दिले गेले नाही. सगळ्यांना जन्माने समानता, समान हक्क मिळाले असून ते स्वतंत्र आहेत. या विश्वासाच्या पायावर संपूर्ण लोकशाही उभी आहे. तरीही, त्या पाठोपाठ येणारे वास्तव रॉसने सोशल कॉंट्रॅक्ट या त्याच्या ग्रंथात पहिल्याच वाक्यात व्यक्त केले आहे. ’माणूस जन्माने स्वतंत्र होता, पण नंतर सगळीकडे तो बेड्यांमध्ये अडकला. इथेही माणसाचा मूळ स्वभाव विचारात घेतला पाहिजे. तो सामाजिक प्राणी आहे. मनाला येईल तसे जगण्याचे स्वातंत्र्य असणारे या जगातले स्वतंत्र अस्तित्व म्हणून जगण्याऐवजी, तो या समाज्याच्या गोतावळ्याचा अविभाज्य घटक म्हणून जगतो. दुस-या एका तत्त्वज्ञाची मजल असे म्हणण्यापर्यंत जाते,

"माणूस जन्माने स्वतंत्र नाही तर त्याच्यावर बंधने लादणा-या समाजात त्याचा जन्म होतो."

लोकशाही ही बेबंदशाहीतली खूप मोठ्या प्रमाणातली सुधारणा तर आहेच, पण मर्यादित व्यक्तीस्वातंत्र्य आणि सामाजिक असमानता या समस्यांची उत्तरे त्यातून आपोआप मिळत नाहीत. नेहमी, लोकशाहीच्या नावाखाली निवडून आलेल्यांच्या अल्पलोकसत्ताक पद्धतीकडून एखाद्या घराण्याची एकाधिकारशाही लोकशाहीत घुसडली जाते. त्यामुळे आपण सत्तेच्या संघर्षातले निव्वळ एक प्यादे आहोत ही लोकांच्या मनातली भावना हटत नाही. अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात जनतेने प्रशासनातल्या एकाधिकारशाही व्यवस्थांविरुद्ध उठाव केला होता. पण सम्राटशाही राजवटीच्या जोखडातून मोकळे झाल्यावर तिला स्वतःला 'जनतेचे प्रतिनिधी' म्हणवणा-या गटाच्या राजवटीपुढे नाइलाजाने मान झुकवावी लागली. त्यामुळे आपण, 'ईश्वराचे पृथ्वीवरचे प्रतिनिधी' असल्याचा दावा करणा-या जुन्या एकाधिकारशहांच्या राजवटीतल्या जीवनासारखेच जनतेचे आयुष्य बनले. त्यात फार सुधारणा झाल्यासारखे वाटत नाही.

सगळे राजनैतिक तत्त्वज्ञ अशा स्वरुपाच्या विरोधी प्रवाहात सापडलेले आहेत आणि त्यातून सुटका होण्याचा मार्ग दिसत नाही. अगदी तथाकथित जनतेच्या 'प्रतिनिधित्वावर' देखील प्रश्न उपस्थित होतात. इथे ब्रिटिश सनातन्यांचे उदाहरण घेता येईल. एके वर्षी त्यांनी फसवा विजय मिळवला होता. एकंदरित एकशे चव्वेचाळीस जागा जिंकून ते बहुमतात आले होते. परंतु सनातन्यांचा मतांचा हक्क मात्र १९७९ सालापासून घसरत चालला होता. (त्या वर्षी तो ४३ टक्के इतका होता). म्हणजेच जागा विचारात घेतल्या तर या सनातन्यांनी बहुमत मिळवले होते, पण मते विचारात घेतली तर ते फक्त ४३ टक्के मते मिळवू शकले होते.

याला ख-या अर्थाने जनतेचे प्रतिनिधित्व म्हणता येईल? माणसाचे अपयश थोडक्यात या शब्दात सांगता येईल : 'प्लेटोपासून ते आजच्या तारखेपर्यंतच्या राजनैतिक तत्त्वज्ञानाच्या इतिहासातून हे स्पष्ट झालेले आहे, की आधुनिक तत्त्वज्ञान अद्याप मूलभूत समस्यांशीच झगडत आहे.'

वस्तूतः असे फक्त एकच तत्त्वज्ञान आहे जे स्वतःचेच म्हणणे खोडून काढत नाही आणि ते म्हणजे कुरआनने स्थापित केलेले तत्त्वज्ञान. कुराआन सांगतो की, फक्त ईश्वरालाच माणसावर राज्य करण्याचा अधिकार आहेः ते विचारतील,"याबाबतीत आम्हाला काही अधिकार आहेत का?" त्यांना सांगा, 'सगळे काही ईश्वराच्या हातात आहे." (३:१५४).

ईश्वर सार्वभौम आहे ही संकल्पना सुसंगत विचारव्यवस्थेचा मार्ग सुकर करते. ही व्यवस्था कुठल्याही प्रकारच्या विरोधी प्रवाहांपासून मुक्त आहे. पण माणूस सार्वभौम आहे असे म्हटले, की त्यातून उद्‌भवणा-या राजनैतिक सिद्धांतांमध्ये नि:संशय परस्परविरोध विसंगती असतात. राजा प्रजा यांच्यातले फरक मुळापासून उखडून टाकणे हा सगळ्या राजनैतिक सिद्धांतांचा उद्देश राहिलेला आहे. तरीही कुठलीही मानवी व्यवस्था, मग ती कुठल्याही स्वरुपाची असली तरी हे करू शकलेली नाही. लोकशाही आणि एकाधिकारशाही या दोन व्यवस्थांमध्ये मानवी समानता हा अप्रत्यक्ष आदर्श ठरलेला आहे. कारण सत्ता नेहमी मूठभर लोकांच्याच हातात ठेवायची आणि इतरांनी त्यांची प्रजा बनून रहायचे असते. ईश्वर सार्वभौम आहे हे मान्य केल्यावरच फक्त ही विषमता नष्ट होऊ शकते. ईश्वर आहे. तो राज्यकर्ता आहे, बाकी सगळे त्याचे प्रजाजन. माणसामाणसात विभागणी नाही की फरक नाही.

दुहेरी विसंगती -

एखाद्या ग्रथांचे वेगवेगळे भाग परस्पर विरोधी असतील तर त्या ग्रंथाच्या रचनेतच विसंगती असते. एखाद्या ग्रंथाचा आशय, पूर्णतः किंवा अंशतः ज्ञात वस्तुस्थितीशी फारकत घेणारा असेल, तर तो ग्रंथ बाह्य वस्तुस्थितीशी विसंगत असतो. कुरआन न्यायासह दावा करतो की तो या दोन्ही प्रकारच्या विसंगतीपासून मुक्त आहे. याउलट मानवाकडून झालेले कुठलेही काम या दोन्ही प्रकारच्या विसंगतीपासून मुक्त असूच शकत नाही. त्यामुळे इथे म्हणता येते की, कुरआनचा स्तोत्र ईश्वर असलाच पाहीजे. ते माणसाकडून लिहिले गेले असते, तर मानवी कामात नेहमी आढळणा-या विसंगतींचा दोष त्यातही दिसला असता.

एखाद्या ग्रंथात विसंगती उद्‌भवतात ते मुळात त्याच्या लेखकाच्या उणीवांमधून. अशा उणीवा टाळायचे म्हटले तर दोन गोष्टी अत्यावश्यक असतात. संपूर्ण ज्ञान आणि पूर्ण वस्तुनिष्ठता. असा कुठलाही माणूस नाही जो या दोन्ही क्षेत्रात तीव्रपणे अपुरा नाही. फक्त ईश्वरच निर्दोष असतो. मानवाकडून लिहिल्या गेलेल्या ग्रंथांमध्ये विसंगतींचा सुकाळ अटळ आहे, तर ईश्वराचा ग्रंथ आणि फक्त ईश्वराचा ग्रंथ स्वतःला खोटे ठरवत नाही.

माणसाच्या स्वभाविक मर्यादांमुळे, अशा अनेक गोष्टी आहेत ज्या तो आपल्या बुध्दिसामर्थ्यावर आत्मसात करु शकत नाही. त्यामुळे तो अंदाज बांधायला प्रवृत्त होतो. हे त्याला वारंवार चुकीच्या निष्कर्षाकडे आणि निराधार

तंत्राकडे घेऊन जाते. त्याची दिशाभूल करते.

प्रत्येक माणूस बालपणापासून म्हातारपणापर्यंत शिकत असतो. म्हातारे झाल्यावर बालपणी अपरिपक्व वयात स्वीकार केलेली वस्तुस्थिती त्याला अमान्य होऊ लागते. वयाबरोबर त्याच्या ज्ञानात आणि अनुभवात भर पडत जाते. त्यामुळे त्याची मते त्याच्या सुरुवातींच्या निष्कर्षापेक्षा वेगळी दिसू लागतात. अखेरीस जेव्हा मृत्यु येतो, तेव्हाही त्याचे खूप शिकायचे राहून गेलेले असते. त्याच्या मृत्युनंतर त्याची परिपक्व वयातली ठाम मते खोटी असल्याचे सिद्ध होते. अनुभव आणि तर्कबुद्धी यांच्या माध्यमातून निखळ सत्यापर्यंत पोहोचता येत नाही.

माणुस अनवधानाने आणि अजाणतेपणाने अनेक चुका करत असतो. याच्याच जोडीने तो लोभ, वैर, मत्सर, सूड आणि भीती या भावनांनी भारावल्यावर वस्तुस्थितींचा जाणूनबुजुन गैर अर्थ काढायला प्रवृत्त होतो.

माणासाचा सत्याकडे कानाडोळा करण्याचा आणि चुकीच्या युक्तिवादाला बळी पडण्याचा दोष नेहमी त्याच्या मनःस्थितींना आणि विकारांना दिला जातो. मानवी विचारशक्तीवर प्रेम आणि तिरस्कार, मैत्री आणि वैर यांचा प्रभाव असतो. माणसाची अविकारी राहण्याची असमर्थता, त्याचे उंचावलेले किंवा खालावलेले मनोबल, त्याचे यश आणि वैफल्य हे सगळे त्याच्या विचारांच्या दर्जाला रंग देतात. अशी मनःस्थिती, औदासिन्य आणि हेकेखोरपणातले चढउतार अगदी उत्कृष्ट विचारांनाही सत्यापासून विचलित करु शकतात.

अशा औदासिन्यापासून आणि अशा मर्यादांपासून मुक्त असणारा असा एकमेव आहे, तो म्हणजे सर्वशक्तीमान ईश्वर! म्हणूनच त्याच्या वचनात परिपूर्ण सुसंगती आहे.

बायबलमधील विसंगती -

हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी आपण बायबलचे उदाहरण घेऊ. बायबल हा साक्षात्कारांचा ग्रंथ असून तो कुराआनचा अग्रदूत आहे. सुरुवातीला बायबल ईश्वराचे प्रकटीकरण होते. पण नंतरच्या काळात त्यात मानवाने काही माहिती घुसडली. परिणामी अनेक बाह्य विरोधाभासांचा त्यात शिरकाव होऊ लागला. आपण येथे मसीहा (Messiah) च्या वंशावळीचा मुद्दा विचारात घेऊ. बायबलच्या,'इंजील' (Injil) किंवा 'नवीन करार' या नावाने ओळखल्या जाणा-या विभागात अनेक ठिकाणी याचा उल्लेख येतो. येशूच्या वचनांचा संग्रह गॉस्पेल या नावाने ओळखला जातो. मॅथ्यूच्या मते

गॉस्पेलची सुरुवात या संक्षिप्त वंशावळीपासून होतेः "डेव्हीडचा पुत्र, अब्राहमचा पुत्र येशू ख्रिस्ताच्या वंशावळीचा ग्रंथ," (मॅथ्यू १:१).

पुढे अब्राहमपासून सुरुवात करुन जोसेफपर्यंतची ख्रिस्त वंशवृद्धी सविस्तरपणे दिलेली आहे. नवीन करारानुसार जोसेफ म्हणजे, "मेरीचा पती, ज्याच्यापासून येशूचा जन्म झाला." (मॅथ्यू १.१६)

नंतर गॉस्पेलची पाने उलटत वाचक मार्कच्या या विचारापर्यंत येतो." येशू ख्रिस्ताच्या गॉस्पेलची सुरुवात, जो ईश्वराचा पुत्र होता." अशी होती. (मार्क १:१).

नवीन कराराच्या एका प्रकरणानुसार येशू जोसेफ नावाच्या एका व्यक्तीचा पुत्र होता, तर याच नवीन कराराचे दुसरे प्रकरण सांगतो की तो ईश्वराच्या पुत्र होती.

मूळ स्वरुपात इंजिल हा ईश्वराचा ग्रंथ होता, आणि तो विसंगतीपासून मुक्त होता यात काही शंका नाही. नंतरच्या काळातच माणसाने त्यात स्वतःची भर घातली. यामुळे सुरुवातीच्या सुसंगत ग्रंथात विसंगतींचा प्रवेश झाला. आपल्या पवित्र ग्रंथातील विसंगतीचे स्पष्टीकरण देण्याच्या हेतूने ख्रिश्चन चर्चने आणखी एक असाधारण विरोधाभास जन्माला घातला. एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका (१९८४) मध्ये जोसेफचे वर्णन असे केले आहेः 'येशूच्या इहलोकातला पिता, कुमारिका मेरीचा पती.

धर्मनिरपेक्ष विरोधाभास -

धर्मनिरपेक्ष लिखाणातील गंभीर अंतर्गत विरोधाभास अभ्यासताना मी मार्क्सच्या ग्रंथाकडे वळतो. आधुनिक जगात त्याचे अधिराज्य असणा-या अनुयायांची संख्या प्रचंड मोठी आहे. जॉन गालब्रेथ हा प्रसिद्ध अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ त्याच्याविषयी लिहितो.

'बायबल हा सामूहिक लेखकाचा आविष्कार आहे हे आपण मान्य केले तर एकट्या लेखकाने खिळवून ठेवलेल्या स्वयंघोषित आणि एकनिष्ठ अनुयायांच्या संख्येच्याबाबतीत मार्क्सची स्पर्धा फक्त मुहम्मदांशी होऊ शकते. ही स्पर्धा खरंच फार काट्याची नाही. मार्क्सच्या आनुयायांनी आता प्रेषितांच्या पुत्रांना फार मागे टाकले आहे.

पण मार्क्सच्या प्रचंड लोकप्रियतेमुळे ही वस्तुस्थिती बदलत नाही की त्याचे ग्रंथ ढळढळीत विरोधाभासांच्या संग्रांहापेक्षा किंचित चांगले आहेत. उदाहरणार्थ मार्क्सच्या मते जगातल्या सगळ्या वाईटाचे मूळ आहे ते वर्गाच्या अस्तित्वात. त्याच्या तत्त्वानुसार, वर्ग विभागणी उत्पन्न होते ती खासगी मालकीच्या व्यवस्थेतून आणि उत्पादनाच्या साधनाचे पांढरपेशा

मध्यमवर्गाकडून केले जाणारे नियमन त्यांना खालच्या कष्टकरी वर्गाची लूट करण्याचे सामर्थ्य देते.

मार्क्सने सुचवलेल्या तोडग्यात भांडवलवादी वर्गाची मालमत्ता जप्त करुन ती कष्टकरी वर्गाच्या प्रशासनाखाली ठेवण्याचा समावेश होतो. अशा रीतीने वर्गविरहित समाज स्थापन होईल असा त्याचा दावा आहे. पण इथेच मार्क्सच्या तत्वज्ञानात मूलभूत दोष आहे. या अदलाबदलीमुळे एक वर्ग जागा सोडतो आणि दुसरा वर्ग त्याची जागा घेतो. पूर्वी जिथे अर्थव्यवस्थेवर मालकीच्या माध्यमातून एका वर्गाचे नियंत्रण होते, तिथे आता नियमन करण्याच्या हक्कातून दुस-या वर्गाचे नियंत्रण येते. मार्क्सचा तथाकथित वर्गविरहित समाज प्रत्याक्षात असा समाज होतो ज्यात भांडवलवादी मालकीची जागा साम्यवादी मालकीने घेतली होती.

मार्क्स एके ठिकाणी ज्यावर टिका करतो, त्यावर दुस-या ठिकाणी तो दुर्लक्ष करतो. पण भांडवलवादी वर्गाबद्दल तीव्र नापसंती आणि दीर्घ द्वेष यामुळे तो आपल्या स्वतःच्या विचारातला हा विरोधाभास बघू शकलेला नाही. भांडवलवाद्यांकडून आर्थिक साधनसंपत्तीचे नियंत्रण दूर करुन ते अधिकारी वर्गाकडे सोपवण्याला तो अनुकूल होता, पण पूर्वग्रहामुळे डोळ्यांवर झापड आल्याने, त्याला त्याच्या कर्माच्या फळांचा अंदाज लावता आला नाही. एकाच घटनेच्या दोन वेगवेगळ्या रूपांना त्याने वेगवेगळी नावे दिली. एके ठिकाणी तो त्याला मूठभरांकडून होणारी अनेकांची लूट म्हणतो, तर एके ठिकाणी, 'सामाजिक सुव्यवस्था' हे गोंडस नाव देतो.

याउलट कुरआन अशा प्रकारच्या स्व-विरोधाभासापासून पूर्णपणे मुक्त असून त्याच्या आशयात परिपूर्ण ताळमेळ आहे. असे असताना, कुरआनच्या विरोधकांनी कुरआनातही विरोधाभास आढळतात हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला, परंतु या संदर्भात त्यांनी दिलेल्या सगळ्या उदाहरणांचा ते जे सिद्ध करु पाहतात, त्याच्याशी काहीही संबंध नाही. उदाहरणादाखल, ते म्हणतात, की अंतिम हजयात्रेच्या प्रवचनात प्रेषितांनी सांगीतले होते की, सगळ्या मानवाचे मूळ पुरुष आदम होते. ते इहलोकातील होते.

या तत्त्वानुसार स्त्रियांना पुरुषांसारखा दर्जा मिळाला पाहिजे. पण कुरआनचे विरोधक म्हणतात की, व्यवहारात असे घडलेले नाही. इस्लामिक समाजात स्त्रियांना दिल्या गेलेल्या कनिष्ठ स्थानाकडे ते बोट दाखवतात. मग या वस्तुस्थितीकडे लक्ष वेधतात की इस्लामिक कायद्याने दोन स्त्रियांची साक्ष एका पुरुषाच्या साक्षीच्या बरोबरीची मानलेली आहे. हे असे आहे खरे, पण ते

विशिष्ट परिस्थितीत! हा नियम कुठल्या संदर्भात लावला गेला ते कुरआनच्या वचनातून स्पष्ट केलेले आहे. विचारार्थ वचन कर्जाच्या लिखित नोंदीच्या संदर्भात आहे:

'आणि दोन पुरुष साक्षीदार घ्या. दोन पुरुष नसतील तर एक पुरुष आणि दोन स्त्रिया. तुम्ही तुमच्या पसंतीचा साक्षीदार निवडू शकता. एका स्त्रीला विसर पडला तर दुसरी स्त्री तिला आठवण करुन देऊ शकेल.'

या वचनाची शब्दयोजना अगदी निःसंदिग्धपणे दर्शवते की, लिंगधारित भेदभाव हा या नियमाचा पाया नाही, तर स्त्रियांची कनिष्ठ स्मरणशक्ती यातून विचारात घेतलेली आहे. यातून सूचित होते ती जैविक वस्तुस्थिती आहे. स्मरणशक्तीच्याबाबतीत स्त्रिया पुरुषांइतक्या कुशल नसतात ही ती वस्तुस्थिती. याच कारणाने, कर्जाच्याबाबतीत स्त्रियांची साक्ष मान्य करायची असेल तर त्यांची संख्या दोन असली पाहिजे: म्हणजे मग नंतरच्या काळात साक्ष द्यायची वेळ आली तर, त्यांच्यातल्या एकीला दुसरीच्या दुबळ्या स्मरण शक्तीची भरपाई करता येईल.

हे मनात पक्के ठसले पाहिजे की या नियमाचा दुसरा कुठलाही अर्थ लावणे म्हणजे त्या धर्मग्रंथाबद्दल संपूर्ण चुकीची समज करुन घेणे. त्याच्याबरोबर हेदेखील विचारात घेतले पाहिजे की आधुनिक संशोधनाने कुरआनच्या या ठाम विधानाला बळकटी दिलेली आहे की स्त्रियांची स्मरणशक्ती दुबळी असते. रशियन वैज्ञानिकांनी हा विषय फार सविस्तरपणे अभ्यासला आहे. त्यांचे निष्कर्ष पुस्तक रुपात प्रकाशित झाले आहेत. १८ जानेवारी, १९८५ च्या टाईम्स ऑफ इंडीयाच्या नवी दिल्ली आवृत्तीत त्याचा गोषवारा 'स्मरणशक्तीचे सामर्थ्य' या शीर्षकाखाली छापलेला दिसतो.

पुरुषांचे स्मरणशक्तीचे आणि गणितीय माहीतीचा अर्थ लावण्याचे सामर्थ्य स्त्रियांपेक्षा वरचढ असते, पण स्त्रियांकडे त्यांच्यापेक्षा जास्त शब्दसंपत्ती असते. असे एका रशियन शास्त्रज्ञाने म्हटले आहे (यूपीआय). 'पुरूषांचे गणित विषयात वर्चस्व असते ते त्यांच्या स्मरणशक्तीचे वैशिष्ट' असे डॉ. व्लादीमीर कोनोवालोव यांनी तास न्यूज एजन्सीला सांगीतले होते.

कुरआनचा नियम, कुठल्याही विरोधाभासाला थारा न देता ही वस्तुस्थिती सिद्ध करतो की, कुरआन एकमेव ईश्वराकडून आले आहे ज्याच्याकडे जीवीताच्या अस्तीत्वाच्या वस्तुस्थितीचे परिपूर्ण ज्ञान आहे. तो प्रत्येक गोष्ट सगळ्या दृष्टिकोनातून बघतो आणि म्हणूनच तो ईश्वर आदेश घोषित करण्याच्या स्थानावर आहे, ज्याचा निसर्गाशी संपूर्ण ताळमेळ आहे.

बाह्य विसंगती -

लिखित साहित्यात बाह्य विसंगती तेव्हा आढळते जेव्हा त्यात ठामपणे मांडलेल्या विचारांचा बाह्य जगातील एखाद्या वस्तुस्थितीशी विरोधाभास असतो. माणसाचे बोलणे आणि लिहिणे त्याच्या स्वतःच्या ज्ञान कक्षेतले असते.त्यावर मानवी मर्यादा असल्याने तो जे लिहितो किंवा बोलतो ते बाह्य वस्तुस्थितीशी मिळतेजुळते नसते. हा मुद्दा स्पष्ट करण्यासाठी आपण काही तुलनात्मक उदाहरणे घेऊ.

काही प्राचीन अरब जमातींनी त्यांच्या पोटच्या मुलांचा जीव घेतलेला आहे. बहुधा तान्ह्या मुली मोठया कुटुंबाला पोसू न शकण्याची भीती यामागे असावी. याच संदर्भातून पुढील वचने प्रकट झालेली आहेत.

"कमतरतेच्या भीतीने पोटच्या मुलांचा जीव घेऊ नका. आम्ही त्यांच्यासाठी आणि तुमच्यासाठीही चरितार्थ पुरवू. खरोखर, त्यांचा जीव घेणे हे फार मोठे पाप आहे"(१७:३०)

कुरआनच्या या घोषणेत हा दावा सूचीत होतो की, लोकसंख्येच्या वाढीमुळे पृथ्वीवर माणसाच्या चरितार्थात समस्या निर्माण होऊ नयेत. मग या वाढीचे प्रमाण आणि दर काही का असेन. शिवाय हेदेखील सूचित होते की चरितार्थ आणि मानवी लोकसंख्या यांच्यात कायम अनुकूल संतुलन असावे. उद्यादेखील आजसारखी चरितार्थाची साधने मुबलक प्रमाणात असावीत. युगानुयुगे श्रद्धेचा भाग म्हणून मुस्लिम या दाव्याला पाठिंबा देत आहेत. हा विषय त्यांनी ईश्वराकडे, त्या महान दात्याकडे सोपवला आहे.

कुरआनने हा दावा केल्यानंतर हजार वर्षानी ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ रॉबर्ट माल्थस (१७६६-१८३४) याचे एक पुस्तक १७९८ साली प्रसिद्ध झाले. त्यात 'समाजाच्या भविष्यकालीन प्रगतीवर होणारे लोकसंख्येचे दुष्परिणाम - लोकसंख्येचे तत्त्व' या निबंधातून त्याने लोकसंख्यावाढीवरचा त्याचा प्रसिद्ध सिद्धांत मांडला होता. तो असा : 'लोकसंख्या, नियंत्रण नसेल तर अवाढव्य गतीने (भूमीतीय गतीने) वाढते. चरितार्थाची साधने मात्र गणितीय गतीनेच वाढतात.'

सोप्या वाक्यात सांगायचे झाले तर, लोकसंख्येतली वाढ आणि चरितार्थाच्या साधनांची वाढ नैसर्गिकरित्या एकसमान नसते. लोकसंख्या भूमीतीय गतीने वाढते. तिचे प्रमाण १-२-४-८-१६-३२ या पद्धतीने होते. या उलट धान्य उत्पादनाचा वेग १-२-३-४-५-६-७-८ असा गणितीय पद्धतीने होतो. त्यामुळे अवाढव्य लोकसंख्यावाढीशी त्याची संख्या जुळत नाही. माल्थसच्या मते या समस्येचा एकमेव तोडगा म्हणजे मनुष्यप्राण्याने त्याच्या

जन्मदरावर ताबा ठेवावा. लोकसंख्या विशिष्ट प्रमाणाबाहेर वाढू देता कामा नये. नाहीतर पृथ्वीची लोकसंख्या चरितार्थाच्या उपलब्धतेशी विषम प्रमाणात होईल आणि दुष्काळाचे युग अवतरेल. ज्यात अगणित लोक उपासमारीला बळी पडतील.

माल्थसच्या या पुस्तकाचा प्रभाव फार मोठा होता. लेखक आणि विचारवंत यांचा त्याला भरघोस पाठिंबा मिळाला. त्यातून जन्मनियंत्रणाच्या आणि कुटुंबनियोजनाच्या अनेक योजना सादर केल्या गेल्या. तथापी, अलिकडच्या संशोधकांनी असा निष्कर्ष काढला आहे की, माल्थसचे अंदाज अगदी चुकीचे होते. ग्वायने डायर याने या संशोधनाची माहिती एका लेखातून दिलेली आहे. त्या लेखाचे शीर्षक असे चिथावणीखोर होतेः 'माल्थस : एक खोटा प्रेषित ." २८ डिसेंबर, १९८४ च्या 'द हिंदुस्थान टाईम्स' (नवी दिल्ली आवृत्ती) मध्ये हा लेख आलेला होताः

आज माल्थसची दिडशेवी पुण्यतिथी होऊन गेली. अजूनही त्याचा अशुभ अंदाज खरा ठरलेला नाही. त्याने अंदाज केल्याप्रमाणे जगाची लोकसंख्या भूमीतीय गतीने दुप्पट, चौपट झालेली आहे. युद्ध आणि इतर आपत्ती यामुळे त्यावर किंचित नियंत्रण आलेले दिसते. त्याने हा सिद्धांत लिहिला तेव्हापेक्षा आज ती सुमारे आठपट झालेली आहे. पण अन्न उत्पादनाची गतीही खूप वाढलेली आहे. सध्याची पिढी सरासरीने जगाच्या इतिहासातली उत्कृष्ट पोषण मिळणारी पिढी आहे.

माल्थसचा जन्म 'पारंपरिक शेतीच्या' युगात झाला होता. 'वैज्ञानिक युग' येईल आणि त्यात उत्पादनात अद्‌भुत वाढ होईल याची त्याला कल्पना होऊ शकली नाही. माल्थसच्या मृत्युनंतर दिडशे वर्षात शेतीच्या कृतीपद्धतीत अमुलाग्र बदल झाले आहेत. विशेषत्वाने उच्च उत्पादन देतील अशा बियाणांची लागवड होऊ लागली आहे. पाळीव प्राणी पूर्वीपेक्षा जास्त दुग्ध उत्पादने देऊ लागले आहेत. जमिनीची सुपीकता वाढवण्याच्या नवनवीत आधुनिक पद्धती शोधल्या जात आहेत आणि तरीही त्याच वेळेस शेती उत्पादनात दहापट वाढ झालेली आहे.

तिस-या जगाचा विचार करायचा झाला तर, या अविकसित देशांमध्ये आज तीनशे कोटी लोक जगत आहेत. पण तिस-या जगाकडे तीनहजार तीनशे कोटी लोकांसाठी अन्न उत्पादन करण्याचे सामर्थ्य आहे. म्हणजे सध्याच्या लोकसंख्येच्या दहापट लोकसंख्या. एफ. ए. ओ. च्या एका पाहाणीनुसार तिस-या जगाची लोकसंख्या जोमाने वाढत जाऊन दोनहजार सालापर्यंत चारशे कोटींवर गेली तरीही धोक्याचा इशारा मिळण्याचे काही

कारण नाही. लोकसंख्यावाढीच्या बरोबरीने उत्पादनवाढही साधली जाईल. त्या लोकसंख्यावाढीसाठी आवश्यक असेल त्याच्या दीडपट उत्पादन घेतले जाईल अशी साधने उपलब्ध असतील. त्यामुळे प्रादेशिक पातळीवर किंवा जागतिक पातळीवर अन्नटंचाईचे आरिष्ट संभवत नाही. ग्वायने डायर त्याच्या अहवालाचा समारोप या शब्दात करतो : "माल्थस चुकला होता. स्वतःला दुष्काळाच्या खाईत लोटण्याच्या शिक्षेला आम्हाला सामोरे जावे लागणार नाही."

अशा प्रकारे लोकसंख्या आणि उदरनिर्वाहाची साधने यावरचे माल्थसचे पुस्तक मानवीवंशाचा अंदाज बांधण्यात कमालीचे चुकले होते. (लेखकाच्या मृत्युनंतर अवघ्या दीडशे वर्षात हे सिद्ध झाले होते). स्थळ आणि काळाच्या बंधनात काम करणारे ते मानवी मेंदूचे काम होते. याउलट कुरआन आजच्या बाह्य वस्तुस्थितींशी सुसंगत आहे.

ऐतिहासिक चुका -

खिस्तपूर्व विसाव्या शतकात प्रेषित जोसेफच्या कालखंडात, इस्त्राईलच्या पुत्रांनी इजिप्तमध्ये प्रवेश केला. सात शतकांनंतर मूसा यांच्या सोबतींनी इजिप्त ओलांडून सिनाई बेटावर प्रवेश केला. याचा उल्लेख कुरआन आणि बायबल या दोहोंमध्ये आढळतो. पण, जिथे कुरआनातला मजकूर बाह्य इतिहासाशी पूर्णतः सुसंगत आहे, तिथे बायबलमध्ये असे अनेक प्रसंग आढळतात, जे ऐतिहासिक नोंदींपासून वेगळे आहेत. बायबलवर श्रद्धा ठेवणा-यांसमोर यातून अडचणी निर्माण झाल्या. त्यांनी बायबलमध्ये लिहिलेले मान्य करावे की, इतिहासाचे बोट धरुन चालावे? दोन्ही परस्परविरोधी असल्याने त्यांना एकाच वेळेस दोन्ही स्वीकारता येत नाही.

१२ जानेवारी, १९८५ रोजी दिल्ली येथील तहलकाबादमध्ये इस्लामिक अभ्यासाच्या राष्ट्रीय संस्थेत एक मेळावा भरला होता. त्यावेळी भारतीय ज्यू महासंघाचे अध्यक्ष इझ्रा कोलेत यांचे व्याख्यान झाले. त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता:"ज्यूवाद म्हणजे काय?" बोलण्याच्या ओघात त्यांनी ज्यूंच्या इतिहासावर भाष्य केले. इतर गोष्टींबरोबरच त्यात ज्यूंच्या इजिप्त प्रवेशाचा आणि इजिप्त सोडण्याचा उल्लेख होता. त्यांच्या बोलण्यात जोसेफ आणि मूसा यांच्याबरोबरीने इजिप्तमध्ये त्यांच्या कालखंडात राज्य करणा-या सम्राटांची नावे होती. जोसेफ आणि मूसा या दोघांच्या समकालीन सम्राटांसाठी त्यांनी 'फिरऔन' हे संबोधन वापरले होते.

या कालखंडाशी परिचित असलेल्या प्रत्येकाला हे माहित आहे की,

नांवाचा हा उल्लेख ऐतिहासिकदृष्ट्या चुकीचा आहे. मूसांच्या काळापर्यंत फिरऔन या नावाने ओळखल्या जाणा-या सम्राटांची राजवट सुरु झाली नव्हती जोसेफ यांच्या कालखंडात इजिप्तमध्ये वेगळ्या घराण्याच्या एकाधिकारशहांची राजवट होती.

जोसेफ यांचा इजिप्तमध्ये प्रवेश झाला तेव्हा तिथे हिक्सॉस या नावाने ओळखले जाणारे राजघराणे सत्तेत होते. ते मूळचे अरब होते. ख्रिस्तपूर्व पंधराव्या शतकात तिथल्या देशी जनतेने परकीय राजवटीविरुद्ध बंड केले. अशा रीतीने हिक्सॉस घराण्याची सत्ता संपुष्टात आली.

पुढे इजिप्तमध्ये देशी कायदा स्थापित केला गेला. इजिप्तच्या सार्वभौमत्वाचा ताबा घेणा-या घराण्याने स्वतःसाठी 'फराह' या नावाची निवड केली. याचा अर्थ 'सूर्यपुत्र' असा होतो. त्या काळात इजिप्तचे लोक सूर्याची उपासना, आराधना करीत. जनतेवर राज्य करण्याचा हक्क सिद्ध करण्यासाठी त्यांनी आपण सूर्य देवाचे अवतार आहोत असे घोषित केले.

म्हणजेच, मिस्टर कोलेत हिक्सॉस सम्राटांना फिरऔन म्हणत होते. त्यांच्यासमोर दुसरा काही पर्याय नव्हता. कारण मूसा आणि जोसेफ या दोहोंच्या कालखंडातील सम्राटांचा उल्लेख बायबलमध्ये फराह म्हणूनच येतो. या ज्यू वक्त्याला बायबल किंवा इतिहास यापैकी एकाचीच निवड करता येणार होती, एकाच वेळेस दोहोंची नाही. ज्यू महासंघाचा अध्यक्ष या नात्याने बोलत असल्याने त्यांनी इतिहास बाजूला ठेवला आणि व्याख्यानासाठी बायबलमधल्या माहितीचा आधार घेतला.

पण कुरआनात आपल्याला अशी इतिहासापासून लांब जाणारी माहिती आढळत नाही, आणि कुरआनचा अवलंब करणा-यांना त्यांच्या पवित्र ग्रंथाला पाठिंबा देण्यासाठी जबरदस्तीने इतिहासाचा त्याग करावा लागत नाही. कुरआन प्रकट झाले, तेव्हा लोकांकडे प्राचीन इजिप्तच्या इतिहासाचे ज्ञान नव्हते. नंतरच्या काळात पुराणवस्तुशास्त्राच्या उत्खननामुळेच इजिप्तच्या अभ्यासकांना प्राचीन इजिप्तमधील सम्राटांच्या नोंदी जमा करणे शक्य झाले.

असे असले तरीही, कुरआनात जोसेफला समकालीन असलेल्या इजिप्तमधल्या एकाधिकारांचा उल्लेख येतो, तो ' इजिप्तचा सम्राट' म्हणून. मूसांच्या काळात राहणा-या सम्राटांचा उल्लेख कुरआनात वारंवार फराह म्हणून केला गेलेला आहे. अशा प्रकारे कुरआनातले दाखले ऐतिहासिक वस्तुस्थितींशी तंतोतंत जुळणारे आहेत. याउलट, बायबलमधील दाखले इतिहासाच्या दृष्टीने चुकीचे आहेत. यातून हे सिद्ध होते की, कुरआन

ज्ञानाच्या मानवी स्त्रोताचा आधार न घेता अशा अस्तित्वाकडून लिहिले गेले होते, ज्याचा सत्याशी थेट संपर्क होता.

इतिहासातले उदाहरण -

उत्क्रांतीच्या सिद्धांताला अनुसरुन, माणूस आणि प्राणि या दोहोंची उत्पत्ती एका सामाईक पूर्वजापासून झाली. म्हणजेच, प्राण्यांची एक प्रजाती हळुहळु ऊत्क्रांतीचे अनेक टप्पे पार करुन गेली. त्यातून अखेरीस (एक मोठे वानर) आणि सरतेशेवटी आदिमानव निर्माण झाला.

आपण उत्क्रांतीच्या सिद्धांताला मान्यता दिली तरी, माणूस आणि प्राणी यांच्यामधल्या उत्क्रांतीच्या टप्प्यातल्या काही साखळ्या हरवलेल्या असून अद्याप त्यांचा शोध लागलेला नाही. माणूस आणि प्राणी या दोहोंची गुणवैशिष्टये दाखवणा-या प्रजाती उत्क्रांतीच्या प्रक्रियेत कुठे आहेत? अद्याप या ख-या मध्यसाखळीचा शोध लागेल असा उत्क्रांतीवाद्यांचा विश्वास आहे.

१९१२ साली इंग्रजी वृत्तपत्रांनी ही बातमी जगालाही दिली की, पिल्टडाऊन येथे अर्धामाणूस आणि अर्धा माकड असणा-या प्राचीन प्राण्यांच्या कवटीचा अवशेष सापडला आहे. त्याला पूर्व इतिहास असावा असे त्यात म्हटले होते.यातून डार्विनच्या उत्क्रांतीच्या सिद्धांताला बळकटी देणारा प्रत्यक्ष पुरावा मिळाला होता.

या पिल्टडाऊन माणसाला तत्काळ लोकप्रियता मिळाली. आर. एस. लुल यांच्या 'जैविक उत्क्रांती' या प्रमाण पुस्तकातही हे नाव झळकू लागले. एच. जी. वेल्सचे 'इतिहासाची रुपरेषा' आणि बर्ट्रांड रसेलचे 'पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास' अशा ग्रंथांमध्ये त्याचा असा उल्लेख आला होता की जणू काही 'पिल्टडाऊन' माणसाच्या अस्तीत्वाबद्दल काहीच शंका नाही.

सुमारे पन्नास वर्षे अनेक बुद्धीवंत या 'महान शोधाच्या' रोमांचात हरवून गेले होते. १९५६ मध्ये काही शास्त्रज्ञांच्या मनात मात्र शंकेने घर केले. त्यांनी ब्रिटिश संग्रहालयातल्या लोखंडाच्या अग्नीरोधक पेटीतून पिल्टडाऊन माणसाचे अवशेष बाहेर काढले. नंतर आपला हा 'शोध' त्यानी ब्रिटिश वस्तुसंग्राहालयास सादर केला. आपल्या प्रतिस्पर्ध्याला मूर्ख ठरवण्यासाठी केलेली ती थट्टा होती असे ते काही काळाने सांगणार होते. पण सगळ्या पाश्चात्य शास्त्रज्ञांनी आपली ही करामत इतकी गांभिर्याने घेतल्याचे पाहून खरी गोष्ट बाहेर पडेल या भीतीने ते गप्प बसले. त्यांच्या गप्प बसण्यामुळे कित्येक दशके उत्क्रांतीचा सकारात्मक विचार होण्यात अडथळा निर्माण झाला होता. (ब्रिटानिका विश्वकोश, १९८४,पिल्टडाऊनः माणूस).

कुरआनातून कोड्यात टाकणारी अनेक भाकिते व्यक्त केली गेली आहेत. त्यापैकी एक म्हणजे मेर्नपथ हा इजिप्तचा एक फराह. तो सम्राट रॅमसेस द्वितीय याचा मुलगा. ऐतिहासिक नोंदींनुसार मूसांचा पाठलाग करत असताना हा राजा लाल समुद्रात बुडाला होता. कुरआन अवतरित झाले तेव्हा या फराहचा उल्लेख फक्त बायबलमधून झालेला होता. झुंडीने समुद्रात ओढले जाण्याविषयीच्या एकमेव संदर्भातून त्यात असे म्हटले होते: 'मोठया लाटा उसळल्या आणि त्यात फराह त्याच्या रथासकट ओढला गेला. इतर रथ, घोडेस्वार आणि फराह पाठोपाठ येणारा सैन्याचा ताफा पाण्यात दिसेनासे झाले. त्यातील एकाचाही मागमूस उरला नाही.'

आश्चर्य म्हणजे फराहच्या बुडण्याविषयी सगळ्या जगाला इतकेच माहित असताना, कुराआनने हा अद्‌भूत साक्षात्कार दिला होता:"येणा-या पिढ्यांसाठी संकेत म्हणून आम्ही तुझा मृतदेह आजही सुरक्षित ठेवला आहे."

हे वचन प्रकट झाले तेव्हा किती असाधारण वाटले असेल! फराहचा मृतदेह अबाधित आहे याची त्यावेळेस कुणालाही कल्पना नव्हती. हे सत्य उजेडात येण्यापूर्वी सुमारे चौदाशे वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. प्राध्यापक लॉरेट यांनी १८९८ साली मूसांच्या समकालीन असलेल्या या फराहच्या मृतदेहाचे अवशेष सर्वप्रथम शोधले. जवळपास तीनहजार वर्षे हा मृतदेह थिबेस इथल्या नेक्रोपोलिसच्या थडग्यात आवरणात गुंडाळलेल्या स्थितीत राहिला होता. लॉरेटला तो सगळ्यात आधी आढळला. ८ जुलै, १९०७ रोजी एलीट स्मिथ याने तो आवरणातून वेगळा केला आणि त्याची योग्य वैज्ञानिक तपासणी करुन घेतली. १९१२ साली त्याचे 'रॉयल ममीज' हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्याच्या संशोधतून हे सिद्ध झाले की, लॉरेटला आढळलेली 'ममी' खरोखर मूसाच्या समकालीन फराहची होती. हा असा फराह होता, जो 'मूसा यानी ओळखला होता. त्याने आपल्या इच्छेला मुरड घालून मूसा यांचा पाठलाग केला आणि या पाठलागात त्याचा मृत्यू झाला.' ईश्वराच्या इच्छेनुसार, माणसाला संकेत मिळावा म्हणून त्याच्या नाशवंत अवशेषांचा विनाशापासून बचाव झाला होता. कुरआनात असे लिहून ठेवलेले आहे.

त्यानंतर फराहचा मृतदेह कैरो इथे हलवला गेला. १९७५ साली डॉक्टर बकेल यांनी या जतन केलेल्या मृतदेहाची (ममीची) सविस्तर तपासणी केली. या तपासणीच्या निष्कर्षांमुळे चकित होऊन त्यांनी लिहिले आहे की, आधुनिक माहितीच्या सहाय्याने ज्यांना पवित्र ग्रंथाचा पुरावा शोधायचा असेल, त्यांना फराहच्या मृतदेहाच्या संबंधित असलेल्या वचनातून झळझळीत उदाहरण मिळेल. कैरो येथील वस्तुसंग्रहालयातील 'रॉयल

ममीज' या दालनाला भेट दिली असता जतन करुन ठेवलेले राजघराण्यातील पुरुषांचे मृतदेह पाहून त्यांना हा पुरावा मिळेल.

ख्रिस्तांनंतरच्या सातव्या शतकातच कुरआनने ठामपणे सांगितले की, माणसासाठी संकेत म्हणून फराहचा मृतदेह जतन करुन ठेवलेला आहे. पण एकोणिसाव्या शतकात त्या मृतदेहाचा शोध लागल्यावरच या भाकीताला भक्कम पुरावा मिळाला. कुरआन हा ईश्वरी ग्रंथ आहे याचा दुसरा कुठला पुरावा आवश्यक आहे? निश्चितच माणसाने लिहिलेला कुठलाही ग्रंथ याच्यासारखा नाही.

नैसर्गिक घटना -

कुरआन अशा काळात प्रकट झाला, जेव्हा निसर्गाविषयी फार कमी माहिती होती. उदाहरणार्थ पाऊस म्हणजे स्वर्गातील नदीतून पृथ्वीवर होणारा पाण्याचा वर्षाव मानले जाई. पृथ्वी सपाट असून तिच्यावर छत धरणारे आकाश म्हणजे टेकड्यांच्या आधाराने उभे राहिलेले पृथ्वीचे आवरण मानले जाई. ता-यांना पृथ्वीच्याछतावरचे चमकदार चांदीचे खिळे किंवा दोरावर टांगलेले, आणि इकडुनतिकडे हेलकावणारे छोटे दिवे मानले जाई. प्राचीन भारतियांचा असा समज होता की, पृथ्वी गाईच्या शिंगांवर तोललेली असून तिने ती एका शिंगावरुन दुस-या शिंगावर घेतल्यावर भूकंप होतो. कोपर्निकसच्या कालखंडापर्यंत (१४७३-१५४३) सर्वसाधारणपणे असा विश्वास होता की, पृथ्वी स्थिर असून सूर्य तिच्या भोवती फिरतो. (दोनहजार वर्षांनंतर सामोसच्या आरिस्ट्रारकस ने (Aristarchus of Samos)हा सिद्धांत मांडला होता. पण त्याच्या कल्पनांना बैठक मिळू शकली नाही.

विज्ञान आणि तंत्रज्ञानात प्रगती केल्यानंतर, माणसाच्या निरीक्षणाचे आणि प्रयोगांचे क्षेत्र प्रचंड विस्तारले. यामुळे विश्वाच्या ज्ञानाचे अफाट भांडार खुले झाले. जीवनाच्या सगळ्या क्षेत्रांमध्ये आणि विज्ञानाच्या सगळ्या शाखांमध्ये पृथ्वीबद्दल पूर्वी प्रस्थापित झालेल्या सगळ्या संकल्पना नंतरच्या संशोधनातून चुकीच्या असल्याचे सिद्ध झाले. त्यामुळे त्यांचा त्याग केला गेला. म्हणजेच पंधराशे वर्षांपूर्वी माणसाने लिहून ठेवलेले पूर्णपणे बिनचूक असल्याची बढाई माणसाने मारु नये, कारण आता सगळ्या वस्तुस्थितींचे पुनर्मूल्यांकन अलिकडच्या काळात मिळालेल्या माहितीच्या चौकटीतून झाले पाहिजे. प्रत्यक्षात उणीवांपासून संपूर्ण मुक्त असलेला एकही ग्रंथ आढळलेला नाही. याला लक्षणीय अपवाद म्हणजे कुरआन याचा सच्चेपणा शतकानुशतके सगळ्या आव्हानाना पुरुन उरलेला आहे. कुरआन हा ईश्वरी

ग्रंथ आहे याचा ठोस पुरावा यातून मिळतो. ईश्वरास सगळ्या वस्तुस्थिती त्यांच्या मूळ रुपात माहित आहेत आणि ज्याच्या ज्ञानावर काळाचे आणि परिस्थितीचे संस्कार झालेले नाहीत. कुरआनत ही माणसाची रचना असती तर काळाच्या कसोटीवर खरी ठरली नसती. कारण मानवाची दृष्टी याच्या अगदी उलट म्हणजे संकुचित आणि मर्यादित आहे.

कुरआनचे मूलभूत तत्त्व म्हणजे मृत्युनंतरच्या जीवनातील मुक्ती. याच कारणाने ते या जगातील कुठल्याही ज्ञात कलेच्या किंवा विज्ञानाच्या कक्षेत येत नाही. पण ते खुद्द मानवाला साद घालत असल्याने, त्याच्याशी संबंधित असणा-या प्रत्येक विषयाला त्याचा स्पर्श होतो. त्याची कक्षा अफाट असली तरीही त्यातले कुठलेही विधान अयोग्य ज्ञानातून उद्‌भवल्याचे कधीही दिसलेले नाही. बर्ट्रांड रसेल या विख्यात तत्त्ववेत्याने 'विज्ञानाचा समाजावरील परिणाम' या ग्रंथात ॲरिस्टॉटल विषयीचा एक मुद्दा मांडलेला आहे. "स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी दात असतात." हे सिद्ध करताना स्त्रियांमध्ये आणि पुरुषांमध्ये दातांची संख्या समान असते, या वस्तुस्थिती विषयीचे त्याचे अज्ञान प्रकट झाले आहे. असे अज्ञान आणि चुकीच्या धारणा कुरआनात कधीही आढळलेल्या नाहीत. यातून स्पष्टपणे दिसून येते की या ग्रंथाचे मूळ ईश्वरी अस्तित्त्वात आहे. या अस्तित्त्वाने खुद्द काळाच्याही पुढे झेप घेतलेली असून ते सध्याच्या ज्ञानापेक्षा अमर्याद पुढे गेलेले आहे, मग आजचे ज्ञान कितीही प्रगत वाटले तरी!.

खगोलशास्त्रातली उदाहरणे -

चंद्र आणि सूर्याच्या बाबतीत कुरआन आपल्याला सांगतो की अवकाशातील हे दोन्ही घटक आपापल्या वर्तुळाकार मार्गातून फिरतात (फलक ३६ : ४०).

डॉक्टर मॉरिस ब्युकाईल या वचनांवर सविस्तर चर्चा करताना म्हणतात 'फलक' या शब्दाचा शास्त्रीय अर्थ आहे कक्षा. त्यांच्या मते या अफाट आणि गूढ अवकाशातील या खगोलीय घटकांच्या हालचालींचे वर्णन करण्यास 'तरंगणे' ही संज्ञा सगळ्यात जास्त योग्य आहे.

डॉ. मॉरीस ब्युकॉईल -पुढे लिहितात, सूर्य त्याच्या कक्षेतून फिरतो हे दाखवण्यात आलेले आहे. पण या कक्षेचे पृथ्वीशी काय नाते असावे याची माहिती मिळालेली नाही. पृथ्वी स्थिर असून सूर्य तिच्याभोवती फिरतो असे कुरआनच्या प्रकटीकरणाच्या काळात मानले जाई. ख्रिस्तपूर्व दुस-या शतकातील टोलेमीच्या काळापासून या भूकेंद्रित व्यवस्थेचा पगडा होता. तो

इसवीसनाच्या सोळाव्या शतकातील कोपर्निकसच्या काळापर्यंत कायम होता. मुहम्मद यांच्या कालखंडात लोकांचा या संकल्पनेला पाठिंबा असला तरीही कुरआनात ती कुठेही आढळत नाही. इथेही नाही आणि अन्यत्र कुठेही नाही.

जीवशास्त्राचा विकास -

१९८४ सालच्या अखेरीस वर्तमानपत्रांनी कुरआनातील जीवशास्त्राच्या भविष्यकालीन ज्ञानाच्या रोचक उदाहरणाना प्रसिद्धी दिली होती. 'द सिटिझन' (२२ नोव्हेंबर, १९८४) या कॅनेडियन वर्तमानपत्राने प्रसिद्ध केलेल्या वृत्ताचा मथळा होताः

'प्राचीन पवित्र ग्रंथ : त्याच्या काळापेक्षा १३०० वर्षे पुढे'. नवी दिल्लीतील द टाईम्स ऑफ इंडीयानेही (१० डिसेंबर, १९८४) अशीच प्रसिद्धी दिली होती.

आधुनिक विज्ञानांवर आधारीत कुरआनातील वचनांवरचा नवा प्रकाश टाकण्याचे काम केले ते डॉ. कीथ मुअर यांनी. ते विख्यात गर्भचिकित्सक आणि कॅनडातील टोरंटो युनिव्हर्सिटीत प्राध्यापक होते. गर्भचिकित्सेचे तुलनात्मक विश्लेषण करण्यासाठी त्यांनी कुरआनातील विधाने आणि आधुनिक संशोधनाचे निष्कर्ष यांचा सखोल अभ्यास केला होता. यासाठी त्यांनी २३:१४ आणि ३९:०६ अशा निश्चित वचनांमधून दिलेल्या गर्भाच्या विकासाच्या वर्णनांचा आधार घेतला. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत सौदी अरेबियातील जेद्दाच्या अझीझ युनिव्हर्सिटीला अनेक वेळा भेट दिली. कुरआनातील विधाने आधुनिक शोधांच्या प्रत्येक तपशिलांशी सुसंगत असल्याचा आश्चर्यकारक शोध त्यांना लागला. पाश्चात्य जगाला कुरआनातील वस्तुस्थिती उजेडात आणायला १९४० साल उजाडण्याची वाट बघायला लागावी याने ते थक्क झाले होते. यावर लिहिलेल्या एका शोधा निबंधात ते म्हणतात, " १३०० वर्षे प्राचीन असलेल्या कुरआनमध्ये गर्भाच्या वाढीचे टप्पे इतक्या बिनचूकपणे दिलेले आहेत, की ते ईश्वरी साक्षात्कार आहेत यावर मुस्लिमांना तर्कसंगत विश्वास ठेवता यावा."

गर्भाशयातील गर्भाची उत्क्रांती -

गर्भाच्या विकासातील काही टप्प्यांचे कुरआनात दिलेले वर्णन आज आपल्याकडे असलेल्या माहितीशी तंतोतंत जुळणारे आहे. आधुनिक विज्ञानाकडून टीका होईल असे एकही विधान कुरआनात आढळत नाही.

सुरुवातीच्या काळात 'गर्भाशयाच्या आवरणाला लगटलेला एक आकार असतो. (हा सुनिश्चित झालेला आकार आपण पाहू शकतो.) या

विषयी कुरआन आपल्याला सांगतो की त्यानंतर हा आकार चावलेल्या मांसाच्या गोळा ही अवस्था प्राप्त करतो. पुढे त्यात अस्थिपेशी दिसू लागतात आणि त्यावर मांसाचे आवरण चढते. (सुरुवातीच्या आकारापेक्षा हा आकार वेगळा असतो हे दर्शवण्यासाठी वेगळया संज्ञेचा वापर केलेला आहे. ती संज्ञा म्हणजे आवरणातील मांस.

'गर्भाशयात लटकणा-या आकृतीला आम्ही मांसाच्या चावलेल्या गोळ्याचा आकार दिला. नंतर त्या गोळयात हाडे निर्माण केली आणि त्यावर मांसाचे आवरण चढवले.' २३:१४

इथे 'चावलेल्या मांसाचा गोळा' म्हणजे मुदगाह (Mudgah) तर 'आवरणातील मांस' म्हणजे लहम. या फरकावर जास्त भर देण्याची गरज आहे. सुरुवातीला गर्भ म्हणजे लहान आकार असतो. वाढीच्या विशिष्ट अवस्थेत तो उघड्या डोळ्यांसारखा किंवा मांसाच्या चावलेल्या गोळ्यासारखा दिसतो. या आकृतीत हाडांच्या पेशी तयार होतात. ज्यांना मेसेन चायमा (mesenchyma) म्हटले जाते. नव्याने तयार झालेल्या हाडावर स्नायूंचे आच्छादन निर्माण होते; ज्यासाठी 'लहम' हा शब्द वापरलेला आहे.

गर्भाची वाढ होत असताना काही अवयव प्रमाणबद्ध असतात तर काही पूर्णतः प्रमाणहीन असतात. त्यापासून पुढे नवा जीव निर्माण होतो. ही वस्तुस्थिती आपल्याला माहीत आहे. हा अर्थ निश्चितपणे मुखल्लक (mukhallaq) या शब्दाचा आहे. 'प्रमाणबद्ध आकार देणे ' असा त्याचा अर्थ आहे. सूर: २२:०५ मध्ये हे वर्णन येते:

"गर्भाशयात लटकणा-या आकृतीला आम्ही आकार दिला. त्या मांसाच्या गोळ्याच्या काही घटकांना सुडौल आकार दिला तर काहींना बेढब बनविले." समाजात आपल्या काळाच्या हजार वर्षांपेक्षा आधी, विक्षिप्त श्रद्धा आणि मते प्रबळ होती. त्या कालखंडांत कुरआनचे ज्ञान मिळवणा-यांना सुवर्णसंधीचा लाभ झाला होता. त्यातील विधानांमधून मूलभूत महत्वाची तथ्ये सोप्या भाषेत सांगितलेली आहेत . ती तथ्ये शोधण्यासाठी माणसाला कित्येक शतके वाट बघावी लागली.

विश्वाचा आरंभ -

कुरआनात सांगीतले आहे: अंधश्रद्धावंतांना कळत नाही का, की पृथ्वी आणि आकाश हा एक भरीव आकार (रत्क) होता, ज्याच्या आम्ही ठिक-या उडवल्या (फत्क).... (२१:३०)

रत्क म्हणजे संपूर्णपणा, एकसंघपणा, तर फत्क म्हणजे याच्या उलट, एकसंधपणाच्या चिंधड्या. खगोलशास्त्राच्या अधुनिक संशोधनाने या

संकल्पनेचे समर्थन केले आहे. निरनिराळया निरीक्षणांच्या सहाय्याने वैज्ञानिकांनी असा सिद्धांत मांडला आहे की उच्च घनतेच्या आणि उच्च तापमानाच्या स्थितीचा स्फोट होऊन त्यापासून विश्वाची निर्मिती झाली (बिग बँग सिद्धांत). म्हणजेच विश्व निर्माण झाले. अतिउच्च दबावाखालील, अतीतप्त वायूपासून स्फोटामुळे तारकांच्या आकाशगंगा, खगोलीय धूळ, अनेक लघुग्रह आणि अकाल तयार झाल्या. सध्या आपल्याला दिसणारे आकाशगंगेची हालचाल हा त्या स्फोटाचाच परिणाम आहे. एनसायक्लोपीडिया ब्रिटानिका (१९८४)मध्ये म्हटले आहे की या सिद्धांताला आता बहुतेक खगोलशास्त्रज्ञांची पसंती मिळालेली आहे. सुमारे सहाशे कोटी वर्षांपूर्वी प्रसरणाच्या प्रक्रियेला सुरूवात झाली -- ती सातत्याने सुरूच असली पाहिजे. कारण खगोलीय आकृती केंद्रापासून दूर गेल्या की त्यांचे परस्परांवरील आकर्षण ओसरते. या मूळ पदार्थाचा सुरूवातीचा परीघ १०० कोटी प्रकाशवर्ष असल्याचा अंदाज आहे. तर प्रोफेसर एडिंग्टन यांच्या गणितानुसार सध्याचा परीघ सुरूवातीपेक्षा दहा पटींनी वाढलेला आहे. प्रसरण ही प्रक्रिया आजही सुरूच आहे. प्राध्यापक एडिंग्टन असा खुलासा करतात की तारे आणि तारकासमूह सतत प्रसरण पावणा-या फुग्याच्या पुष्ठभागावरील चिन्हांसारखे असतात. त्यामुळे सगळे खगोलीय गोल परस्परांपासून दूर जात असतात. प्राचीन माणसाची समजूत अगदी चुकीची होती. तारे आपल्याला दिसतात तसेच एकमेकांच्या जवळ असतात असे त्याला वाटे. 'आम्ही आकाशाची बांधणी सामर्थ्यानिशी केली आहे. खरोखर, आम्ही त्याचा विस्तार वाढवत आहोत.'५ व्या सूरःमधील ४७ व्या वचनाचे कुरआनातील हे प्रतिपादन किती लक्षणीय आहे! खिस्तपूर्व नऊशे कोटी वर्षांपूर्वी अस्तित्वात असलेल्या विश्वाचा परीघ सहाशे कोटी प्रकाशवर्षांपासून वाढत जाऊन सध्या सहा हजार कोटी प्रकाशवर्षे इतका झालेला आहे. ही बाब विज्ञानाने स्पष्ट केलेली आहे. याचा अर्थ असा की खगोलीय गोलकांमधील अफाट अंतर कल्पनेपलीकडचे आहे. असाही शोध लागलेला आहे की, आपली पृथ्वी आणि इतर ग्रह जसे सूर्याभोवती फिरतात. तशीच गोलकेही आकाशगंगेचा घटक म्हणून प्रदक्षिणा घालत असतात.

सूर्यामालेतील असंख्य ग्रह आणि उपग्रह एकमेकांपासून खूप दूर अंतरावर असतात आणि तरीहि एका व्यवस्थेनुसार वर्तुळाकार कक्षेत फिरत असतात. याच पद्धतीने प्रत्येक भौतिक वस्तू अत्यंत सूक्ष्म अशा 'सूर्यमालांनी' बनलेली असते. या मालांना अणू असे म्हटले जाते. सूर्यमालेतील पोकळी पाहता येते, पण अणूप्रणालीतील पोकळी फार सूक्ष्म असल्याने दिसू शकत

नाही. उदाहरणार्थ सहा फूट उंचीच्या माणसाच्या शरीरातील सगळे अणू एकमेकांमध्ये अजिबात राहणार नाहीत. अशापद्धतीने एकत्र केले, तर त्याचे शरीर एका ठिपक्याएवढे बारिक होईल. ते फक्त सूक्ष्मदर्शकातूनच दिसू शकेल.

निरीक्षण केली गेलेली सगळ्यात दूरवरची आकाशगंगा सूर्यापासून लक्षावधी प्रकाशवर्षे अंतरावर आहे.

खगोल - भौतिकशास्त्रज्ञांनी गणिताच्या सहाय्याने निश्चित केलेले वैश्विक पदार्थाचे एकूण वस्तुमान अफाट आहे. असे मानले जाते की सगळी पोकळी काढून टाकण्यासाठी हे वस्तुमान एकत्र केले, तर विश्वाचा आकार सूर्याच्या आकारपेक्षा फक्त तीस पट असेल. ही आकडेमोड अगदी अलिकडच्या काळातली आहे हे विचारात घेतल्यास कुरआनने पंधराशे वर्षांपूर्वी ठामपणे केलेले विधान किती असाधारण आहे हे लक्षात येते. एका थिजलेल्या गोळ्याच्या विस्तारामुळे विश्व निर्माण झाले असले तरी त्यातील पदार्थाचे एकूण वस्तुमान स्थिर आहे. त्यामुळे तुलनेने लहान आकारात ते मावू शकते असे कुरआनने सांगितले आहे. विश्वाच्या अंताचे वर्णन त्यात अशा शब्दात केले आहे, ‘त्या दिवशी ,कागदाची गुंडाळी करावी तशी आम्ही या विश्वाची गुंडाळी करू“ (२१:१०४)

चंद्र हा अवकाशातला आपला सगळ्यात जवळचा शेजारी . त्याचे पृथ्वीपासूनचे अंतर फक्त दोन लाख चाळीस हजार मैल. या जवळिकीमुळे त्याच्या गुरूत्वाकर्षणाचा परिणाम समुद्राच्या पाण्यावर जाणवतो. दिवसातून दोनदा समुद्राच्या पाण्याला खूप मोठे उधाण येते. विशिष्ट ठिकाणी लाटांची उंची साठ फुटांपर्यंत जाते. चंद्राच्या या आकर्षणाचा परिणाम भूपृष्ठालाही जाणवतो, पण तो काही इंचाचाच असतो. माणसाच्या दृष्टीने चंद्र आणि पृथ्वी यांच्यामधले अंतर अगदी सोयीचे आहे. त्याचे अनेक फायदे आहेत. उदाहरणार्थ, हे अंतर फक्त पन्नास हजार मैलांपर्यंत कमी केल्यास, समुद्रात वादळी लाटा उठतील. पृथ्वीचा बराच मोठा भाग समुद्रात बुडून जाईल. इतकेच काय वादळी लाटांच्या सतत प्रभावामुळे पर्वतांचे तुकडे पडतील. यामुळे पृथ्वीच्या भूभागाला चंद्राच्या गुरूत्वाकर्षणाचा थेट सामना करावा लागेल आणि त्याला तडे जाऊ लागतील.

खगोलशास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार पृथ्वी निर्माण झाली तेव्हा चंद्र तिच्या जास्त जवळ होता. त्यामुळे पृथ्वीवर अनेक उलथापालथी होत असत. काळाच्या ओघात पृथ्वी आणि चंद्र एकमेकांपासून दूर झाले आणि सध्याच्या अंतरावर आले. हे खगोलशास्त्राच्या नियमांना धरून होते. शास्त्राज्ञांच्या

समजुतीनुसार सुमारे शंभर कोटी वर्षे हे अंतर स्थिर राहिल आणि मग हेच खगोलशास्त्रीय नियम चंद्राला पृथ्वीच्या अधिक जवळ आणतील. चंद्र पृथ्वीपासून निश्चित अंतरावर आला, की परस्परांना छेदणा-या आकर्षणाच्या बलामुळे चंद्राचे दोन भाग होतील आणि शनीच्या कड्यांसारख्या या भागांमुळे मृत पृथ्वीची शान वाढवतील. ही संकल्पना लक्षणीय प्रमाणात कुरआनातील मताशी जुळणारी आहे. ही घटना एक भौतिक वास्तव आहे. पुढील ओळी त्याचे धार्मिक महत्व विशद करतात.

'निवाड्याचा दिवस जवळ येत चाललाय. दुभंगून चंद्राचे दोन भाग होऊ घातलेत. हा संकेत बघीतल्यावरही अश्रद्धावंत त्याकडे पाठ फिरवून म्हणतात,'मोठी कल्पक जादू आहे ही.'

मधाचा रोगनिवारक गुणधर्म -

कुरआनातून आपल्याला मधाचा रोगनिवारक गुणधर्म कळतो (१६:४९).या वचनाच्या चौकटीतून मुस्लिमांनी मधाच्या औषधी गुणाला फार महत्व दिलेले आहे. तो औषध निर्माण शास्त्रातला महत्वाचा घटक आहे. पण कित्येक वर्षे पाश्चात्य जगाला या औषधी गुणधर्माची कल्पना नव्हती. ते मधाला फक्त द्रवरूप अन्नघटक मानत. विसाव्या शतकापूर्वी युरोपियन शरीरशास्त्रज्ञांना मधाच्या जंतूनाशक गुणधर्माचा शोध लागला नव्हता. एका अमेरिकन माहितीपत्रकात प्रसिद्ध झालेल्या मधावरच्या आधुनिक संशोधनाचा सारांश पुढे दिलेला आहे.

'मध मानवात रोग निर्माण करणा-या जिवाणूंचा शक्तीशाली विनाशक आहे. परंतु विसाव्या शतकापर्यंत हे वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेले नव्हते. फोर्ट कोलीन्स इथल्या कोलोरॅडो शेतकी महाविद्यालयातले डॉ. डब्लू.जी.सॅकेट यांनी हे सिद्ध करण्याचा प्रयास केला होता की मध दुधासारखेच रोगवाहक आहे. शुद्ध मधात मिसळलेले ब-याच रोगांचे जिवाणू वेगाने नष्ट झाल्याचे बघून ते थक्क झाले. विषमज्वरचे जिवाणु शुद्ध मधात अठ्ठेचाळीस तासात नष्ट झाले होते. रक्तदोष आणि फुफ्फुस नलिकेचा दाह यांचे चिवट जिवाणु चार दिवस जिवंत राहू शकले. पेरिटोनीटिसचा प्रादुर्भाव करणारे बॅक्टेरिया प्रयोगाच्या पाचव्या दिवशी मृत झाले. डॉक्टर बोडोग बेक यांच्या मते इतर अनेक जिवाणुही मधात इतक्याच वेगाने नष्ट होतात. ते सांगतात, की मधाच्या या जिवाणुनाशक गुणधर्माचे कारण म्हणजे त्याची बाष्प शोषून घेण्याची क्षमता . ते जिवाणुमधला बाष्पाचा एकेक थेंब अक्षरशः काढून घेते. जिवाणुही, इतर सजीवांप्रमाणेच पाण्याच्या अभावी मृत्युमुखी पडतात.

मधाची ही बाष्प शोषण्याची क्षमता अमर्याद आहे. रोझिक्रिशियन, डायजेस्ट,सप्टेंबर १९७५,पृष्ठ ११.

कुरआनचे श्रेष्ठत्व ज्या भाषेत ते लिहिले गेले ती भाषा आहे. कुठलीही भाषा पाचशे वर्षांपेक्षा जास्त काळ एकाच रूपात टिकू शकत नाही या ऐतिहासिक नियमाला ती आश्चर्यकारक अपवाद आहे. पाच शतकांच्या कालखंडात एखादी भाषा इतकी अमुलाग्र बदलते, की भावी पिढ्यांना होऊन गेलेल्या पूर्वजांचे लेखन समजणे कठीण बनत जाते. इंग्रजी काव्याचे जनक जेऑफ्री चॉसर (१३४२-१४००) यांच्या कविता आणि इंग्रजी भाषेतले महान साहित्यिक विल्यम शेक्सपियर (१५६४-१६१६) यांची नाटके आणि कविता विसाव्या शतकातील वाचकांसाठी अत्यंत अनाकलनीय आहेत. महाविद्यालयीन अभ्यासक्रम म्हणून शब्दार्थसूची, शब्दकोश आणि भाषांतरे यांच्या सहाय्याने त्यांचे वाचन होताना दिसते.

पण अरेबिक भाषेचे वेगळेपण धक्कादायक आहे. पंधराशे वर्षांपासून ती काळाच्या कसोटीवर खरी ठरली आहे. शब्दांच्या रचनेत आणि शैलीत अर्थातच थोडी सुधारणा झाली आहे. पण शब्दांनी त्यांचा मूळ अर्थ गमवावा इतके तिचे प्रमाण दिसत नाही. समजा प्राचीन अरेबियातील कुरआनच्या काळातील ,एखाद्याने पुन्हा जन्म घेतला , तर तो ज्या भाषेत स्वतःला व्यक्त करेल ती भाषा आधुनिक अरबांना त्यांची समकालीन वाटेल.

हे पाहून असे म्हणावेसे वाटते की, कुरआनच्या अरेबिक भाषेवर जणू काही दैवी ठसा उमटवला आहे. शेवटच्या दिवसापर्यंत ती कळण्यास सुलभ रहावी म्हणून काळाच्या ओघाने तिला जणू जखडून ठेवले आहे. असे असल्याने अनाकलनीय बनून ‘अभिजात ‘साहित्याच्या खणात धूळ खात पडण्याची वेळ कुरआनवर कधीही येणार नाही. भावी काळातही लोक ते वाचत राहतील आणि त्यापासून प्रेरणा घेत राहतील.

विज्ञानाच्या क्षेत्रात, अलिकडच्या काही वर्षात वेगाने घवघवीत भर पडलेली असली तरीही, आपण परत एकदा कुरआनातील ठोस विधानांकडे येतो, ज्यातून कित्येक वर्षांपूर्वी पदार्थाच्या मूलतत्त्वाचा निष्कर्ष मांडला गेला आहे. काळाच्या ओघात एका विशिष्ट वेळी अरेबिक भाषा सुस्पष्ट झाल्यासारखी वाटते. ती वेळ म्हणजे दैवी साक्षात्काराचा क्षण. विज्ञानही त्याच्या गतीओघात एके ठिकाणी साचेबद्ध झाल्यासारखे वाटते. कुरआनने मांडलेले पदार्थाविषयीचे अंतीम मत कित्येक शतके माणसाला कळलेले नव्हते. इतरही अनेक महत्वाच्या विषयात कुरआनने माणसाच्या बौद्धिक कुवतीला मागे टाकले आहे. त्यातला सगळ्यात महत्वाचा विषय म्हणजे

विश्वाची निर्मिती .

न्यूटनचा प्रकाशाचा सिद्धांत -

मानवी बुद्धिमत्तेने एक प्रमुख वैज्ञानिक सत्य अवगत केल्यासारखी वाटणारी आणखी एक घटना म्हणजे प्रकाशाच्या ख-या स्वरूपाचा बोध. सर आयझॅक न्यूटन (१६४२ -- १७२७) यांनी प्रकाशाचा सिद्धांत मांडला. प्रकाश वेगाने हालचाल करणा-या सूक्ष्म कणांचा बनलेला असतो व हे कण त्याच्या उगमातून बाहेर टाकले जातात आणि वातावरणात विखुरले जातात. न्यूटनच्या असाधारण प्रभावामुळे वैज्ञानिक जगतावर दीर्घ काळ या कणांच्या सिद्धांताचे राज्य होते. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर मात्र प्रकाशाच्या तरंग सिद्धांताला पाठिंबा देताना त्याचा प्रकाशकणांचा सिद्धांत रद्द केला गेला. विद्युतचुंबकीय कणांच्या हालचालींच्या शोधाने न्यूटनच्या सिद्धांताला अखेरचा झटका दिला. यंगच्या संशोधनाने वैज्ञानिकांना पटवून दिले की प्रकाशाच्या तरंगांमध्ये मूलभूत गुणधर्म असतात. हे न्यूटनच्या कण सिद्धांताच्या विरोधात जाणारे होते.

न्यूटन चूक असल्याचे सिद्ध होण्याला फक्त दोनशे वर्षे लागली. याउलट कुरआनने सातव्या शतकात या जगाला संदेश दिला आणि चौदाशे वर्षांचा दीर्घ कालखंड उलटला तरीही त्यातले सत्य अबाधित आहे. याचे कारण म्हणजे त्याचा उगम मानवी नसून दैवी आहे. त्यातील विधानांचे परिपूर्ण सत्य सर्वकाळ सिद्ध होऊ शकते. दुसरा कुठलाही ग्रंथ या अद्वितीय गुणधर्माचा दावा करू शकत नाही.

आईनस्टाईनचा सापेक्षतेचा सिद्धांत घोषित करतो की ग्रह, तारे , तारकासमूह, आकाशगंगा आणि विश्व यांच्या वर्तनाचे नियंत्रण गुरूत्वीय बलाकडून केले जाते आणि त्यांच्या वर्तनाचा अगाऊ अंदाज लावता येऊ शकतो.

ह्यूम (१७११ - १७७६) आणि इतर बुद्धिवंतांनी हा वैज्ञानिक शोध एक तत्त्वाज्ञान म्हणून त्यापूर्वीच विकसित केला होता. कार्यकारणभावाच्या तत्त्वाला अनुसरून विश्वाच्या संपूर्ण व्यवस्थेचे नियमन केले जाते असे या तत्त्वातून सांगितले गेले होते. विश्वावर ईश्वराची सत्ता चालते याविषयी माणसाला कल्पना नसण्याच्या काळात हा सिद्धांत मांडला गेला. नंतरच्या काळात ईश्वराच्या संकल्पनेपासून मुक्ती मिळवण्यासाठी ‘कारण आणि परिणामाचे’ तत्त्व (Principle of Cause and Effect) बुद्धिनिष्ठ पद्धतीने रूजवले गेले.

पण नंतरचे संशोधन या निव्वळ भौतिक गृहतिकाच्या विरोधात जाणारे होते. पॉल डिरॅक, हिसेनबर्ग आणि इतर विख्यात वैज्ञानिकांनी अणूच्या संरचनेचे विश्लेषण करण्याचे काम हाती घेतले होते. या संशोधनात त्यांना आढळले की , त्याची व्यवस्थ्या सूर्यमालेच्या अभ्यासावरून स्वीकारल्या गेलेल्या कार्यकारण भावाच्या तत्त्वाला छेद देणारी होती. त्यांचा सिद्धांत 'पुंज यांत्रीकी सिद्धांत' (Quantum Mechanics Theory) या नावाने ओळखला जातो. या सिद्धांतानुसार पदार्थाचे मूलकणाच्या पातळीवरचे (subatomic level) वर्तन स्वैर म्हणजेच मनमौजी असते.

'तत्त्व' या शब्दाचा वैज्ञानिक अर्थ म्हणजे संपूर्ण जगभर सारख्या प्रमाणात लागू होणारा नियम. हा नियम एखाद्या ठिकाणी जरी लागू होत नसेल तर त्याच्या विश्वासार्हतेवर प्रश्न निर्माण होऊ शकतो. सूर्यमालेत पदार्थाचे कार्य कार्यकारणभावाच्या तत्वानुसार चालते. पण मूलकणांच्या पातळीवरून त्याचे वर्तन तंतोतंत अशाच पद्धतीचे होत नसेल तर ते नाकारले गेलेच पाहिजे. आईनस्टाईनला ही संकल्पना अविवेकी वाटली. निसर्गात वरवर दिसणारा हा विरोधाभास उलगडण्यासाठी त्याने जीवनातली शेवटची तीस वर्षे खर्च केली. पुंज यांत्रीकी सिद्धांताचे नियम मोडून वागणे नाकारताना त्याने म्हटले आहे, "ईश्वर विश्वाशी द्यूत खेळतो, यावर माझा विश्वास नाही." त्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली तरीही ही समस्या सोडवण्यात त्याला यश आले नाही. विश्वाच्या सापेक्षतेवरचा कुरआनचा शब्द अंतिम असावा असे वाटते. मानवी बुद्धीच्या संदर्भातून विश्वाचा खुलासा करणे शक्य नाही या वस्तुस्थितीचे यथायोग्य वर्णन करताना इयान रॉक्सबर्गने म्हटले आहे:

पृथ्वीवर शोधलेल्या भौतिकशास्त्राच्या नियमांमध्ये स्वैर संख्या असतात. जसे की, इलेक्ट्रॉन आणि प्रोटॉन यांच्या वस्तुमानाचे गुणोत्तर १८४०:१ असे असते. का? पृथ्वीच्या निर्मात्याने स्वैरपणे या संख्या निवडल्या आहेत का?

विश्व कधीही मानवी ज्ञानाच्या कक्षेत येऊ शकणार नाही ही वस्तुस्थिती विज्ञानाला उमगली आहे असे दिसते. विश्व ही सर्वशक्तीमान ईश्वराची अद्‌भुत किमया आहे हे मान्य करावेच लागेल. त्यामुळे 'ईश्वर इच्छा' या संकल्पनेवर आधारित नसेल तर खरा खुलासा मिळवता येत नाही.

प्रकरण २

कुरआना : प्रेषितांची अद्भुत गोष्ट

प्रत्येक प्रेषिताला अधिकृतपणे एक अद्भुत गोष्ट दिलेली असते - एक खूण ! इस्लामच्या प्रेषितांची ही अद्भुत गोष्ट म्हणजे कुरआन. मुहम्मदांचे प्रेषितत्त्व जगाच्या अंतिम दिवसापर्यंत सबळ, सूक्ष्म राहणारी अद्भुत गोष्ट सर्वकाळ टिकून राहील अशी आहे. यासाठी चिरकाल टिकून राहणारी अद्भुत गोष्ट म्हणून कुरआन प्रेषितांच्या हाती अधिकाराने सोपवले गेले.

प्रेषितांचे विरोधक अशा अद्भुत गोष्टींची मागणी करत, जशा गोष्टी पूर्वीच्या प्रेषितांनी सादर केल्या होत्या. पण कुरआनने निःसंदिग्धपणे कथन केले की भविष्यात अशा अद्भुत गोष्टी घडणार नाहीत. (१७:५९). कुरआनातून प्रेषितांना असेही सांगीतले गेले आहे, की विरोधकांकडून होणारा तिरस्कार असह्य वाटला (आणि त्यांना अद्भुत गोष्ट दाखवावीशी वाटली), तर जमिनीखाली गडप होण्याचा किंवा आकाशावर आरूढ होण्याचा प्रयत्न करा. म्हणजे त्यातून तुम्ही त्यांना खूण देऊ शकाल. ईश्वराची इच्छा असती , तर त्याने त्यांना मार्गदर्शन दिले असते, अगदी सगळयांना! तेव्हा तुम्ही गाफील राहू नका (६:३५). या उटल, ईश्वराकडून प्रकट झालेल्या ग्रंथालाही प्रेषितांची अद्भुत गोष्ट बनवली गेली. ते विचारतील, “त्याच्या स्वामीने त्याला खूण का दिली नाही? “त्यांना सांगा, “या खुणा ईश्वराच्या हातात असतात. माझे जीवनकार्य आहे ते फक्त स्पष्ट इशारा देणे. त्यांना सविस्तरपणे सांगितलेला ग्रंथ तुमच्यावर अवतरित केला आहे एवढी खूण त्यांना पुरेशी नाही का? ख-या श्रद्धावंतांसाठी निश्चितपणे त्यातून आशिर्वाद आणि सक्त ताकीद दिली गेली आहे.” (कुरआन २९:५०-५१) कुरआनच्या अद्भुत रूपाचे असंख्य वेगवेगळे पैलू आहेत. इथे आपण फक्त तीन पैलूंवर विशेष भर देणार आहोतः

१. कुरआनची भाषा - अरेबिक : दीर्घ काळ संपर्काची भाषा म्हणून जीवित स्वरूपात राहिलेली आहे. हे या भाषेचे इतर आंतरराष्ट्रीय भाषांपेक्षा वेगळेपण आहे.

२.कुरआनातला मजकूर मूळ रूपात सुरक्षित राहिलेला आहे. यामुळे कुराआन दैवी ग्रंथामध्ये अद्वितीय ठरतो.

३.कुरआनने त्याच्यावर शंका घेणा-यांना त्याच्यासारखा ग्रंथ निर्माण करण्याचे आव्हान दिलेले आहे. हे आव्हान स्वीकारणे आणि

ईश्वराच्या ग्रंथाशी तुलना होईल असा ग्रंथ लिहिणे कुणालाही जमलेले नाही.

सगळे प्राचीन ग्रंथ ज्या भाषेत प्रकट झाले होते. त्या सगळ्या भाषा आज इतिहासाच्या दफ्तरखान्यात कुलुपबंद झालेल्या आहेत. याला अपवाद फक्त एकच अरेबिक कुरआनची भाषा, आजच्या जगातही प्रचलित आहे. सुमारे पंधराशे वर्षांपूर्वी कुरआन ज्या भाषेत प्रकट झाले ती भाषा आजही लक्षावधी लोक बोलतात आणि लिहितात. कुरआनच्या अद्‌भुत रूपाचा हा रोमहर्षक पुरावा आहे. कारण इतिहासातला इतर कुठलाही ग्रंथ त्याच्या भाषेवर असा ठसा उमटवू शकलेला नाही. इतर कुठलाही ग्रंथ एका संपूर्ण भाषेला त्याच्या स्वतःच्या शैलीत वळवू शकलेला नाही की भाषेचे ते रूप कित्येक शतके कायम ठेवू शकलेला नाही.

'नवीन करार' म्हणून ओळखल्या जाणा-या 'इंजील' या ग्रंथाचे उदाहरण घ्या. त्याची जगातली सगळ्यात प्राचीन प्रत अरामिक भाषेत नसून ग्रीक भाषेत आहे. खुद्द येशू अरामिक भाषा बोलायचे असे मानले जाते. याचा अर्थ असा की प्रेषित येशूने जे सांगितले आणि जे केले त्याचा फक्त भाषांतरित अहवाल आपल्याकडे आहे. तोही प्राचीन ग्रीक भाषेतला. ही भाषा आधुनिक भाषेपेक्षा खूप वेगळी आहे. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटपर्यंत ग्रीक भाषा इतकी बदलेली आहे की नवीन करारातल्या किमान साडेपाचशे शब्दांचा अर्थ उमगलेला नव्हता. एकूण मजकुराचा तो १२ टक्के एवढा भाग होतो. त्याच काळात ॲडॉल्फ डिसमन (Adolf Deissman) या जर्मन तज्ज्ञाला इजिप्तमध्ये काही प्राचीन दस्तऐवज सापडले होते. त्यातून ही माहिती पुढे आली, की बायबलची ग्रीक भाषा म्हणजे प्रत्यक्षात अभिजात ग्रीक भाषेची बोलीभाषा होती. इसवीसनाच्या पहिल्या शतकात पॅलेस्टाईनमध्ये ही बोली भाषा होती. देसमन काही अनोळखी शब्दांचे अर्थ लावू शकला. पण त्यातल्या पन्नास शब्दांचे अर्थ आजही कळलेले नाहीत. (द गॉस्पेल्स अँड द जीझस ऑफ हिस्टरी, लेखक झेवीयर लिऑन -- ड्यूफोर एस. जे.)

अर्नेस्ट रेनन (१८२३ - १८९४) याने अविचल भाषांवर प्रचंड संशोधन केले होते. त्या भाषांमधील शब्दसंपत्तीवर त्याने एक पुस्तक लिहिले होते. त्यात अरेबिक भाषेविषयी त्याने लिहिले आहे :

"अरेबिक भाषा ही जगातली सगळ्यात थक्क करणारी भाषा आहे. अभिजात कालखंडात अपरिचित असणारी ही भाषा एकाएकी पूर्ण भाषा म्हणून उद्‌भवली. त्यानंतर तिच्यात कुठलाही लक्षणीय बदल झाला नाही. त्यामुळे तिच्या प्रारंभीच्या आणि नंतरच्या अवस्थेचे कुणी वर्णन करू शकत नाही. प्रारंभी जशी होती, तशीच ती आजही आहे."

रेनन या फ्रेंच पौर्वात्य अभ्यासकाने ‘मानवी इतीहासातील या थक्क करणा-या घटनेला’ दाद देऊन प्रत्यक्षात कुरआनच्या अद्‌भुत स्वरूपाला दाद दिलेली आहे. कुरआनच्या अद्‌भूत साहित्यिक शैलीनेच अरेबिक भाषेला फेरफारापासून दूर ठेवले. इतर भाषांमध्ये मात्र फेरफार घडून आले आहेत. ही वस्तुस्थिती ओळखणा-या विद्वांनांपैकी एक म्हणजे ख्रिश्चन जरगी झायडन (Jurgi Zaydan) (१८६१-१९१४). अरेबिक साहित्यावरच्या एका पुस्तकात त्याने म्हटले आहे.

“अरेबिक भाषेवर कुरआनचा प्रभाव फार मोठा आहे. दुस-या कुठल्याही धार्मिक ग्रंथाचा त्याच्या भाषेवर असा प्रभाव दिसत नाही.“

दीर्घ कालखंडात जगातील भाषा इतक्या बदलल्या आहेत, की कुठल्याही आधुनिक भाषेचा तज्ज्ञ शब्दार्थ संग्रहाच्या मदतीशिवाय त्यांचे प्राचीन रूप समजू शकत नाही. भाषा फेरफाराची दोन प्रमुख कारणे आहेत --- राष्ट्राच्या सामाजिक व्यवस्थेतील उलथापालथी आणि भाषेतील साहित्याचा विकास. शतकानुशतके हे घटक अरेबिक भाषेतही कार्यरत आहेत जसे ते इतर भाषांमध्ये आहेत. फरत इतकाच की हे घटक अरेबिक भाषेचा ढाचा बदलू शकले नाहीत. आज बोलली जाते ती अरेबिक भाषा कुरआन प्रकट झाले त्या काळात मक्केत प्रचलित असलेल्या भाषेसारखीच आहे. होमरचे इलियड (ख्रिस्तपूर्व ८५०), तुलसीदासाचे ‘रामायण’ (इस १६२३) आणि शेक्सपियरची नाटके (१५६४ -- १६१६), या त्या त्या भाषेतील उत्कृष्ट साहित्यिक कलाकृती मानल्या जातात. या कलाकृती आजही वाचल्या जातात. रामायणचे आणि शेक्सपियरच्या नाटकांचे प्रयोग लेखन झाल्यापासून ते आजतागायत सातत्याने होत आहेत. पण त्यांचे साहित्यिक मूल्ये अथवा त्यांचे स्वरुप ते ज्या भाषेत लिहिले गेले त्या भाषेला बदलांपासून रोखू शकले. होमरची ग्रीक, तुलसीदासची संस्कृत आणि शेक्सपियरची इंग्रजी या आता अधुनिक भाषा नसून अभिजात भाषा आहेत. दीर्घकाळ एका भाषेला आपल्या साच्यात बसवून तो साचा टिकवून ठेवणारा एकमेव ग्रंथ म्हणजे कुरआन होय. अरब देशांमध्येही अनेक बौद्धिक आणि राजनैतिक उलथापलथी होत आहेत. पण अरेबिक भाषा कुरआन प्रकट झाले तेव्हासारखीच राहिली आहे. अरबांच्या समाजव्यवस्थेतील बदल अरेबिक बोलीत कुठल्याही मार्गाने फेरफार घडवू शकलेला नाही. कुरआन अतीमानवी स्त्रोतापासून आल्याचा स्पष्ट संकेत या वस्तुस्थितीतून मिळतो. प्रेषित मुहम्मदांवर अवतरित झालेल्या कुरआनचे अद्‌भूत रुप पाहण्यासाठी कुणालाही गेल्या पंधराशे वर्षांपेक्षा जास्त मागे जावे लागत नाही.

सामाजिक उलथापालथी -

सामाजिक उलथापालथींचा भाषांवर काय दुष्परिणाम होतो ते लॅटिनच्या उदाहरणांवरुन लक्षात येते. नंतरच्या काळात इटली हे लॅटीनचे केंद्र बनले असले तरी, लॅटीन भाषेचा उगम इटलीतला नाही. खिस्तपूर्व बाराव्या शतकाच्या सुमारास म्हणजेच लोहयुगात युरोपच्या मध्यभागातील टोळ्या आजूबाजूच्या प्रदेशांमध्ये विखुरल्या गेल्या. त्यातील काही जमाती, विशेषतः अल्पाईन टोळ्या इटलीत शिरल्या आणि रोममध्ये व त्याच्या आजूबाजूला स्थिरावल्या. त्यांच्या भाषेची आणि रोम भाषेची सरमिसळ होऊन त्यातून लॅटीन भाषा आकारास आली. खिस्तपूर्व तिस-या शतकात ल्युबस अँड्रॉनिकस याने ग्रीक भाषेतील काही कथा आणि नाटके लॅटीनमध्ये अनुवादित केली. त्यामुळे लॅटीन ही साहित्यिक भाषा बनली. खिस्तपूर्व पहिल्या शतकात रोमन साम्राज्य प्रस्थापित झाले आणि लॅटीन त्याची अधिकृत भाषा ठरली. पुढे खिश्च्यानिटीच्या प्रसाराबरोबर लॅटीन भाषा अधिकाधिक समृध्द होत गेली. तिथे या भाषेला धार्मिक आणि राजनैतिक संस्थांनी पाठिंबा दिला. तर सामाजिक आणि आर्थिक घटकांनी उभारी दिली. युरोपभर लॅटीनचा प्रसार होत होत अखेरीस तिने सगळा प्राचीन युरोप व्यापला. संत ऑगस्टीनच्या काळात लॅटीन पूर्ण भरात होती. अगदी मध्ययुगापर्यंत ती प्रमुख आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून मान्य झालेली होती.

आठवे शतक म्हणजे मुस्लिम विजयाचे पर्व! या काळात रोमनना जबरदस्तीने कॉन्स्टँटिनोपल इथे आसरा घ्यावा लागला. पुढे रोमन साम्राज्याच्या पूर्वार्धाची ती राजधानी बनली. १४५३ साली तुर्कांनी कॉन्स्टँटिनोपलचा ताबा घेतला आणि रोमनना तिथून हुसकाऊन लावले. तो त्यांचा शेवटचा बालेकिल्ला होता. रोमन साम्राज्याच्या पतनानंतर अनेक स्थानिक भाषा जोमाने वाढल्या. त्यात फ्रेंच, इटालियन, स्पॅनिश आणि पोर्तुगिज यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. या सगळ्या भाषा लॅटीनपासून उत्पन्न झाल्याने त्यांच्यावर लॅटीनचा तीव्र प्रभाव होता. पण खुद्द लॅटीन मात्र फक्त रोमन कॅथॉलिक चर्चची अधिकृत भाषा म्हणून जीवित राहिली. बोलण्याची सळसळती भाषा न राहिल्याने तिच्याकडून तांत्रिक, कायदेशीर आणि वैज्ञानिक शब्दांना भाषिक आधार मिळत असला तरी अखेरीस ती फक्त ऐतिहासिक आवडीचा विषय म्हणून राहिली. उदाहरणार्थ, लॅटीन भाषा चांगली अवगत असल्याशिवाय न्यूटनचे 'प्रिन्सिपिया' मुळातून वाचता येत नाही.

प्रत्येक अभिजात भाषेचा प्रवास याच अनुषंगाने झालेला दिसतो.

सामाजिक परिस्थितीनुसार बदलत जाऊन सरतेशेवटी मूळ भाषेतून वेगळ्या, पूर्णपणे बदललेल्या भाषेचा उदय झालेला आहे. मानववंशीय सरमिसळ, राजकीय क्रांती आणि सांस्कृतिक संघर्ष यांचा बाधित व्यक्तींच्या भाषेवर उमटलेला ठसा अबाधित आहे. गेली पंधराशे वर्षे हे घटक अरेबिक भाषेतही कार्यरत आहेत, पण अद्‌भुतरित्या ती अबाधित राहिलेली आहे. अरेबिक भाषेचा हा अद्वितीय लवचिकपणा पूर्णतः कुरआनने तिच्यावर टाकलेल्या अद्‌भुत आकर्षण माध्यमातून आलेला आहे.

इस्लामच्या आगमनानंतर अरब लोक आफ्रिका आणि आशिया खंडाच्या अनेक भागात स्थायिक झाले. त्या ठिकाणी अरेबिकशिवाय इतरही भाषा बोलल्या जात. इथे अरब वंशाची इतर वंशांबरोबर सरमिसळ झाली. तरीही अरबांच्या भाषेवर त्यांचा कोणताही परिणाम झाला नाही. ती मूळ अवस्थेत कायम राहिली. इतर जनसमुहांनी आपली भाषा सोडून अरेबिकचा स्वीकार केल्याचीही उदाहरणे आहेत. इसवीसनाच्या सतराव्या शतकात ज्यू जमातींनी सीरियाचा त्याग करून मदीनेचे नागरिकत्व स्वीकारले. तिथल्या अरब भाषिक अमलिका जमातीशी संपर्क आल्यानंतर त्यांनी अरेबिक भाषा आत्मसात केली. तरीही ते बोलत असलेली अरेबिक भाषा सामान्य अरेबिकपेक्षा वेगळी होती. तिच्यावर हिब्रू भाषेचा प्रभाव होता .

कुरआनच्या प्रकटीकरणानंतर अगदी पहिल्याच शतकात अरेबिक भाषेला अशा प्रकारच्या शक्तींचा सामना करावा लागला ज्यामुळे एखादी भाषा अमुलाग्र बदलून जाते. निरनिराळ्या अरब जमातींमध्ये इस्लामचा प्रसार होऊन त्या प्रमुख मुस्लिम शहरांमध्ये एकवटु लागल्या त्या काळातली ही गोष्ट. भाषेतील चढउतार आणि उच्चारण निरनिराळया जमातींमध्ये निरनिराळे होते. हे वेगळेपण इतके होते की अबू उमर इब्ने अल--उला म्हणतो, ‘हिम्यार जमात आमची भाषा बोलत नाही. त्यांचा शब्दसंग्रह आमच्यापेक्षा अगदी वेगळा आहे.’ उमर इब्न खताब यानी एकदा कुरआनचे पठण करणा-या इसमाला प्रेषितांच्या समोर हजर केले. कुरआनातील वचनांचे त्या अरबाचे उच्चार इतके अपरिचित होते की, तो ईश्वरी ग्रंथाचा कुठला भाग वाचत होता तेच उमर याना कळत नव्हते. प्रेषित एकदा त्यांना भेटायला आलेल्या एका अरब जमातीच्या शिष्टमंडळाबरोबर त्यांच्या बोलीभाषेत संवाद करत होते. त्यावेळची त्यांची भाषा अली यांना विदेशी भाषेसारखी वाटली होती.

या फरकाचे मुख्य कारण म्हणजे उच्चारातील वेगळेपण. याची असंख्य उदाहरणे आहेत. नज्दच्या पूर्वभागात राहणा-या ‘बनू तमीम’

जमातीला 'जे' (जीभ) हे अक्षर उच्चारता येत नसे. त्याला ते य म्हणत असत. त्यामुळे ते मस्जीद (मशीद)ला मसयिद म्हणत. तर शजर (झाड) ला शयत म्हणत. 'क' (काफ) या अक्षराचा उच्चार ते जीम असा करत. त्यामुळे तरीक (रस्ता)ला तरीज, सादिक(मित्र)ला सादीज 'कद्र' आणि 'जद्र' कासीम (वितरक)ला जसीम म्हणत. भाषेच्या सर्वसाधारण प्रवासाचा विचार करता, अशा वेगवेगळ्या बोलीभाषा बोलणा-या जमाती एकत्र आल्यावर अरेबिक भाषेत बदलाची नव्या दमाची प्रक्रिया सुरू होणे अपेक्षित होते. पण तसे झाले नाही. कुरआनने भाषेचा सर्वोच्च प्रभावी वापर केल्याने अरेबिक अशा बदलापासून सुरक्षित राहिली. इथे काय घडले त्याचे वर्णन करताना डॉक्टर अहमद हसन झयत म्हणतात :

"इस्लामच्या आगमनानंतर अरेबिक भाषा कुठल्या एका राष्ट्राची मक्तेदारी राहिली नाही. इस्लामच्या श्रद्धेत प्रवेश करणा-या सगळ्यांसाठी ती आपलीशी होऊन गेली."

नंतर या अरब मुस्लिमांनी आपली मातृभूमी सोडली आणि पूर्वेकडील कशघरपासून पश्चिमेकडील जिब्राल्टरपर्यंतच्या भूभागावर त्यांनी कब्जा केला. ज्यांच्याशी त्यांचा संपर्क आला ते लोक पर्शियन, किबती, बर्बर, हिब्रू, ग्रिक, लॅटीन, अरॅमाईक आणि सुरयानी भाषा बोलणारे होते. यातील काही राष्ट्रे राजकीय आणि सांस्कृतिकदृष्ट्या अरबांपेक्षा प्रगत होती. अरबांचा प्रवेश झालेला असाच एक देश म्हणजे इराक. इराक हा एका प्राचीन संस्कृतीचा बालेकिल्ला आणि प्रमुख जमातींचा सांस्कृतिक केंद्रबिंदू होता. ते इराणी लोकांमध्ये मिसळले. हे इराणी जगातल्या दोन महासत्तांचे प्रमुख होते. अत्यंत प्रगत रोमन संस्कृती आणि विस्तारणारा ख्रिश्चन धर्म या दोन शक्तींचा सामना अरबांना करावा लागला. त्यांनी व्यापलेला एक देश सीरिया. सीरियाच्या साहित्यावर आणि नीतिशास्त्रावर फेनिशियन, घसानीड, ग्रीक, इजिप्तशीयन आणि कॅनानियन परंपरांचा प्रभाव अभेदच होता. त्यानंतर त्यांनी इजिप्तचे सिंहासन बळकावले. इथे पौर्वात्य आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा संगम झालेला होता. हे घटक अरेबिक भाषा बदलण्याला अगदी पुरेसे होते. इतर घटकांनी त्यांचा प्रभाव दाखवला होता. पण अरेबिक भाषेच्या बाबतीत कुरआनने त्यांचा प्रभाव निष्प्रभ करून टाकला. कुराआन हा साहित्यिक उत्कृष्टतेचा असा अतुल्य नमुना आहे, की भाषेवरची त्याची हुकूमत कुठल्याही बळामुळे झाली नाही.

इस्लामच्या या विजयानंतर अरेबिक भाषा कुठल्या एका जनसमुहाच्या मालकीची राहिली नाही, तर अनेक राष्ट्रांची आणि अनेक

वंशांची बनली. आशिया आणि आफ्रिका खंडातील बिगर - अरेबिकांनी (अजामिस) इस्लामचा स्वीकार केला आणि हळुहळु अरेबिक भाषाही आपलीशी केली. साहजिकच नव्याने धर्मांतरित झालेले हे लोक मूळच्या अरबासारखी सफाईदार भाषा बोलत नसत. शिवाय या नव्या सहधर्मियांच्या भाषेचा परिणाम अरबांवरही होत असे. विशेषतः मोठ्या, बहुसांस्कृतिक शहारांमध्ये अरेबिकची अधोगती ठळकपणे दिसणारी होती. अशा ठिकाणी निरनिराळ्या वंशांचे लोक मोठ्या प्रमाणात एकत्र येत. भाषिक बदलांना ज्यांना थेटपणे भिडावे लागले, अशा सर्वसामान्यांनी सुरूवातीला भाषेतल्या सूक्ष्म बदलांकडे फारसे लक्ष दिले नाही. पण सांस्कृतिक गाभा इतका सुरक्षित राहिला नाही. झियाद इब्ने ऊमैयाच्या दरबारात येऊन एकदा एक इसम जोरजोरात शोक करू लागला की, 'लहान मुलांना निराधार करून आमचे वडील वारले'. इथे वडील आणि मुले या दोन्ही शब्दांचे उच्चार व्याकरणाच्या दृष्टीने चुकीचे होते. अशा प्रकारच्या चुका सतत होत असत. पण अरेबिक भाषा तत्त्वानुसार स्थिर राहिली. कुरआनच्या सर्वोच्च प्रभावाचे कवच असल्याने, बोली भाषेची अधोगती झाली तरी लिखित भाषा भ्रष्ट झाली नाही. कुरआनच्या साच्यात ती सुरक्षित राहिली.

कुरआनच्या अद्‌भुत स्वरूपाची सिद्धता मिळण्यासाठी गेल्या पंधराशे वर्षात अरेबिकवर गुदरलेल्या धक्कादायक अनुभवांवर नजर टाकणे पुरेसे आहे. कुरआनचे संरक्षण लाभले नसते तर अरेबिक भाषा नक्कीच बदलली असती. कुरआनने प्रस्थापित केलेल्या अतुलनीय आदर्शांमुळे प्रमाण अरेबिक अविचल मापदंड बनून राहिली.

हिजरीच्या दुस-या शतकात उमैद राजवटीच्या पराभवामुळे अरेबिक भाषेवर खूप मोठे संकट कोसळले. उमैद ही शुद्ध अरेबिक राजवट होती. अरब राष्ट्रवाद्यांच्या खंद्या समर्थनामुळे त्या राजवटीत अरेबिक साहित्याला आणि भाषेला इतकी बढत दिली गेली की तो पक्षपात वाटावा. दमास्कस इथे त्यांची राजधानी वसली होती. त्या काळात सैनिकी आणि नागरी अशा दोन्ही प्रशासनांची सूत्रे अरबांच्या हातातून हिरावून घेतली. इराणींच्या पाठिंब्यामुळे इथले राज्य अब्बासिदांच्या ताब्यात आले होते. त्यामुळे तिथल्या प्रशासनावर इराणींचा तीव्र प्रभाव अटळ होता. या प्रभावामुळे राजधानी दमास्कसहून पर्शियाच्या उंबरठ्यावर बगदाद इथे आणली गेली. हे अब्बासिद प्रशासकीय घडामोडींमध्ये इराणींना झुकते माप देत, तर अरबांकडे आणि त्यांच्या संस्कृतीकडे दुर्लक्ष करत. उमैद राजवट अरबांना प्राधान्याने उच्च पदे देत असे. पण अब्बासिद राजवट जाणूनबुजून त्यांना दुबळे करण्याचा प्रयत्न करू

लागली. अशा रीतीने अरबानुनची पक्षपाताला उतरती कळा लागल्यावर इराणी, तुर्की, सिरियन, बिझांटाईन आणि बरबर घटकांना समाजातल्या आणि राज्यातल्या सगळ्या घडामोडींचा ताबा घेणे शक्य झाले. अरब आणि बिगरअरब यांच्यात रोटीबोटी व्यवहार होऊ लागले. आर्यन आणि सेमिस्टिक संस्कृतींचा मिलाफ झाल्याने अरेबिक भाषेवर आणि संस्कृतीवर संकट कोसळले. याच पर्शियातील काळात सम्राट आणि राजांचे वारसदार त्यांच्या वाडवडिलांच्या संस्कृतीच्या जिर्णोद्धारासाठी पुढे सरसावले.

या घडामोडींचा अरेबिक भाषेवरचा प्रभाव फार महत्वाचा होता. मुतन्नबी (इ.स.९१५ - ९६५) या कवीच्या हयातीत अरेबिक भाषा कुठल्या अवस्थेत पोहचली होती हे त्याच्या पुढील ओळींवरुन लक्षात येते. इराणी इमारतींनी बाकी सगळ्या सौंदर्यावर मात केली. जसा वसंत ऋतु इतर ऋतुंवर मात करतो. अरब तरुणाई ज्या समाजात जात असे, त्या समाजात त्यांचे चेहरे, हात, बोली अपरिचित वाटत असे. समाजबांधवांशी ते सहज संभाषण करायचे, पण इराणींशी बोलताना त्यांना दुभाषी लागायचा. (दीवान अल् मुतन्नबी)

फक्त आणि फक्त कुरआनच्या साहित्यिक थोरवीनेच अरेबिक भाषेला या उलथापालथींच्या कायमच्या खुणांपासून वाचवले. खोल समुद्रात वादळाच्या तडाख्यात सापडलेल्या जहाजाने सुरक्षितपणे बंदर गाठावे तशी अरेबिक भाषा परत एकदा कुरआनच्या आश्रयाला आली.

मुतवक्कील (२०१ - २४७) या खलीफाच्या राजवटीत बिगरअरबांनी विशेषतः इराणी आणि तुर्कांनी प्रचंड मोठ्या संख्येने अरबांच्या प्रदेशात शिरकाव केला. इ.स. ६५६ मध्ये हलाकू खान या मंगोलियन योद्ध्याने बगदादचा ताबा घेतला. पुढे इ.स. ८९८ मध्ये अंदालुसीच्या पराभवानंतर इस्लाम साम्राज्याला आणखी एक हादरा बसला. इजिप्त आणि सीरियावर कब्जा केलेली फातीमिद राजवटही जास्त काळ टिकू शकली नाही. इ.स. ९२३ मध्ये ओटेमन तुर्कांनी अरब साम्राज्याचे मोठाले परगणे त्यांच्याकडून हिसकावून घेतले. एथून पुढे इस्लामिक प्रशासनाचा केंद्रबिंदू कैरोहून कॉंस्टॅंटिनोपलला सरकला. अरेबिकऐवजी तुर्की त्यांची अधिकृत भाषा बनली. या भाषेने विदेशी भाषा आणि वाक्प्रचार मोठ्या संख्येने स्वीकारले.

अरब विश्वाने बिगरअरबी सम्राटांच्या झेंड्याखाली साडेपाचशे वर्षे काढली. पर्शियन, तुर्की आणि मुघल राज्यकर्त्यांनीही अरबी भाषेचे उरलेसुरले अवशेष खोडून काढण्याचे प्रयत्न केले. अरेबिक साहित्य जाळले गेले. अरेबिक शाळा उद्ध्वस्त केल्या गेल्या. अरेबिक विद्वानांची मानहानी

केली गेली. ओटोमन सम्राटांनी अरेबिक - विरोधी मोहीम उघडली. विख्यात समाजसुधारक जमालुद्दिन अफगाणी (१८३८-९७) यांनी या मोहीमेचे वर्णन 'अरबांचे तुर्कीकरण' या समर्पक शब्दात केले आहे. पण यापैकी कुठलेही प्रयत्न अरेबिकच्या चेह-यावर कायमचे वण उमटवू शकतील इतके शक्तीशाली नव्हते. बुखारा आणि बगदादमधल्या तार्तारांनी पॅलेस्टाईन आणि सीरियातल्या धर्मयोद्ध्यांच्या माध्यमातून अरेबिक भाषेवर आणि साहित्यावर जीवघेणे हल्ले केले. नंतरच्या काळात अंदालुसीयातील इतर युरोपियनांनी त्यांचेच अनुकरण केले. इतर भाषांचा इतिहास बघता अरब संस्कृतीवरचे हे आघात अरेबिक भाषा मुळापासून नाहीशी करायला पुरेसे ठरले असते. अरेबिक भाषा इतर भाषांच्या मार्गाने जाईल आणि एखाद्या प्रभावी बोलीभाषेशी मिसळून जाईल अशी अपेक्षा इथे ठेवता आली असती. असे म्हणता येईल, की अरेबिकला तुर्कांचे दुर्लक्ष आणि पर्शियनांचा पूर्वग्रह यांना तोंड द्यावे लागले नसते तर आजही ती संपूर्ण मुस्लिम जगतात बोलली गेली असती. अरब जगतात ती टिकून राहणे हा फक्त आणि फक्त कुरआनच्या अद्‌भुत प्रभावाचा परिणाम आहे. कुरआनच्या महानतेने त्यांना अरेबिकशी जोडून राहणे बंधानकारक केले होते. इब्ने मंझूर (इस ६३०-७११) आणि इब्ने खलदून (इस ७३२-८०८) या दोन सळसळत्या विचारांच्या अरब विद्वानांची मने या परिस्थितीमुळे पेटून उठली. तत्कालीन प्रशासनाला आव्हान देताना त्यांनी लिहिलेले ग्रंथ साहित्यिक आणि शैक्षणिक वर्तुळात उत्कृष्ट कलाकृती म्हणून मान्यता पावले.

नेपोलियनच्या कैरोमधील प्रवेशाने (इ.स. १७९८) मध्य पूर्वेतील देशांमध्ये छपाईचे युग अवतरले. शिक्षण हा त्या काळात परवलीचा शब्द बनला. या दरम्यान अरेबिकमध्ये नवे चैतन्य निर्माण झाले. तरीही शतकांच्या आघातांनी अरेबिकवर खुणा उमटणे क्रमप्राप्त होते. शुद्ध अरेबिकऐवजी अरेबिक आणि तुर्की भाषेचा मिलाप असलेली भाषा इजिप्त आणि सीरियाची अधिकृत भाषा म्हणून स्वीकारली गेली.

इ.स. १८८२ मध्ये ब्रिटिशांनी इजिप्त व्यापल्यावर परिस्थिती पुन्हा एकदा बदलली. त्यांनी सर्वशक्तीनिशी अरेबिकला विरोध केला. शाळांमध्ये इंग्रजी सक्तीचे करण्यात आले. अभ्यासक्रमातून इतर भाषा पूर्णतः वगळल्या गेल्या. फ्रेंचांचे प्रभुत्व असणा-या प्रदेशात त्यांनी हेच केले. वसाहती प्रजाजनांवर त्यांच्या भाषा शिकण्याची जबरदस्ती करत असताना अरेबिक भाषा शंभर वर्षांपेक्षा जास्त काळ इंग्रजी आणि फ्रेंच या भाषांच्या सावलीत जिवंत राहिली. तरीही तिने तिचे मूळचे रूप गमावले नाही. अर्थात, तिने

काही नवे शब्द सामावून घेतलेच - उदाहरणार्थ 'दब्बा' म्हणजे तरणतलाव. पूर्वी हा शब्द मुष्टीयुद्धातल्या ठोश्यांसाठी वापरला जायचा. लिखाणाच्या वेगवेगळ्या शैलीही निर्माण झाल्या. एखाद्याला 'लोक इस्लामचा स्वीकार का करतात' या विषयावर पुस्तक लिहायचे असेल तर त्याचे शिर्षक तो (आम्ही इस्लाम का स्वीकारला) असे ठेवू लागला. पूर्वीच्या काळात मात्र लयबद्ध आणि आकर्षक शीर्षकांना पसंती दिली जायची. अरेबिक भाषेने "डॉक्टर" सारखे अनेक शब्द जसेच्या तसे आपलेसे केले. पण हे बदल फक्त वरवरचे होते. अस्सल अरेबिक मात्र शतकापूर्वी कुरआन प्रकट झाले त्या काळातल्यासारखीच राहिली.

साहित्यिक प्रगती -

एखाद्या भाषेच्या साहित्यिक पटलावर विलक्षण दर्जाचे साहित्यिक क्वचित काळी अवतरतात. असे जेव्हा घडते, तेव्हा त्यांच्या लिखाणाच्या भाषेत काही बदल घडून येतात. कारण त्यांच्या उत्कृष्ट साहित्यकृती लोकप्रिय अभिव्यक्तीच्या पद्धतीवर प्रभाव टाकतात. अशारीतीने भाषा स्थित्यंतरातून सातत्याने प्रगतीकारक उत्क्रांतीच्या स्थितींमधून पुढे सरकत असतात. अखेरीस मूळ रूपापासून त्या फारच वेगळ्या बनतात. पण अरेबिकच्याबाबतीत असे घडले नाही. अरेबिकच्या इतिहासाच्या अगदी सुरुवातीच्या टप्प्यावर कुरआनने ठरवून दिलेले साहित्यिक प्रमाण कायम टिकून राहिले. त्याला कुणीही मागे टाकू शकले नाही. कुरआनानंतर त्याच्याशी तुलना करता येईल अशी उत्कृष्ट साहित्यकृती निर्माण होणार नाही हे विधिलिखित होते. त्यामुळे त्या दैवी वाद्यवृंदाच्या मेळ्यात अरेबिक भाषा अभेद्य राहिली.

आपण इंग्रजीचे उदाहरण घेऊ. इसवीसनाच्या सातव्या शतकात ती फक्त स्थानिक बोलीभाषा होती. गहन बौद्धिक विचार प्रकट करावेत इतका जोम तिने धरला नव्हता. पुढची पाचशे वर्षे हीच स्थिती कायम राहिली. इ.स. १०६६ मध्ये नॉर्मनांनी इंग्लंडचा ताबा घेतला. इंग्रजी भाषेचा जनक जिऑफ्री चॉसर याचा जन्म इस १३४० चा. त्या काळात राज्यव्यवहाराची भाषा फ्रेंच होती. खुद्द चॉसरचेही त्याच्या देशी इंग्रजीखेरीज लॅटीन, फ्रेंच आणि इटालियन भाषांवर प्रभुत्व होते. शिवाय त्याला लाभलेले बुद्धीचे वरदान! यामुळे त्याला इंग्रजी भाषेला शैक्षणिक भाषेचा दर्जा देता आला. अर्नेस्ट हौसरच्या शब्दात सांगायचे झाल्यास त्याने आपल्या 'कँटरबरी' कथांमधून इंग्रजी भाषेला जोरदार बढत दिली. चॉसरने बोलीभाषेला एका भाषेचे रूप

दिले. भविष्यात नव्या दमाच्या प्रगतीसाठी तिचा मार्ग सुकर केला.

सुमारे दोनशे वर्षे इंग्रजी लेखक, कवी चॉसरने दाखवलेल्या मार्गदर्शक तत्त्वांवरून चालत राहिले. विल्यम्‌ शेक्सपियरच्या कालखंडात (इस १५५८-१६२५) इंग्रजीने आणखी एक पाऊल पुढे टाकले. त्याच्या नाटकांनी आणि कवितांनी स्थापित केलेल्या नव्या साहित्यिक मापदंडांनी इंग्रजीला आणखी आगेकूच करण्याची उभारी दिली. पुढे दोनशे वर्षांनी आलेल्या विज्ञानयुगाने समाजाचा प्रत्येक स्तर प्रचंड प्रभावित झाला. भाषा विज्ञानाच्या हुकुमानुसार वागू लागली. पद्यापेक्षा गद्य लोकाप्रिय बनले. कथाकथनापेक्षा वस्तुस्थितीचे दर्शन जास्त परिणामकारक बनले. जोनाथन स्विफ्ट (इस १६६७-१७४५)पासून ते टी.एस. इलीएट (इस १८८८-१९६५) पर्यंतचे डझनवारी लेखक आणि कवी या परंपरेचे पाईक होते. ते इंग्रजी साहित्यातल्या आधुनिक युगाचे निर्माते होते, ज्या युगात आज आपण वावरत आहोत.

इतर भाषांच्या बाबतीतही असेच घडले. नवनवीन लेखक किंवा लेखकांचे गट उजेडात येत राहिले, जे त्यांच्या आधीच्या मंडळींपेक्षा लोकाप्रिय बनत गेले. जेव्हाजेव्हा त्यांचा प्रभाव दिसला त्या प्रत्येक वेळेस त्या भाषेला नवा आवेग लाभला. हळूहळू प्रत्येक भाषा इतकी बदलत गेली, की एखाद्याला त्याच्या मातृभाषेचे प्राचीन रूप शब्दसंग्रहाच्या आणि माहितीपत्रकाच्या मदतीशिवाय कळेनासे झाले.

या वैश्विक प्रथेला फक्त एकच अपवाद आहे आणि तो म्हणजे अरेबिक भाषा. या ग्रंथासारखा ग्रंथ कुणीही लिहू शकणार नाही हा कुरआनचा दावा त्याच्या शब्दाला जागलेला आहे. कित्येक शतकांपासून कुरआन बरोबरीचा ग्रंथ निर्माण करण्यासाठी झालेले निरनिराळे प्रयास बघितल्यावर या वस्तुस्थितीचा आणखी पुरावा मिळतो. अशा सगळ्या प्रयासांचा दुःखद शेवट झालेला आहे. मुसाईलेमा इब्न हबीब, तुलाईहा इब्न ख्वालिद, नदर इब्न अल हारीस, अबु अल अला अल मारी, इब्न अल मुकाफा, अल मुतन्नबी आणि इतर अनेकांनी या विषयात हात आजमावून बघितले. मुसाईलमाने अफलातून संदर्भ दिला होता की गर्भवती स्त्रियांना ईश्वराचे वरदान लाभते आणि तो त्यांचे पोट आणि गर्भाचे आवरण यांच्या मधल्या पोकळीतून जोशपूर्ण जीवन बाहेर काढतो. त्याच्यासह इतरांचे ग्रंथ कुरआनच्या साहित्यिक श्रेष्ठतेपुढे हास्यास्पद ठरलेले दिसतात.

पण 'याच्यासारखा ग्रंथ कुणीही लिहू शकणार नाही' (१७:८८) या कुरआनच्या दाव्याला सगळ्यात जास्त ताकद मिळते ती अरेबिक भाषेमुळे.

या प्रभावाला अर्नेस्ट रेनन कुरआनची 'भाषाशास्त्रीय जादू' असे म्हणतो. इतर अनेक भाषांप्रमाणेच दीर्घ कालखंडात अरेबिक भाषेतही अनेक प्रतिभावंत लेखक आणि कवी होऊन गेले. पण कुरआन प्रकट झाल्यापासून पंधराशे वर्षात त्याच्यापेक्षा वरचढ ठरेल असा ग्रंथ निर्माण करणे कुणालाही जमलेले नाही. त्याच्या प्रमाणात कधीही, काहीही सुधारणा झाली नाही आणि त्यामुळे अरेबिक भाषा कुरआनने ठरवून दिलेल्या मार्गानेच चालत राहिली. कुरआनचा अरेबिकवरचा प्रभाव एखाद्या भाषेच्या इतिहासात अगदी सुरूवातीच्या काळात सर्वोत्कृष्ट ग्रंथनिर्मिती करणा-या साहित्यिकासारखा आहे. अशा आदरणीय ग्रंथाने आपला ठसा उमटवल्यावर कुठलाही कनिष्ठ साहित्यिक भाषेचा तोंडवळा बदलू शकत नाही. अरेबिकच्या प्रवाहात प्रकट झालेल्या कुरआनला अशा प्रगत मुशीतून आकार लाभलेला होता, जशी मूस त्याआधी किंवा नंतर पाहण्यात आली नाही.

व्यक्त होण्या-या पारंपरिक पद्धतींमध्ये महत्वाच्या सुधारणा करत कुरआनने अरेबिक भाषेच्या विस्ताराचा मार्ग खुला केला. कुरआनच्या ११२व्या प्रकरणातला 'एक' (अहद) या शब्दाचा वापर हे याचे उत्तम उदाहरण आहे. या प्रकरणाचे नाव आहे. 'एकच' अर्थात 'अद्वैत'. सुरूवातीच्या काळात हा शब्द 'आमच्यापैकी एक' असे षष्ठीचे रूप दाखवण्यासाठी वापरला जायचा. किंवा आठवड्याचा पहिला दिवस या अर्थाने वापरला जायचा. 'मा जानी अहदुन'- 'मला भेटायला कुणीही आले नाही'- अशी सर्वसाधारण नकारात्मकता दाखवण्यासाठीही वापरला जायचा. पण निर्मात्याचे सर्वश्रेष्ठ ईश्वराचे एक गुणवैशिष्ट्य म्हणून कुरआनने 'अहद' या शब्दाचा अतिशय नाविन्यपूर्ण वापर केला आहे. कुरआनने अनेक विदेशी शब्द अरेबिकच्या वापरात आणले. उदाहरणार्थ, पर्शियनमधला इस्ताब्रक, अबिसिनीयनमधला कसवरा, ग्रिकमधला सिरत, सिरीयनमधला याम, तुर्कीशमधला घसाक, लॅटीनमधला किस्तास, अरमाईकमधला मलाकत, आणि हिंदीमधला कपूर. 'रहमान' या शब्दामुळे मक्केतले मूर्तीपूजक गोंधळले होते असे कुरआन सांगते(२५:६०). 'रहमान म्हणजे काय'? असा प्रश्न ते विचारत. याचे कारण म्हणजे तो शब्द अरेबिक नसून सबाईन आणि हमीरी या भाषांमधून घेतलेला होता. येमेन आणि अबिसिनिया या देशांमधले ख्रिस्ती लोक ईश्वराला 'रहमान' म्हणत. ही भाषाशास्त्रीय माहिती नसल्याने ते रहमानचा अर्थ विचारत. अशा प्रकारचे शंभाराहून जास्त अरेबिक नसणारे शब्द कुरआनात वापरलेले आहेत. ते पर्शियन, लॅटीन, नबातियन, हिब्रू, सीरियन, कॉप्टिक आणि इतर अनेक भाषांमधून घेतलेले होते.

कुरआन प्रामुख्याने कुरेशच्या भाषेत प्रकट झालेले असले, तरी इतर अरब जमतींकडून वापरले जाणारे शब्दही त्यात समाविष्ट आहेत. 'फतीर' हा शब्द कुरआनात दिसल्यावर अब्दुल्ला इब्ने अब्बास हे कुरेशी मुस्लिम बुचकळ्यात पडले होते. त्यांनी म्हटले आहे, "स्वर्ग आणि पृथ्वीचा निर्माता या वाक्प्रचाराचा अर्थ मला कळला नाही. नंतर मी एका अरबाला बोलताना ऐकले की त्याने एक विहीर निर्माण केली आहे. त्याने नुकतेच विहीरीचे खोदकाम सुरू केले होते. त्यावरून 'फतीर' या शब्दाचा अर्थ माझ्या लक्षात आला. अबू-हुरेरा यानी म्हटले आहे, की 'कुरआनातले जोसेफ' हे वाचेपर्यंत 'सिक्कीन' हा शब्द मी कधीही ऐकलेला नव्हता. आम्ही सुरीला नेहमी 'मुदिया' म्हणायचो.

जलालुद्दिन सुयुतीने अल-इतकान मध्ये नोंदवल्याप्रमाणे निरनिराळ्या अरब जमाती अनेक शब्दांचे उच्चार निरनिराळे करत. कुरआनने यातले काही शब्द घेतले आणि जास्तितजास्त प्रगत साहित्यिक स्वरूपात वापरात आणले. कुरआनने अंता ऐवजी आता या शब्दाला पसंती दिली. त्याचप्रमाणे शनातीर ऐवजी 'असावी' आणि 'कता' ऐवजी "'झीब' या शब्दाची निवड केली. शब्दांच्या कुरेशी, पद्धतीला प्राधान्य देण्याची सामान्य प्रथा कधीकधी उलटीही दिसते. उदाहरणार्थ, 'लयालीतकुम मिन आमालीकुम'-'तुमच्या कृत्यांमधले काहीही तुमच्यापासून हिरावले जाणार नाही' हा वाक्प्रचार बनी अब्बास या बोलीभाषेतून उचललेला होता.

जुन्या अरेबिक शब्दांना आणि शब्दसमूहांना नवीन खोली आणि सौंदर्य देताना कुरआनने असा उत्कृष्ट साहित्यिक दर्जा निश्चित केला ज्यात कुठलाही साहित्यिक आणखी सुधारणा करू शकत नाही. कुरआनने त्यांची फेरमांडणी इतक्या प्रभावीपणे केली, जी त्याआधी कधी कानावर पडली नव्हती. जगाची क्षणभंगुरता व्यक्त करताना एका प्राचीन अरब कवीने म्हटले आहे.

"प्रदीर्घ काळ सुरक्षित जीवन जगला तरी प्रत्येक आईच्या मुलाला अखेरीस शवपेटीतून वाहून नेले जाईल. "हीच कल्पना कुरआनातून जास्त भेदक आणि थोडक्यात सांगितली आहे. "प्रत्येक जिवाला मृत्युची चव चाखावी लागेल" (३:१८५). प्राचीन अरेबियामध्ये लूटमार आणि रक्तपात या समस्यांनी उग्र रूप धारण केले होते. 'दुस-याचा जीव घेऊनच हत्या करण्याचा अंत करता येतो'. ही कल्पना व्यक्त करण्यासाठी त्या काळात नवनवीत वाक्ययोजना केल्या गेल्या. इस्लामपूर्व काळात या वाक्यरचना श्रेष्ठ दर्जाच्या मानल्या जात. 'एकाला ठार मारणे म्हणजे इतरांना जीवन देणे',

"अधिकजणांना मारा म्हणजे त्यांच्याकडून मारले जाणे कमी होईल," "जीव घेतल्याने जीव घेण्याचा अंत होतो", ही त्याची काही उदाहरणे होत. कुरआनातून ही कल्पना या शब्दात मांडली आहे 'जाणकार लोकहो, बदला घेण्यात तुमचे जीवन सामावलेले आहे'(२:१७९).

इस्लामपूर्व काळात जगातल्या इतर भाषांप्रमाणे अरेबिक भाषेतही कवितेला महत्वाचे स्थान होते. साहित्यक्षेत्रात काव्यात्मक प्रकटीकरणाला मानाचे स्थान दिले जाई. परंतु कुरआनने ही वाट सोडली आणि काव्याऐवजी गद्याचा वापर केला. यातच कुरआन ईश्वराकडून आले असण्याचा पुरावा आहे. कारण दैवी ग्रंथ चिरकाल टिकावा म्हणून पद्याऐवजी गद्य या माध्यमाची निवड केली जाईल हे इसवीसनाच्या सातव्या शतकात ईश्वराशिवाय आणखी कुणाला माहीत असणार? ईश्वर भूतकाळाबरोबर भविष्यकाळही जाणतो. कुरआन भावी पिढ्यांना उद्देशून सांगितले जाणार होते आणि संवादाचे प्रभावी माध्यम म्हणून काव्याचे महत्व लवकरच कमी होणार होते. कुरआनपूर्वी अलंकारिक भाषा खूप प्रचलित होती. पण साहित्याच्या इतिहासात कुरआनने सगळ्यात आधी अलंकारिक शैलीऐवजी वास्तवदर्शी शैलीचा वापर केला. पूर्वी साहित्य निर्मितीचे सगळ्यात जास्त प्रचलित विषय होते ते सैनिकी आणि प्रणयरम्य कथांचे. याउलट कुरआनने जास्त विस्तारित पट उलगडून दाखवला. त्याच्या आवाक्यात नैतिक, कायदेशीर, वैज्ञानिक, मानसशास्त्रीय, आर्थिक, राजकीय, आणि ऐतिहासिक महत्वाचे विषय सामावलेले होते. प्राचीन काळी भावना प्रकट करण्यासाठी तात्पर्यकथांचा वापर खूप लोकप्रिय होता. इथेही कुरआनने नवीन मार्ग निवडला. माहिती सांगण्यासाठी थेट पद्धत अवलंबली. कुरआनने अनुसरलेली बुद्धिनिष्ठ विश्लेषणाची पद्धतही कुरआनपूर्वी काळापेक्षा लक्षणीय वेगळी होती. या आधी जगाला निव्वळ सैद्धांतिक, सारखेपणावर आधारित तर्काची माहिती होती. तिथे कुरआनने अनुभवसिद्ध, वैज्ञानिक तर्क दिला. या सगळ्या पराक्रमांचे शिखर म्हणून कुरआनने हे सगळे अशा सुधारित शैलीत सादर केले, जी शैली भविष्यात अविनाशी ठरली.

'सगळ्यात जास्त खोटे बोलते ती सगळ्यात गोड कविता' असा एक प्राचीन अरेबियन वाक्प्रचार होता. हे बदलून कुरआनने 'स्पष्ट वक्तव्याची' (५५:४) नवीन पद्धती रूढ केली. ती अनुमानित कल्पित कथांऐवजी पडताळणी योग्य वस्तुस्थितीवर आधारित होती. आता अरेबिक कुरआनच्या नेतृत्वाने चालू लागली होती. याला अनुसरून अरेबिक साहित्य गोळा करून संग्रहित करण्यात आले. हे करत असताना कुरआनची भाषा

समजून घेऊन ती जतन करण्याचे भान राखले गेले. कुरआनचे शिक्षण घेण्यासाठी अनेक विभाग उघडले गेले. त्यातून कुरआन समजून घेऊन त्यातील आज्ञांचे आणि मज्जावांचे खुलासे मिळवण्याला चालना दिली गेली. कुरआनचा संदेश कळण्यात मदत व्हावी या उद्देशाने अरेबिक व्याकरण, वाक्यरचना, शब्दांचा उगम आणि विकास सांगणारे व्युत्पत्ती शास्त्र, इस्लामिक ईश्वरशास्त्र आणि परंपरा यांच्या जोडीने कुरआनचा अभ्यास केला गेला. अगदी इतिहास आणि भूगोल हे विषयही मुळातून अरबांनी कुरआनच्या शिकवणी समजून घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा भाग म्हणून घेतले. फक्त एका ग्रंथाचा एका जनसमूहावर आणि त्यांच्या भाषेवर इतका प्रचंड प्रभाव असण्याचे उदाहरण जगाच्या इतिहासात कुठेही नाही.

अरेबिक भाषेत सुधारणा घडवून त्यातून तिचा विकास केल्याने कुरआन उत्कृष्ट साहित्यिक कलाकृती आहे. अरेबिक साहित्यातला कुठलाही ग्रंथ आणि कुरआन यांच्या शैलीची तुलना करून अरेबिक जाणणा-यां कुणालाही कुरआनच्या अद्वितीय दर्जाला मान्यता देता येईल. कुरआन अशा दैवी शैलीत लिहिले गेले आहे, जी माणसाच्या कल्पनेपेक्षा फारच श्रेष्ठ आहे. ईश्वरी ग्रंथ आणि माणसाने लिहिलेला ग्रंथ यांच्यातील फरक स्पष्टपणे रेखाटणा-या एका कथेचे स्मरण करून आपण हे प्रकरण संपवू. शेख तंतवी यांच्या कुरआनवर भाष्य करणा-या ग्रंथातून ही कथा घेतलेली आहे. 'अल् जवाहीर फी तफसीर अल् - कुरआन अल् - करीम' हा तो ग्रंथ.

तंतवी लिहितात, "१३ जून, १९३२ रोजी इजिप्शियन लेखक कामिल गिलानी यांची भेट झाली. त्यांनी मला एक अद्‌भुत कथा सांगितली. एके दिवशी ते फिंकल या अमेरिकन प्राच्य पंडीताबरोबर होते. या दोन्ही स्नेह्यांना उच्च बुद्धीमत्ता लाभलेली होती. हे फिंकल महाशय गिलानींच्या कानात कुजबुजले,"मला सांगा, आजही तुम्ही कुरआनला अद्‌भुत ग्रंथ मानणा-यांपैकी आहात?" अशा विश्वासाची खिल्ली उडवणारे हास्यही त्यांनी केले. त्यांचे मत होते,मुस्लिम आंधळ्या विश्वासाने अशी श्रद्धा ठेवतात. त्याला कुठलाही भक्कम, वस्तुनिष्ठ विवेकाचा पाया नसतो. आपला घाव खरंच वर्मी बसलाय असे वाटून फिंकल स्वतःवर खुश झालेले दिसले. त्यांची ही अवस्था बघून गिलानीही हसू लागले. त्यांनी सांगितले,"कुरआनच्या शैलीवर कुठलेही भाष्य करण्याआधी आपण हे बघितले पाहिजे, की त्याच्याशी तुलना करता येईल असे काही आपण लिहू शकतो का ? माणूस कुरआनशी तुल्यबळ असे लिहू शकतो का हे तेव्हाच ठरवता येईल जेव्हा आपण तसा प्रयत्न करून

बघू!"

गिलानी यांनी फिंकलना कुरआनातला एक विचार अरेबिकमध्ये आपल्या सोबतीने मांडण्याची विनंती केली. त्यांनी निवडलेला विचार होता. नरक अतिशय विशाल आहे. फिंकलनी त्यांची विनंती स्वीकारली. दोघे कागद लेखणी घेऊन लिहायला बसले. दोघांनी मिळून त्यावर सुमारे वीस वाक्ये अरेबिकमध्ये लिहीली. त्यांनी लिहीलेल्या वाक्यांपैकी काही वाक्ये अशा स्वरूपाची होती. 'नरक अफाट आहे', "नरक तुमच्या कल्पनेपेक्षा अफाट आहे", "माणसाच्या बुद्धीला नरकाच्या विशालतेचे आकलन होऊ शकत नाही." हा विचार व्यक्त करणारी वाक्ये आठवायचे थांबेपर्यंत त्यांचा प्रयत्न चालू होता. गिलानींनी विजयी मुद्रेने फिंकल यांचेकडे बघीतले. "आपण शक्य ते सगळे प्रयत्न केले आहेत. तेव्हा आता कुरआन माणसाच्या कामापेक्षा वरचढ कसे ते आपल्याला बघता येईल. ते गिलानींनी सूरःह काफमधील हे वचन म्हणून दाखवले. 'निवाड्याच्या दिवशी आम्ही नरकाला विचारू, "तू पूर्ण भरलेला आहेस का? "त्यावर नरकाचे उत्तर असेल, "आणखी कुणाला पाठवायचे आहे का? (५०:३०). हे वचन ऐकून फिंकल थक्क झाले.

त्यांनी मोकळेपणाने पराभव मान्य केला. "तुमचे बरोबर आहे, अगदी बरोबर आहे. मी पराभव खुल्या मनाने मान्य करतो." गिलानींनी त्यांना उत्तर दिले,"तुम्ही सत्याला मान्यता देताय यात काही विशेष नाही. कारण तुम्ही सुशिक्षित आहात. भाषेतील शैलीचे महत्व तुम्ही चांगले जाणता." फिंकल हे प्राच्यपंडित इंग्रजी, जर्मन, हिब्रू आणि अरेबिक या भाषांमध्ये पारंगत होते. आयुष्यभर ते या भाषांमधल्या साहित्याचा अभ्यास करत राहिले.(शेख अल्-तंतवी अल्-जुहारी, अल् जवाहीर-फी तफसीर अल्-कुरआन अल् करीम भाग २३.- पान क्रमांक १११-१२)

प्रकरण ३

कुरआन : ईश्वराची हाक

अलिकडेच मी मार्क्सवाद अगदी सविस्तर अभ्यासत होतो. त्यावरून माझे मत बनले की मार्क्स अद्वितीय बुद्धिमत्ता आणि चैतन्य असणारा विद्वान होता. इतिहासाच्या दस्तऐवजात अशी बुद्धिमत्ता लाभणारे फार थोडे असतील. तरीही, माणसाच्या स्थितीत सुधारणा घडवण्याचे ध्येय ठरवून त्याने या उपाययोजना सुचवल्या. मात्र त्याच्या मूर्खपणाशी कशाचीच तुलना करता येत नाही. हे असे का घडले असेल? याचे मुख्य कारण म्हणजे त्याने कुरआनचा अभ्यास केला नव्हता. तो ज्ञानाच्या महान स्त्रोताकडे गेला नव्हता. हे ज्ञान नसेल तर माणसाच्या अस्तित्वात झालेल्या स्थित्यंतरांविषयी ठाम आणि निश्चित मते मांडता येणार नाहीत. विश्व ही एक गूढ घटना असून हे गूढ फक्त कुरआनच उलगडू शकते, दुसरा कुठलाही ग्रंथ नाही, हे मान्य केलेच पाहिजे. ईश्वरी ग्रंथाच्या साक्षात्काराशिवाय कुठल्याही मर्त्य जैवविविधतेचे आणि विश्वाचे गूढ उकलू शकत नाही.

आपण घेतो त्या औषधांबरोबर त्याचे माहितीपत्रक असते. कुठले रोग बरे होऊ शकतात, त्यांचे सेवन कसे करावे आणि त्यांचे मूलभूत घटक कोणते ही माहिती त्यातून मिळते. पण या जगात माणूस अशा अवस्थेत जन्माला येतो जिथे त्याला ना तो कोण आहे हे माहित असते ना त्याला इथे कशासाठी पाठवलय हे माहित असते. त्याच्याकडे तसे माहितीपत्रक नसते, त्याला दिशा दाखवण्यासाठी पर्वतशिखरांवर फलक लावलेले नसतात. त्याच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील असे काहीही त्याच्याकडे नसते. त्यामुळे त्याने स्वतःविषयी , पृथ्वीविषयी आणि आकाशाविषयी चमत्कारिक निष्कर्ष काढले. जीवनाच्या महत्वाच्या वास्तवाचे ज्ञान नसल्यामुळे हे घडले आहे. आपली स्वतःची चाचपणी करताना त्याला जाणवते, की स्वतःमध्ये बौद्धिक आणि शारीरिक शक्तीचा अद्‌भुत मिलाफ झाला आहे. तरीही, ना तो स्वतःच्या इच्छेने अस्तित्वात येऊ शकतो, ना स्वतःच्या निर्मितीत त्याचा कसला सहभाग असतो. नंतर तो स्वतःच्या बाहेरील जगाकडे बघतो, त्याचे निरीक्षण करतो. या विश्वाचा पसारा इतका अफाट आहे की , ना तो त्याच्या आवाक्यात येतो, ना तो त्याला पार करू शकतो. त्यातल्या अगणित संपत्तीची त्याला मोजदादही करता येत नाही. हे सगळे काय आहे आणि हे इथे का आहे? या जगाची सुरूवात कुठून होते आणि त्याचा शेवट कुठे होतो? या

सगळ्या अस्तित्वाचा हेतू काय? या विषयांमध्ये आपण अंधारात बुडून गेल्याचे त्याच्या लक्षात येते. अर्थात माणसाला डोळे दिले गेलेत, पण ते काय करू शकतात? वस्तूंचा बाहेरील भाग बघू शकतात. त्याच्याकडे बुद्धिमत्ता आहे,पण त्या बुद्धिमत्तेची अडचण म्हणजे तो स्वतःलाही ओळखत नाही. विचारांचा मानवी मनात प्रवेश कसा होतो किंवा मनाचे कार्य कसे चालते हे त्याला आजपर्यंत शोधता आलेले नाही. अशा अपु-या कार्यक्षमतेनिशी ना तो स्वतःविषयी काही ठाम निष्कर्ष काढू शकतो, ना विश्वाला समजून घेऊ शकतो.

हे कोडे सोडवले ते ईश्वराच्या ग्रंथाने. आज कुरआन हा आकाशाखालील असा एकमेव पवित्र ग्रंथ आहे ज्याच्याविषयी आपण पूर्ण विश्वासाने म्हणू शकतो, की तो आपल्याला जीवनातल्या सगळ्या वास्तविकतांचे निश्चित ज्ञान देतो. ईश्वरी ग्रंथाचा संदर्भ न घेता विश्वाचा अर्थ समजू पाहणारे हत्तीच्या निरनिराळ्या अवयवांना स्पर्श करून तो कसा आहे ते शोधू पाहणा-या आंधळ्यासारखे आहेत. त्याच्या पायाला स्पर्श करणा-याला हातात खांब आल्यासारखे वाटेल. कानांना स्पर्श करणा-याला ते सुपासारखे वाटतील. पाठीला स्पर्श करणा-याला सपाट पृष्ठभाग, शेपटीला स्पर्श करणा--याला साप आणि पोटाला स्पर्श करणा-याला मोठ्या व्यासाचा पाईप हातात आल्यासारखे वाटेल. पण या सगळ्यात तो हत्ती कुठे आहे? या आंधळ्या लोकांनी त्यांना मिळालेले निष्कर्ष एकत्र केले तरीही त्यांना बरोबर उत्तर मिळणार नाही. सगळ्या नास्तिक तत्त्वज्ञांसमोरचा आणि विचारवंतांसमोरचा हा कायमचा पेचप्रसंग आहे. विश्वाचे वास्तव समजून घेण्याच्या प्रयत्नात, ज्ञानाचे मार्गदर्शन मिळवण्यात ते अपयशी ठरले आहेत. परिणामी त्यांनी काढलेले निष्कर्ष अशा माणसाचे आहेत, जो अंधारात चाचपडत भोवतालचे स्वरूप समजून घेण्यासाठी नुकसानकारक असे स्वैर अंदाज बांधतोय. त्याला ख-या अर्थाने ते कधीच समजू शकत नाही.

या जगात असे लोक आहेत, ज्यांनी सत्याचा दीर्घ शोध घेण्यासाठी सगळे जीवन खर्ची घातले आहे. तरीही त्यात अपयश येऊन त्यांनी जीवनाचा शेवट करण्याचे टोकाचे पाऊल उचलले आहे. याशिवाय आणखी काहीजण असे आहेत, ज्यांनी सत्य शोधायचा प्रयत्न तर केलाय, पण ते सापडू न शकल्याने शुद्ध तर्कावर आधारित बनावट तत्त्वज्ञानावर त्यांनी स्वतःचे समाधान करून घेतले आहे. यापैकी पहिल्या प्रकारातल्या माणसांनी सत्याच्या स्वरूपाचा अंदाज बांधला. नंतर तो नाकारला आणि मग स्वतःच्या अंतिम अपयशावर वैतागून या मायावी जगातून माघार घेतली. दुस-या

प्रकारातल्यांनी त्यालाच विवेक मानले. त्यावरून आपले आडाखे बांधले आणि ते सत्य म्हणून जगासमोर मांडले.

दोन्ही गटांना खरे ज्ञान मिळाले नाही. कारण या सत्याच्या मूळ रक्षकाच्या मदतीशिवाय जीवनाचे गुपित कुणालाच कळू शकत नाही. माणसाला विचार करण्याची आणि समजण्याची क्षमता लाभली आहे हे तर खरेच, पण ही क्षमता प्रकाशाचा बाह्य उगम असेल तरच बघू शकणा-या डोळ्यांपेक्षा किंचित बरी म्हणता येईल. गर्द काळोखात याच डोळ्याला समोरचे काहीही बघता येत नाही. प्रकाश असेल तरच सगळे स्वच्छ दिसते. माणसाच्या बुद्धीलाही या डोळ्यांसारखी प्रकाशाची गरज असते. तिला कायम काळोखात चाचपडत रहायचे नसेल तर ईश्वराच्या साक्षात्काराचा प्रकाश लागतो.

माझा एक विद्वान मित्र एकदा म्हणाला होता, की शिक्षण - गृहित धरले जाते. पुस्तक वाचून आणि विद्यालयातून व विश्वविद्यालयातून पदव्यांची भेंडोळी गोळा करून शिक्षण मिळवता येत नाही. शिक्षणाच सर्वश्रेष्ठ स्वरूप श्रद्धेत सामावले आहे. कुरआनही असेच म्हणतो की,'ईश्वराला घाबरून राहणारे शिक्षित असतात'. पण याचे वैशिष्ट्य आणि महत्व त्याला कळले नव्हते. मग मी त्याला सांगितले, "कार्ल मार्क्सला अर्थशास्त्रातला 'प्रेषीत' मानले जाते. पण आज ईश्वराच्या कृपेने जे खरे ज्ञान आहे यातले कणभरही त्याच्याकडे नव्हते. त्या काळात जगातील मूठभर सरंजामदारांकडे आणि बलाढ्य ऊद्योजकांकडे उपलब्ध संपत्तीतला विषम प्रमाणातला वाटा एकवटला होता. बहुतांश लोक मात्र सदैव दारिद्र्यात रहात असत. या परिस्थितीवरून मार्क्सने काढलेला निष्कर्ष असा होता की, या विषमतांच्या मुळाशी काय असेल तर त्या काळची मालकीहक्काची व्यवस्था. त्याच्या मते या व्यवस्थेत वस्तूंचे उत्पादन होत होते ते उत्पादकांच्या वापरासाठी नाही तर त्या वस्तू विकून उत्पादकांना नफा मिळवता यावा म्हणून! यामुळे विशेषहक्क मिळालेल्या फार थोड्या लोकांना दरोडेखोरासारखे वागण्याची परवानगी दिली गेली. त्यांनी मग स्वतःचा नफा वाढवला आणि आलेल्यांचे नुकसान करत आपली संपत्ती वाढवली. यावर मार्क्सने सुचवलेला उपाय होता तो मालकीहक्क मुळापासून उखडून टाकून संपत्ती जमवण्याची साधने सार्वजनिक विभागाकडे सोपवण्याचा. यातून प्रशासनाकडे संपत्तीच्या निर्माणाच्या आणि वाटपाच्या सार्वजनिक व्यवस्थेचे संघटनाद्वारे सगळ्यांचे हित जपले जाणे अपेक्षित होते.

हा उपाय योजेपर्यंत आवश्यक ते भांडवल असणारे प्रचंड नफा कमवू

शकत होते. त्यांचाकडचा निधी सार्वजनिक संपत्तीत रूपांतरित करण्यासाठी त्याचा संपूर्ण ताबा प्रशासनाकडे देण्यात नेमका फायदा तो काय?, हा प्रश्न इथे उपस्थित झाला. लोकांच्या या नव्या गटात सगळे प्रशासनाचे सदस्य असणार होते. तेही एकेकट्या भांडवलदारांसारखे लोभाला बळी पडू शकले असते. आपल्याला सैनिकी आणि कायदेशीर सत्ता मिळावी या हेतूने तेही पूर्वीच्या भांडवलशहांसारखे वागू शकले असते. मार्क्सचा सूक्ष्म अभ्यास असा होता की मालकीहक्काच्या व्यवस्थेत मत्सराचा दोष होता आणि त्यातून निर्माण होणा-या संधींनी लूटमारीला मोकळे रान मिळवून दिले होते. त्याच्या मते साम्यवादी समाजात असे सामाजिक दोष नाहीसे झाले असते. मी माझ्या मित्राला विचारले, "आता मला सांगा, कार्ल मार्क्सच्या विचारांची ही पद्धत बरोबर होती का?" तो म्हणाला, "नक्कीच नाही! माणसाला क्रूर आणि स्वार्थी वृत्तींपासून दूर ठेवू शकेल अशी एकमेव गोष्ट म्हणजे मृत्युनंतरच्या जगात जाब द्यावा लागेल याची जाणीव!" मी म्हटले, "हे या समस्येचे खरे उत्तर आहे. कार्ल मार्क्सच्या स्वरचित सिद्धांताने क्रूरता आणि दडपशाही जास्तच वाढली. राजकीय आणि आर्थिक सत्तांमध्ये हुकूमशहांचा आणि भांडवलशहांचा वाटा असण्याच्या काळापेक्षा त्यांचे प्रमाण वाढले होते. या साम्यवादी व्यवस्थेत हुकूमशहा आणि भांडवलशहा या दोघांची सत्ता एकत्र गोळा झाली. तिचा त्रास सोसावा लागला तो सामान्य माणसाला."

ज्या ज्या तत्त्ववेत्त्यांनी विश्वाचे कोडे सोडवण्यासाठी अपार प्रयत्न केले ते ईश्वराच्या संदर्भाशिवाय. सगळे याच ठिकाणी फसले. कार्ल मार्क्सप्रमाणे अडचणी त्यांच्यासमोरही आल्या. त्यांची विचारसरणी अभ्यासल्यावर इतके थोर विद्वान अशा सूचना कशा काय देतात? याने कुणालाही धक्का बसेल. त्यांची गत चाचपडत हत्तीला ओळखण्याचा प्रयत्न करणा-या असंख्य लोकांसारखी आहे. हत्ती म्हणजे चार खांब किंवा हत्ती म्हणजे झाडांची चार खोडे असा त्यांचा निष्कर्ष असतो. जीवनाची आणि विश्वाची चिकित्सा ईश्वरी ग्रंथाच्या उजेडातून केली तरच सगळ्या वस्तू स्पष्टपणे, त्यांच्या ख-या रूपात दिसू लागतात. मग अगदी सामान्य वकूबच्या व्यक्तीलाही गोष्टींमधले, वस्तूंमधले सत्य कळण्यात अडचण येत नाही. पहिल्या दृष्टिक्षेपातच तो सरळ विषयांच्या गाभ्यापर्यंत पोहोचतो. हे ज्ञान नसणा-यांसाठी मात्र जग म्हणजे फक्त चक्रव्यूह असते. या चक्रव्यूहात ते हरवलेपणाच्या, अस्वस्थपणाच्या भावनेने भरकटत राहतात.

मानवाने शोधलेल्या विज्ञानांचे आपल्यावर फार उपकार आहेत. तरीही त्यांच्याकडून आपल्याला जास्तितजास्त परिपूर्ण ज्ञान मिळते, ते विश्व

काय आहे याचे! हे विश्व जसे आहे तसे ते का आहे? याबद्दलच्या ज्ञानाचा मात्र एखादा कवडसाही त्यांनी आपल्याला दिलेला नाही. काही वायू, खनिजे आणि क्षार एकत्र करा आणि जिवंत, चालताफिरता माणूस मिळवा. जमिनीत बिया पेरा म्हणजे झाडे उगवतील. फक्त अणूसंख्येत बदल करा म्हणजे असंख्य मूलद्रव्ये निर्माण होतील. पाण्यासारखी सगळ्यात मौल्यवान उपयोगी वस्तू फक्त दोन वायूंपासून तयार करता येते. पाण्याच्या अंतरंगातल्या रेणूंच्या हालचालींतून निर्माण केलेली ऊर्जा निर्जीव यंत्राला हालचालींची ताकद देते. अणूंच्या गर्भातले इलेक्ट्रॉन्स इतके सूक्ष्म असतात, की सूक्ष्मदर्शकातूनही पाहता येत नाहीत. पण त्यांच्यातूनही पर्वतांच्या चिंधड्या उडवू शकेल अशी विराट शक्ती निर्माण होऊ शकते. ही सगळी वस्तुस्थिती आहे. वैज्ञानिक घटना नक्कीच वर्णनाबरहुकुम घडतात. पण हे वर्णन म्हणजे आपल्या वैज्ञानिक ज्ञानाची शेवटची मर्यादा असते. या गोष्टी अशा का आहेत आणि त्या अशा का घडतात असे प्रश्न पडल्यावर मानवी विज्ञान थोडेही मार्गदर्शन देत नाही.

खगोलशास्त्रीय अभ्यासातून असे दिसते, की आपल्या ग्रहावरच्या सगळ्या किनारी प्रदेशातल्या सगळ्या वाळूच्या कणांइतकी आकाशातल्या ता--यांची संख्या अमर्याद आहे. काही ता-यांचा आकार आपल्या पृथ्वीपेक्षा खूप मोठा असून काहींचा विस्तार इतका प्रचंड आहे, की त्यांच्यावर शेकडो, हजारो पृथ्वी सामाऊ शकतील आणि तरीही जागा शिल्लक राहील. त्यांच्यापैकी काहींवर तर लक्षावधी ग्रह सामावू शकतील. हे विश्व इतके अफाट आहे, की आपल्या कल्पनेतल्या जास्तीतजास्त वेगाने, म्हणजेच प्रकाशाच्या वेगाने (१८६, २८२ मैल प्रती सेकंद) जाणा-या विमानाला विश्वाभोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करायला सुमारे शंभर कोटी वर्षे लागतील. इतका अफाट परीघ असला तरीही, हे विश्व अचल नाही, तर सतत विस्तारत आहे. हे विस्तारणे इतके वेगवान आहे की, एडिंग्टन च्या एका संशोधनानुसार, प्रत्येक तेरा हजार लाख वर्षांनी या विश्वातली अंतरे दुप्पट होतात. म्हणजेच, आपल्या कल्पनेतले प्रकशाच्या वेगाने जाणारे विमान विश्वप्रदक्षिणा कधीच पूर्ण करू शकणार नाही. कारण अंत नसणा-या विस्ताराशी त्याला जुळवून घेता येणार नाही. विश्वाच्या अफाटतेचे हे मोजमाप आईनस्टाईनच्या सापेक्षता सिद्धांतावर आधारलेले आहे. पण हा झाला फक्त गणिती अंदाज. खरी परिस्थिती अशी आहे की, विश्वाचा अफाट विस्तार अजून माणसाला कळलेला नाही.

माणसाने लावलेले शोध आपल्याला या थक्क करून सोडणा-या

विश्वासमोर आणतात आणि तिथेच सोडून देतात. ते आपल्याला विश्वाचा खरा अर्थ सांगत नाहीत. घटना घडण्यामागची कारणे ते आपल्याला सांगत नाहीत. ते आपल्याला हेही सांगत नाहीत की अवकाशाच्या पसा-यात फिरणा-या प्रचंड मोठ्या गोलकांचे नियंत्रण कुणाच्या हातून होते? या प्रश्नांची उत्तरे हवी असतील तर आपल्याला कुरआनकडेच जावे लागेल. वस्तू अस्तित्वात कशा येतात, टिकून कशा राहतात आणि त्यांचे भवितव्य काय याची माहिती हवी असेल तर फक्त कुरआनच सांगू शकेल. हे सांगत असताना तो ईश्वराशी आणि या विश्वाच्या स्वामीशी आपला परिचय करून देईल. त्याच्या कार्यांचे उदात्त स्वरूप आपल्याला उलगडून दाखवेल.

कुरआनकडे ईश्वराच्या सार्वभौमत्वाचा शाब्दिक पुरावा आहे. जगभरात सक्रीय असणा-या त्या महान, सुप्त, आणि निर्यायक शक्तीविषयी तो आपल्याला सर्वशक्तीनिशी स्पष्टपणे सांगतो. भौतिकपलीकडच्या ज्या वस्तुस्थिती आपल्याला धडधडीत चकवा देतात त्यांच्याविषयी तो निश्चित माहिती देतो. तो केवळ फक्त अस्तित्वाच्या वस्तुस्थितीविषयी ठामपणे सांगतो असे नाही तर आजपर्यंत अदृश्य असलेल्या शब्दचित्रांची अद्‌भुत मालिका डोळ्यांसमोर साक्षात उभी करतो.

हा पवित्र ग्रंथ 'ईश्वराचा आहे' एवढे सांगूनच थांबत नाही तर जगाचे पालनपोषण करून त्याला योग्य मार्गावर ठेवणा-या 'त्याच्या' अस्तित्वाचे विलक्षण स्पष्ट चित्रही रेखाटतो. तो आपल्याला मृत्युनंतरच्या दिवसाचे वर्णन इतक्या प्रभावीपणे करतो, की आपल्या मनात खोलवर त्याची भीती रूजावी. एका ग्रीक चित्रकाराची आख्यायिका प्रसिद्ध आहे. त्याने द्राक्षाच्या घडाचे चित्र असे वास्तववादी काढले होते, की पक्षी येऊन त्यावर चोच मारत असत. जरा विचार करा, एका सामान्य मर्त्य मानवाने काढलेले चित्र असा असामान्य परिणाम करत असेल, तर या विश्वाच्या स्वामीने आपले कुरआन निर्माण करताना दाखवलेली कलाकुसर किती शिखरावर पोहोचली असेल? कुठलाही सामान्य मर्त्य जीव अशा परिपूर्ण कलेला ख-या अर्थाने ओळखू शकेल?

कुरआनची सुरूवात या प्रार्थनेने होते. "ईश्वराची स्तुती असो. तो सर्व जगांचा मालक आहे." ईश्वराची ही स्तुती फार महत्वाची आहे. त्यातून असे म्हटले आहे, की जगातल्या सगळ्या जैवविविधतेला निर्माण करून त्यांचे पालनपोषण करणा-या ईश्वराविषयी आम्ही कृतज्ञ आहेत.

या निर्मात्या आणि पालनकर्त्याला त्याने निर्माण केलेल्या प्रत्येक जिवाची खूप काळजी आहे. आणि तो त्यांच्या सगळ्या गरजा पुरवतो.

माणसाची सगळ्यात मोठी गरज म्हणजे तो कोण आहे, कुठून आलाय आणि कुठे जाणार? याची माहीती करून घेणे. त्याचा फायदा कशात आहे आणि तोटा कशात आहे हे ओळखण्याचीही त्याला गरज असते. आपण कुठून आलोय आणि आपली अंतिम गती काय? याचा अंदाज नसलेल्या जगात राहणे हे त्याच्यापुढचे मोठे संकट असेल. हवा आणि पाणी नसलेल्या अवकाशातल्या एखाद्या प्रदेशात त्याची जी अवस्था असेल तीच इथेही असेल.

पित्याला त्याच्या पुत्राची असते त्यापेक्षा जास्त कणव ईश्वराला त्याच्या निर्मितीची असते. त्यामुळे त्याने त्याच्या सेवकांची ही गरज ओळखली आहे आणि तरीही त्याची पूर्ती तो करणार नाही, हे मान्य करणे कठीण आहे. स्वतःला समजून घेण्यासाठी जे ज्ञान अपरिहार्य आहे ते त्याने माणसाकडे साक्षात्कारांच्या माध्यमातून पाठवले आहे. ते त्याने अशा रूपात पाठवले आहे, जे बोली परंपरेने पठणाद्वारे सगळ्यांपर्यंत पोहोचवले जाईल. ईश्वराने आपल्या सेवकांवर केलेली ही सगळ्यात मोठी कृपा आहे.

खरे ज्ञान मिळवण्यासाठी माणसाला त्याच्या निर्मात्याची खूप मोठी मदत लागते. या मदतीसाठी कुरआन पाठवून ईश्वराने आपल्यावर केवढी कृपा केली आहे याची जाणीव झालेल्या माणसाचे मन कृतज्ञतेने ओसंडून जाते आणि तो आपल्या स्वामीची प्रार्थना करतो, स्तुती करतो. 'ईश्वराचा गौरव' असो. तो जगांचा स्वामी आहे, ही स्तुती त्याच्या तोंडून उस्फूर्तपणे उमटते. खुद्द ईश्वराकडून ईशसेवेसाठी प्रेरित झालेल्या ख-या सेवकाचे हे बोल आहेत. त्याने त्याच्या स्वामीची सेवा कशी करावी या प्रश्नाच्या उत्तरासाठीही त्याला त्याच्या निर्माणकर्त्याची गरज वाटते. ईश्वरसेवेची भावना भले त्याच्या स्वभावातच असेल, पण ती कुठल्या पद्धतीने व्यक्त करावी, हे त्या होऊ घातलेल्या भक्ताला माहित नसते. खरे तर कुरआन याबाबतीतही अगदी स्पष्ट आणि निःसंदिग्ध आहे. सेवकाने कुठल्या शब्दात ही भावना मांडावी ते नेमके कुरआनातील शब्द सांगतात. या संदर्भातून पाहिल्यास कुरआनातल्या प्रार्थना म्हणजे सगळ्यात उदात्त दैवी देणग्या आहेत.

कुरआन म्हणजे जगातला सामान्य, रूढ अर्थाचा ग्रंथ नव्हे. त्याही पेक्षा जास्त, इस्लामचा संदेश सर्वदूर पोहोचवण्याच्या अंतिम संघर्षाचा तो लेखाजोखा आहे. खूप प्राचीन काळापासून ईश्वर त्याच्या खास निवडक दूतांकरवी सत्याचे ज्ञान पाठवत आलेला आहे. खिस्ती कालखंडाच्या सातव्या शतकात ईश्वराची एक इच्छा आकारास आली. अखेरीस पृथ्वीवासियांना सत्याचे ज्ञान द्यावे आणि त्या ज्ञानाच्या आधाराने समाजाची स्थापना व्हावी ही ती इच्छा होय. हे ज्ञान जगाच्या अंतिम दिवसापर्यंत संपूर्ण मानवजातीसाठी

अज्ञानाचा अंधार दूर करणा-या प्रकाशाचा उगम आहे.

या उद्दिष्टाला अनुसरून, ईश्वराने अरेबियात त्याचा अंतिम प्रेषित उभा केला. आणि अरबांमध्ये या संदेशाचा प्रचार करण्याचे कार्य त्याच्यावर सोपवले. नंतर या उपदेशाने प्रभावित झालेल्यांवर जगभरात या संदेशाचा प्रसार करण्याचे मदत कार्य सोपवले गेले. ख-या ज्ञानाचा प्रसार करताना आणि त्यावर आधारित समाज स्थापित करताना पवित्र प्रेषित दैवी मार्गदर्शन घेऊन काम करत होते. ईश्वराने आपला संदेश पृथ्वीवर प्रेषीतांकडे पाठवला, त्यानी काय उपदेश करावा हे त्याना समजावून दिले, आणि हा उपदेश परिणाम कारक ठरण्यासाठी लागणा-या सिद्धता त्याना पुरवल्या. त्यामुळे प्रेषितांच्या विरोधकांनी हरकती उपस्थित केल्यावर, त्यांना उत्तरे देऊन त्यांची तोंडे बंद करणे प्रेषिताना जमून गेले. पुढे जाऊन या संदेशाचा स्वीकार करणारे दुबळे पडतात असे दिसताच ईश्वरी ग्रंथाचा दाखला देऊन तात्काळ त्यांच्यात सुधारणा करणेही प्रेषिताना शक्य झाले.

याशिवाय, कुरआनने युद्धासाठी आणि शांतताकाळासाठी नियम ठरवून दिले आणि शिक्षणाची तसेच मार्गदर्शनाची तत्त्वे घालून दिली. त्याचे पालन करणा-यांना त्याने प्रतिकूल परिस्थितीत दिलासा मिळवून दिला. अखेरीस विजय मिळाल्यावर नवा समाज निर्माण करण्याचा आधार म्हणून न्यायिक चौकटही बांधून दिली. हे कार्य संपन्न होण्यासाठी तेवीस वर्षांचा कालखंड लागला. या कालखंडाच्या प्रत्येक टप्प्यावर विश्वाचा प्रकाश असणा-यांना सर्वश्रेष्ठ ईश्वराने मनुष्यजातीसाठी आज्ञांच्या स्वरूपातले ज्ञान भूमीवर पाठवले. कालांतराने त्याच्या योजनेनुसार, ही मार्गदर्शक तत्वे एका निश्चित क्रमाने संकलित केली गेली. हे संकलन म्हणजेच कुरआन होय.

अरेबियामध्ये जन्मलेल्या अंतिम प्रेषिताना त्यांच्या संपूर्ण कालावधीत खुद्द ईश्वराकडून मार्गदर्शन लाभले. कुरआन हा ग्रंथ म्हणजे ईश्वराने केलेल्या उपदेशाचा सगळ्यात सच्चा दस्तऐवज आहे. सुमारे पंचवीस वर्षे निरनिराळ्या प्रसंगी त्या त्या परिस्थितीनुसार मिळालेल्या मार्गदर्शनपर दैवी सूचनांचा संग्रह त्यात सापडतो. परंतु कुरआन म्हणजे फक्त ऐतिहासिक दस्तऐवज नव्हे. ती सर्वकालीन समर्पक दैवी घोषणा आहे. मानवासमोर अर्थपूर्णपणे सादर करता यावी म्हणून ती इतिहासाच्या साच्यातून तावूनसुलाखून निघाली आहे. शिवाय ती या अर्थाची चिरंतन घोषणा आहे की, ईश्वराच्या मर्जीनुसार प्रत्येक कालखंडात मनुष्यजातींची चांगली किंवा वाईट दैवगती तिच्याकडून निश्चित केली जाईल.

दीर्घ कालावधीत, त्या वेळच्या अत्यावश्यक गरजा ओळखून

त्यानुसार कुरआनचे वेगवेगळे भाग निरनिराळ्या वेळी पृथ्वीवर पाठवले गेले. त्यामुळे हे भाग निव्वळ योगायोग म्हणून निर्माण झालेले नाहीत. ते एका सुनियंत्रीत, पूर्व नियोजित योजनेचे भाग आहेत. त्यांच्या धारणा परिपूर्ण आहेत आणि त्यांचा उगम अतिनैसर्गिक जगातल्या आहेत. परिस्थितीच्या मागणीनुसार त्यांची पाठवणी झाल्याने, मुळात ते एका नियमित क्रमाने मांडलेले नव्हते. पण योजना पूर्ण होताच एक परिपूर्ण, संपूर्ण म्हणून ते एकत्र आणले गेले. हे एकात्रिकरण एका निश्चित नमुन्याला अनुसरून केले गेले, ज्याच्या सुसंगतीला तोड नाही. हल्ली राजकीय नेत्यांच्या भाषणातले निवडक वेचे एकत्र करून त्यांचे संकलन सादर केले जाते. या संकलनापेक्षा हा ग्रंथ ठळकपणे वेगळा आहे.

कुरआनचे एकत्रिकरण कसे केले ते कदाचित निर्मितीच्या अवस्थेत असलेल्या कारखान्याच्या उभारणीच्या उदाहरणावरून स्पष्ट होऊ शकेल. समजा, हा कारखाना भारतात उभा होतोय आणि त्याची उपकरणे एखाद्या विदेशात तयार केली जात आहेत. या उपकरणांचे निरनिराळे भाग वेगवेगळ्या उत्पादन केंद्रामध्येच तयार केले पाहिजेत. नंतर हे भाग वेगवेगळ्या जहाजांवर भरून भारतात पाठवले पाहिजेत. निर्मितीच्या या वेगवेगळ्या अवस्थांमध्ये आपला कारखाना कसा दिसेल? तर अजून सुरू न झालेला विसंगत आणि अपूर्ण वस्तूंच्या साठ्यासारखा. पण वेगवेगळ्या जहाजांमधून आणलेले त्या उपकरणाचे सुटे भाग योग्य पद्धतीने जुळवताच, ते संपूर्ण कारखान्याचे रूप घेतील. तो कारखाना काम सुरू करायला अगदी सज्ज असेल. संपूर्ण मानवजातीसाठी संपूर्ण आणि कायमची नियमावली आखून देण्याच्या उद्देशाने कुरआनची जुळणी अगदी अशाच प्रकारे केली गेली. त्यामुळेच, इतक्या वेगवेगळ्या घटकांचा समावेश असला तरी, त्याची एकवाक्यता थक्क करणारी आहे. त्यात माणसाचा उपयोग करून घेत प्रतिकूल वातावरण अनुकूल बनवण्याचा संदेश असल्याने, ते टप्प्याटप्प्यानेच प्रकट होणे अपेक्षित होते. कारण त्यामुळे निरनिराळ्या परिस्थितीतल्या गरजा पूर्ण होणार होत्या. इतिहासाच्या दृष्टीने ते अतिशय वैविध्यपूर्ण आज्ञांचे संकलन आहे. पण प्रत्यक्षात सर्वशक्तीमान आणि सर्वज्ञानी ईश्वराने ही दैवी योजना सुनियंत्रित आणि सुसंगत त्याचप्रमाणे ‘संपूर्ण’ बनवलेली आहे.

जगभर सगळ्या ज्ञानशाखांमध्ये आणि कल्पनेतल्या सगळ्या विषयांवर अगणित पुस्तके लिहिली गेली आहेत. आज घडीला लक्षावधी पुस्तकांची छपाई होऊन ती प्रकाशित झालेली आहेत. एखाद्याने ही सगळी पुस्तके वाचायची ठरवली तर त्याला आयुष्य पुरायचे नाही. कुणी जगातल्या

सगळ्या पुस्तकांचा अभ्यास करू शकला तरी, कुरआन हा अशा प्रकारचा ग्रंथ आहे, ज्याची गरज त्याला प्राधान्याने वाटावी. खरोखर, एखाद्याला इतर ग्रंथांच्या अभ्यासापासून खरा लाभ तेव्हाच मिळेल, जर त्याने सगळ्या महत्वाच्या विषयांचे खरे ज्ञान मिळवण्याचा पाया म्हणून लागणारी सूक्ष्मदृष्टीची खोली कुरआनातून मिळवली असेल. कुरआनशिवाय माणूस म्हणजे दिशादर्शक यंत्राशिवाय समुद्रात प्रवास करणे. अफाट समुद्रात दिशेचा अंदाज येत नाही. त्याचप्रमाणे माणसालाही त्याच्या अस्तित्वाची गुंतागुंत यशस्वीरित्या पार करण्यासाठी दैवी साक्षात्काराची गरज असते. त्या दैवी प्रकाशाचा वाटा जिला मिळाला तीच व्यक्ती जीवनाचा समुद्र यशस्वीपणे तरून जाऊ शकते.

जे नाकारले गेलेत, किंवा ज्यांनी स्वतः होऊन दैवी ज्ञानाला नकार दिलाय, त्यांना जीवनाच्या समुद्रात अस्ताव्यस्तपणे भिरकावून दिले जाईल. मग हातातले काम पूर्ण करण्याची संधीही न मिळता समुद्रात लपलेल्या खडकावर त्यांचा कपाळमोक्ष होण्याची शक्यता जास्त असेल. कुरआन मानवी स्वभावातली ही पोकळी भरून काढते. या पोकळीने मानवी इतिहासाच्या सगळ्या कालखंडात माणसाला स्वतःपासून दूर ठेवले आहे. रॉसाँ म्हणतो, की माणूस स्वातंत्र्यात जन्माला आला, पण जगात सगळीकडे बेडयांमध्ये अडकून पडला. याउलट मी तर म्हणतो, माणूस गुलाम म्हणून जन्माला आला, पण अनैसर्गिक मार्गाने तो स्वतःला मालक बनवू पहातोय. माणूस वरवर स्वयंपूर्ण असल्यासारखा वाटतो. पण खोलवरच्या गाभ्यात पाहिल्यास माणूस म्हणजे गरजा, गुंतागुंतींचे जाळे आहे. फक्त जिवंत राहण्यासाठी त्याला हवापाणी आणि जमिनीतून उगवणारे अन्नधान्य लागते. अगदी याच पद्धतीने सतत जीवनातला आनंद मिळत राहण्यासाठी त्याला बाह्य आधाराची गरज असते. संकटकाळी आधरासाठी खांबाची गरज ही माणसाच्या अंतरगातच असते. आदराने मस्तक झुकवण्यासाठी, अडचणीत सापडल्यावर त्याचा पाढा वाचून दाखवण्यासाठी, आणि जीवनातला आनंद परतल्यावर कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्याला एका जिवलगाची गरज असते. समुद्रात गटांगळ्या खाण्याला आधारासाठी दोरखंडाची गरज असते. अगदी तसेच विश्वाच्या अफाट आणि अंतहीन समुद्रात भरकटलेल्याला लटकून राहण्यासाठी अध्यात्मिक दोरखंडाची गरज असते. कुणी कितीही महान असला तरी या गरजेपासून मुक्त नसतो. ही अशी पोकळी आहे जी भरून निघावीच लागते. ही पोकळी दैवी अस्तित्वाने भरून काढली तर आपण एकेश्वरवादाचे तत्त्व अवलंबत असतो. पण ईश्वराला दूर लोटून आधारासाठी

इतर कुणाची अपेक्षा केली तर आपण अनेकेश्वरवादाच्या अधोगतीला लागतो.

प्रत्येक ऐतिहासिक कालखंडात मानवाला या दोन आधारस्तंभापैकी एकाला मान्यता द्यावीच लागली. प्राचीन काळी जे एकेश्वरवादाच्या आश्रयाला गेले, ते आधारासाठी ईश्वरावर अवलंबून राहिले. आणि आजही ते फक्त आणि फक्त त्यावरच अवलंबून आहेत. पण अनेकेश्वरवादाच्या आश्रयाला जाणा-यांची दिशा सतत बदलत राहिली. प्राचीन माणसाने, अगदी अलीकडच्या काळातही अनेकांनी अगणित वस्तूंची आराधना केली. त्यात आकाशात चमचमणा-या ता-यांपासून ते झाडे आणि दगडांपर्यंत त्यांनी निवडलेल्या हव्या त्या गोष्टी येतात. पूर्वीच्या आराधनेच्या वस्तूंची जागा आज राष्ट्र, देश, भौतिक प्रगती, राजकीय सत्ता यांनी घेतली आहे. या वस्तू म्हणजे त्या लोकांचे देव आहेत. विशेषतः त्यांच्या मनातली दुखरी पोकळी भरून काढण्यासाठी त्यांनी त्यांना हवे ते रूप दिले आहे. हे सगळे असले तरी आजही लोकांना जीवनाच्या संघर्षात निव्वळ भौतिकवादाची पातळी पार करून जाईल अशा अंतिम मुक्कामाची गरज असते. आजही त्यांना प्रेम करणारे कुणीतरी किंवा काहीतरी हवे असते. आजही ते मनातली उमेद जागवण्यासाठी आणि चैतन्याला नवी उभारी देण्यासाठी झुरत असतात. भूतकाळात दगडापासून बनवलेल्या मूर्तींनी कधीही खरा आधार किंवा मदत दिलेली नाही. आजच्या मुर्ती जास्त चकचकीत आणि झगमगाटी आहेत. पण त्या तकलादू आणि अल्पजीवी असल्याने त्या राष्ट्राला खरी ताकद देऊ शकत नाहीत.

उदाहरणार्थ, जर्मनांनी त्यांच्या राष्ट्रात ठिकठिकाणी पुतळे उभे केले. या पुतळ्यांनी त्यांचे रक्षण करणे दूरच पण दुस-या महायुद्धात त्यांना संहाराच्या उंबरठ्यावर आणून ठेवले. इटली आणि जपाननेही याचेच अनुकरण केले. पण त्यांच्या मूर्ती देशाला स्मशानभूमी बनवण्यापासून वाचवू शकल्या नाहीत. ब्रिटन आणि फ्रान्सनेही आपल्या भौतिक संसाधनांच्या मूर्ती बनवल्या. पण तरीही दोन्ही देशांची साम्राज्ये वेगाने आक्रसली. 'ब्रिटिश साम्राज्यावरचा सूर्य कधीही मावळत नाही' असे म्हटले जायचे. पण अखेरीस तोही मावळला. या जगातली खरी ताकत कशात आहे, हे कुरआन आपल्याला दाखवून देतो. कधीही तुटणार नाही अशा दोरखंडाची मजबूत पकड त्याच्यातून मिळते. हे नसेल तर आपल्याला जीवनात खरा आधार मिळायचा नाही. याहूनही जास्त म्हणजे, ईश्वराबरोबरच्या नात्यामुळेच, परस्परांना जोडणा-या दोरीवरची माणसाची पकड घट्ट होऊ शकते.

या पृथ्वीवर आयुष्यभर आपले पालनपोषण करतो तो फक्त एकमेव

ईश्वर हा खुलासा कुरआन आपल्याला देतो. त्याच्यामुळेच आपली मने सुखावतात, कारण तोच जीवनाला खरी ऊब देतो. तो संकटातून आपली सुटका करतो, गरजेच्या काळात दिशा दाखवतो. सगळी सत्ता त्याच्या हातात एकवटलेली आहे. आधारासाठी त्याच्याकडे जाणा-यांना मोबदला मिळतो तो सन्मानाचा आणि प्रतिष्ठेचा. त्याच्याकडे पाठ फिरवणा-यांना मिळते ते फक्त अवहेलनेचे आणि अपमानाचे ओझे. हे ज्ञान म्हणजे जीवनातल्या ठेव्याची कळ आहे. ती ज्याच्याकडे आहे तो सगळे मिळवतो. ती ज्याच्याकडून हरवली तो सगळे गमावतो.

विद्युत आणि वाफेच्या शक्तीचा शोध लावून त्यातून मानवी संस्कृतीला प्रगतीच्या संधी मिळवून देणा-या वैज्ञानिकांना आपण खूप महत्व देतो. पण हा ग्रंथ आपल्यासमोर जे वास्तव आणतो त्याचे महत्व मोजता येण्यासारखे नाही. तो आपल्याला फक्त यंत्रांचेच ज्ञान देत नाही, तर ही सगळी यंत्रे ज्या माणसांसाठी बनवली गेली, त्याचे ज्ञान देतो. तो आपल्याला माणसाची माहिती देतो आणि त्याच वेळेस माणूस त्याच्याकडून यशस्वी जीवनाचे गुपित शिकतो.

कुरआन ही सगळ्यात आधी आणि अग्रक्रमाने ईश्वराची घोषणा आहे. प्रत्येक ज्ञानसंपन्न, स्वयंशासित राज्याला जशी एक घटना असते, तशीच कुरआन ही माणसाच्या अधिपतीची, राजांच्या राजाची, सर्वशक्तीमान ईश्वराची ‘घटना’ आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास, कुरआन हा माणसाला योग्य मार्गावरील प्रवासासाठी दिशा दाखवणारा ग्रंथ आहे. तो त्याच्या अडखळत्या पावलांना मार्गदर्शन करणारा, त्याला वेळोवेळी ईश्वरी इच्छेची आठवण करून देणारा, त्याच्या झोपाळू वृत्तीला जाग आणणारा आणि ईश्वराची ताकीतवजा आज्ञा त्याच्यापर्यंत पोहोचवणारा प्रकाश आहे. हा ग्रंथ माणसाला बरोबर आणि चूक यामधला फरक ओळखण्याची नैतिक जाणीव देऊन त्याची आणि त्याच्या समाजाची सगळी दुखणी, सगळ्या अपप्रवृत्ती पळवून लावतो. या अर्थाने, हा शहाणपणाचा ग्रंथ असून त्यात योग्य आकलनशक्तीची प्रत्येक अभिव्यक्ती ठासून भरलेली आहे. याशिवाय, आपल्यासाठी समाजाची बांधणी आणि संघटन करण्यासाठी लागणारा प्राथमिक पाया रचणारा तो कायद्यांचा आणि नियमांचा ग्रंथ आहे. थोडक्यात, माणसाला ज्या कशाची गरज पडेल - एक व्यक्ती म्हणून आणि समाजाचा घटक म्हणून - ते सगळे हा ग्रंथ पुरवतो. या ग्रंथाच्या अभावी, कितीही कठोर कष्ट उपसले तरी माणूस जेता होऊ शकणार नाही.

आपण खरोखर ईश्वराबरोबरचे नाते वाढवले आहे किंवा नाही हे

माणसाला कसे कळू शकेल? या प्रश्नाला फक्त एकच उत्तर आहे. स्वतःची नजर आतल्या दिशेला वळवायची आणि आपले अंतरंग कुरआनकडे कुठल्या नजरेने पाहते याची चाचपणी करायची. कारण कुरआनकडे पाहण्याची दृष्टी म्हणजे आपल्या ईश्वराबरोबरच्या नात्याचे खरे प्रतिबिंब! माणूस कुरआनातल्या तत्त्वांना कितपत धरून चालतो हे त्याच्या निर्माण-कर्त्याबरोबरच्या नात्याचे खात्रीशीर लक्षण असते. कुरआन त्याच्यासाठी सगळ्यात बहुमोल ग्रंथ आहे, ईश्वर त्याला इतर कुणाहीपेक्षा जास्त प्रिय आहे हे न सांगता कळते. पण तो दुस-या एखाद्या ग्रंथाचा जास्त आदर करत असेल, तर त्याच्यासाठी त्याच्या जीवनातली सगळ्यात महत्वाची व्यक्ती असते ती त्या ग्रंथाचा लेखक, त्याचा स्वतःचा निर्माणकर्ता नाही. जसे खरा ईश्वर कुरआनशिवाय दुसरीकडे कुठे सापडणे अशक्य आहे, तसेच ईश्वराचा शोध लागल्यानंतर दुसरा एखादा ग्रंथ त्याला जास्त मौल्यवान वाटणे अशक्य आहे. कारण कुरआन हा ईश्वराचा ग्रंथ आहे. हे असे माध्यम आहे ज्याच्या मार्फत सर्वशक्तीमान ईश्वर त्याच्या सेवकांशी, पृथ्वीवरच्या त्याच्या सजीव प्रतिनिधींशी संवाद करतो. या तागड्यातून माणसाची ईश्वराबद्दलची समर्पण वृत्ती मोजली जाऊ शकते.

या अथांग विश्वात आपण एकाकी आहोत, आपल्याला कुणाचाही आधार नाही याची माणसाला जेव्हा भीती वाटू लागते तेव्हा, त्याला मुक्कामाचे अंतिम ठिकाण दाखवून आणि तिथे कसे पोहोचायचे याचे मार्गदर्शन करून कुरआन त्याच्या मनाला दिलासा देतो. अशा रीतीने कुरआनात माणसाला त्याचा स्वामी भेटतो, त्याच्या वचनांचे अवलोकन करता येते, आणि या स्वामीच्या सदिच्छांचा आनंद लुटता येतो. (एक प्रकारे) या जगात आपली जागा काय हे दाखवून कुरआन माणसाच्या मनाला पुरेसा विश्वास देतो. माणसाच्या अर्धजागृत मनातल्या त्याच्या स्वामीबद्दलच्या आणि अधिपतीबद्दलच्या धूसर स्वाभाविक प्रेरणांना प्रत्यक्ष रूप देऊन कुरआन माणसाचे पाऊल योग्य वाटेवर म्हणजेच ईश्वराला शरण जाण्याच्या मार्गावर ठेवतो. हे साधत असताना तो त्याला ईश्वराच्या जवळ आणतो.

ईश्वराच्या इच्छेची खात्री पटून तिचा शोध घेण्यासाठी, फक्त कुरआनची पाने उलटणे पुरेसे नाही. त्यासाठी तो मनात खोलवर उतरावा लागेल. कुरआन बरोबर घट्ट नाते बांधले तरच तो देऊ करत असलेल्या फायद्यांपर्यंत पोहोचता येते. त्यापासून सर्वोच्च फायदे मिळवायचे असतील तर त्याच्याबरोबर करार किंवा “ता अहुद‘ (प्रेषीतांकडून वापरला गेलेला शब्द) केल्यासारखे बांधून घेतले पाहिजे. कुरआनच्या थोरवीबद्दलची ही

सतर्कता आणि त्यापाठोपाठ केले जाणारे त्याचे पालन ही अप्रत्यक्ष अनुभवाची गोष्ट नाही. एखाद्या वक्त्याचे किंवा सुशिक्षिताचे कुरआनवरचे भाषण ऐकून त्याच्या भाषणकौशल्याचा आणि त्याने मिळवलेल्या ज्ञानाचा आपल्याला आदर वाटतो. पण तो खुद्द ईश्वराबरोबर नाते जोडण्याचा खरा मार्ग नाही. स्वतः तो पवित्र ग्रंथ वाचून आणि त्यातल्या आशयाला थेटपणे भिडून मगच कुरआनबरोबरचे खरे नाते स्थापित करता येते. असे झाले तरच त्यातले शहाणपण आठवणीवर कायमचे कोरले जाते.

हे फक्त कल्पनेतून निर्माण झालेले चित्र नव्हे. याला मूलभूत मानसशास्त्राचा आधार आहे. उदाहरणार्थ, कापूस आणि दगड यांच्यातला फरक फक्त सापेक्षतेचा आहे हा निष्कर्ष काढणे सोपे आहे. कारण दोहोंच्या अंतिम विघटनातून एकाच प्रकारचे इलेक्ट्रॉन्स मिळतात. पण हा झाला शुद्ध शैक्षणिक निष्कर्ष. प्रत्यक्ष जगात कापूस मऊ असतो आणि दगड कठीण असतो हेच मानले जाते. हातातल्या वस्तुबद्दलचे मत बनवताना फक्त वरवरच्या किंवा धूसर व्याख्याचा आधार घेतला जात नाही, तर प्रत्यक्ष आणि व्यक्तिगत अनुभवातून मिळवलेल्या ज्ञानाचा वापर केला जातो.

❁ भाग दूसरा ❁
कुआनचे जतन

प्रकरण १
कुरआनाचे जतन

'निर्मिती करणा-या तुमच्या स्वामीचे स्मरण करून पठण करा'- ही प्रोषितांना दिलेली पहिली आज्ञा ज्ञानाचे महत्व अधोरेखित करते (९६:१) आणि त्या साक्षात्काराचे शेवटचे शब्द मृत्युनंतरच्या जीवनाविषयी सांगतात(२:२८१).

कुरआन तेवीस वर्षांच्या कालावधित अवतरित झाले. त्या काळात त्यातील वचने एकाच ग्रंथात एकत्रित झालेली नव्हती. प्रेषितांच्या हयातीत त्याच्या लिखाणाचे कार्य पूर्ण झाले होते. (अल् - कतानी, खंड दुसरा, पृष्ठ ३८४).

पहिली तेवीस वर्षे खुद्द प्रेषित कुरआनच्या अध्ययनाचे आरंभकर्ते होते. कुरआनचे ज्ञान करून घेतल्यावर त्यातील संदेश इतरांपर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी आपल्या काही शिष्यांवर सोपवले. या शिष्यांनी संपूर्ण कुरआन पूर्ण बिनचूकपणे स्मरणात साठवले होते. त्यातील शिकवण लोकांच्या मनावर बिंबवायला ते अगदी सक्षम होते. उमर हे इस्लामचे दुसरे खलिफा. एकदा कुफाहून मदीनेला आलेल्या एका इसमाने खलीफाला माहिती दिली की, मदीनेत एक जण धर्मग्रंथाची शिकवण देत आहे. संपूर्ण धर्मग्रंथ तोंडपाठ होता. हे ऐकून उमर खलिफा संतापले. पण ती व्यक्ती दुसरी कुणी नसून अब्दुला इब्ने मसूद आहेत हे कळताच त्याचा संताप निवळला. (इस्तियाब, खंड पहिला, पृष्ठ ३७७). याचे कारण म्हणजे खुद्द प्रेषितांनी या कामासाठी त्यांची नेमणूक केली होती. कुरआनात पारंगत असणा-यांची इतर नावे अशी आहेत. उस्मान अली, उबै इब्न काब, जैद, इब्न मसूद, अबु दर्दा, अबु मूसा अशारी, सलीम मौला, अबी हुजैफ.

परंतु, ज्यांच्यावर हे कार्य सोपवले गेले ते मुसलमान अमर नव्हते. त्यांना मृत्यु येणार होता, यात काही शंका नव्हती. त्यांच्या पश्चात कुरआन कमी जबाबदार, कमी ज्ञानी लोकांच्या हातात जाण्याचा धोका होता. कदाचित त्यांना कुरआनचे मूळ रूप टिकवून ठेवता आले नसते. त्यातल्या ख-या अर्थापासून ते कदाचित दूर गेले असते. हा ठेवा भावी पिढ्यांपर्यंत अजिबात न पोचण्याचा धोकाही होताच. इसवीसनाच्या बाराव्या शतकात झालेल्या यमामाच्या युद्धात प्रेषितांचे सातशे सोबती मृत्युमुखी पडल्याने या धोक्याची तीव्रता वाढली.

ऐतिहासिक दस्तात अशी एक नोंद आढळते. सलीम मौला अबी हुजैफ शहीद झाल्यावर, कुरआन नष्ट होईल हा धोका जाणवल्याने उमर त्या विषयावर चर्चा करण्यासाठी अबु बक्र या पहिल्या खलीफांकडे आले (फतहुल बारी, खंड ९ वा, पृष्ठ ५). कुरआनातील शिकवणीचा प्रसार करण्यासाठी खुद्द प्रेषितांनी निवडलेले फारच थोडे सोबती तेव्हा हयात होते. सलीम त्यांच्यापैकीच एक होते. अबु बक्र यांनी उमरना कुरआनचे लिखित स्वरूपात औपचारिक संकलन करण्याचा उपाय सुचवला. त्याद्वारे कुरआनचे जतन करता येणार होते.

कुरआनचा प्रत्येक परिच्छेद अवतरित झाल्याबरोबर तो लिहून ठेवण्याची व्यवस्था प्रेषित करत असत हे सिद्ध झालेले आहे. या प्रक्रियेला किताबत (कागदावर लिहिणे) असे म्हटले जाई. ही प्रक्रिया अतिशय काटेकोर होती. चौथ्या प्रकरणातले पंच्याण्णवावे वचन अवतरित झाल्यावर 'ज्यांना शक्य नाही ते सोडून सर्व', हे वाक्य वचन पूर्ण झाल्यानंतर पुन्हा एकदा पुरवणी अवतरित झाली. लेखनिकाकडून ते त्याच क्षणी लिहिले गेले. असे इमाम मलिक यांनी म्हटले आहे (दुर्र मन्सूर, खंड २, पृष्ठ २०३).

लेखनिकाकडून वचने लिहून झाल्यानंतर त्याच्याकडून ती वाचून घ्यायची ही प्रेषितांची पद्धत होती. जैद सांगतात की, लिखाणात काही राहून गेले असेल तर प्रेषित ते दुरूस्त करत आणि पूर्ण लिहून झाल्यावरच त्याच्या प्रसाराला परवानगी देत (मजमउज जावेद. खंड १, पृष्ठ ६०).

कुरआनच्या लिखाणादरम्यान नेमल्या गेलेल्या लेखनिकांची संख्या बेचाळीस असल्याचे सांगितले जाते. इब्न अब्दुल बर यांच्या मतानुसार हंजला इब्न राबी हे प्रमुख लेखनिक होते. त्यांना सदैव प्रेषितांच्या सोबत राहण्यास सांगितले गेले होते. (अक्द अल - फरीद, खंड चौथा, पृष्ठ ११४). ही व्यवस्था अगदी निर्दोष आणि निर्धोक होती. प्रेषितांच्या मृत्युपर्यंत त्यांच्या अनेक सोबत्यांकडे कुरआनचे लिखित उतारे होते.

या सोबत्यांची संख्या लक्षणीय होती. त्यातली चार नावे इथे नमूद केलीच पाहिजेत. अबु दर्दा, मुअज इब्न जबल, जैद आणि अबु जैद. या चौघांकडे सध्याच्या मांडणीतले कुरआन होते.

विश्वासार्ह परंपरांच्या माध्यमातून हे सिद्ध झाले आहे, की जिब्रईल या देवदूतांनी स्वत:च या वचनांची मांडणी केली होती. हे देवदूत ईश्वराचे साक्षात्कार प्रेषितांपर्यंत पोहोचवायचे, दर वर्षी रमजानच्या महिन्यात जिब्रईल प्रेषितांकडे येत असत. वर्षभरात त्यांच्याकडे प्रकट झालेली वचने प्रेषितांना सांगत असत. त्यांचा क्रम तंतोतंत आजच्या क्रमानुसारच होता. प्रेषित

त्यानंतर त्याच क्रमाने वचने त्यांना म्हणून दाखवत. हदीसमध्ये या दुहेरी प्रक्रियेला 'परस्पर सादरीकरण' (अल अर्झ) असे म्हटले आहे.

आणखी एक वास्तव निर्विवादपणे प्रस्थापित झाले आहे. कुरआनचे प्रकटीकरण पूर्ण झाले तेव्हा प्रेषितांचा अंतकाळ जवळ आला होता. अशा वेळी जिब्राईल त्यांच्याजवळ आले आणि पठण केले. त्यांनी प्रेषितांना सध्याच्या मांडणीतले कुरआन दोनदा म्हणून दाखवले. प्रेषितांनीही संपूर्ण कुरआनचा दोनदा उच्चार केला. हदीसमध्ये या अखेरच्या सादरीकरणाचा उल्लेख 'अल् - अर्झ अल् - आखीराह' असा केलेला आहे. (फतउल बारी, पृष्ठ क्रमांक ६५९ - ६६३).

प्रेषितांनी जिब्राईलच्या मदतीने कुरआनची पद्धतशीर आखणी केली. त्यानंतर त्यातील जो क्रम आज आपल्या ओळखीचा आहे त्या क्रमाने त्यांनी निरनिराळ्या प्रसंगी ते आपल्या सोबत्यांना सांगितले. अशा प्रकारे प्रेषितांच्या हयातीत कुरआन दैवी रूपात अनेक सोबत्यांच्या स्मरणात पक्के साठवले गेले. त्याचे जतन केले गेले.

कुरआनचे जतन तीन टप्प्यांमध्ये करण्यात आले. लेखन, संकलन आणि एकत्रीकरण. पहिल्या टप्प्यात एखादे प्रकरण किंवा त्यातील आयत प्रकट झाल्याबरोबर लिहिली जाई. निरनिराळ्या ग्रंथांमध्ये या लिखाणासाठी पुढील माध्यमांचा वापर झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

रिका - पातळ चामड्याचा तुकडा
लिखाफ - पांढ-या दगडाचा पातळ तुकडा
कत्फ - उंटाच्या खांद्याचे गोल हाड
असीब - खजुराच्या फांदीचा टोकाकडचा रूंद भाग.

हदीसमध्ये या प्रक्रियेच्या दुस-या टप्प्याला "संकलन" म्हटले आहे. म्हणजे, प्रकटीकरणाच्या वेळेस सुरूवातीला आयात लिहील्या गेल्या. अशा रीतीने एक प्रकरण पूर्ण झाल्यावर संपूर्ण प्रकरण संकलित स्वरूपात लिहिले जाई. ते पातळ चामड्यावर योग्य क्रमाने लिहीले जाई. एक प्रकरण पूर्ण होण्यासाठी नेहमी अनेक साक्षात्कार व्हावे लागत. प्रेषितांच्या हयातीत अशा कुरआनच्या संकलित प्रती (पूर्ण किंवा अपूर्ण अवस्थेतील) अनेक लोकांच्या ताब्यात होत्या. इस्लामचा स्वीकार केला म्हणून आपल्या बहिणीला आणि मेव्हण्याला निष्ठूरपणे मारहाण करणा-या उमर यांची कथा आपल्याला माहित आहे. रात्र निवळल्यावर त्यांनी या ग्रंथाचे वाचन केले. ग्रंथ दाखवण्याची मागणी केली. त्यावेळी अशुद्ध अवस्थेत ग्रंथाला स्पर्शही करता येणार नाही असे बहिणीने त्याना निक्षून सांगितले होते. स्नान केल्यांनंतरच तिने तो त्यांच्या हाती सोपवला. (इब्न हिशाम)

या प्रक्रियेचा तिसरा टप्पा म्हणजे "एकत्रीकरण". म्हणजे संपूर्ण कुरआन एका ग्रंथात लिहून काढणे. प्रेषितांच्या काळात एकसमान आकाराच्या पानांचे बांधणी स्वरूपातील पुस्तक प्रचलित नव्हते. बुखारीने नोंदवलेल्या एका वर्णनानुसार, प्रेषितांच्या हयातीत एकत्रित स्वरूपातील कुरआन त्यांच्या फक्त चार सोबत्यांकडे होते. उबै इब्न काब, मुआज इब्न जबल, अबू जैद आणि जैद इब्न. प्रेषितांच्या संदर्भातील कंझअल् - उम्माल या ग्रंथात इब्न काब अल् - कुर्झी यांनी संपूर्ण कुरआनचे एकत्रीकरण करणा-या पाच सोबत्यांची नावे नमूद केली आहेत. परंतु त्यांच्या संग्रहाचे स्वरूप व्यक्तिगत मालकीच्या रूपाचे होते. अबू बक्र या खलीफांच्या मार्गदर्शनाखाली त्याची अधिकृत आवृती निर्माण केली गेली. या आवृत्तीत कुरआनातल्या सगळ्या आयात समान आकाराच्या चौकोन कागदांवर लिहून त्यांची बांधणी करण्यात आली होती. इमाम मलीक यांनी अशीही नोंद केली आहे की जैद इब्न साबीत यांनी अबु बक्र यांच्या आदेशानुसार कुरआनातल्या सगळ्या आयात (एकसमान आकाराच्या कागदांवर) लिहून काढल्या होत्या. (शहाब झहरीकडून ही माहिती मिळाल्याचे नोंदवले आहे. या शहाबला सलीमने हा वृत्तांत सांगितला होता. सलीम म्हणजे अब्दुल इब्न उमर यांचा पुत्र) या आवृत्तीला रब्बा (चौकोनी आकार) असे म्हटले जाई. (इतकान, खंड पहिला, पृष्ठ ८४ - ८५).

उमर फारूक या खलीफांच्या कारकीर्दित इजिप्त, इराक, सीरिया आणि यमेन या देशांमध्ये कुरआनच्या लाखापेक्षा जास्त प्रती प्रसारित झाल्या होत्या असे म्हटले जाते.

नंतरच्या काळात लिखित स्वरूपातील कुरआन इस्लामच्या शिकवणीचे मुख्य उगमस्थान बनले. तरीही एक धोका घोंघावत होताच. या पवित्र ग्रंथातले अगदी सूक्ष्म फरकही मोठ्या वादाला कारणीभूत ठरले असते. लोकांनी कुरआन आपल्या मर्जीनुसार लिहिले तर त्याच्या उच्चारातील तफावत वाढत गेली असती आणि त्याचा अंत कुठेच झाला नसता. उदाहरणार्थ कुरआनच्या पहिल्या प्रकरणातील फक्त एक शब्द वेगवेगळ्या बोली भाषेतील उच्चाराप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारे लिहिला जाई. जसजसा का पुढे सरकेल तशी लेखनशैली बदलत गेल्याने हस्तलिखितातील हे फरक मोठ्या संघर्षाचे कारण बनण्याची शक्यता होती. त्यामुळे उमर यांच्या सल्ल्यानुसार अबु बक्र यानी कुरआनाची अस्सल आवृत्ती बनवण्याचा निर्णय घेतला. कुरआनच्या मजकुरातील योग्य अर्थ स्पष्ट करणारे उच्चारातील फरक कायमचे संपवण्यासाठी राज्याच्या आश्रयाने अशी आवृत्ती बनवण्याचे

ठरवले गेले.

या कार्यासाठी जैद इब्न साबीत सगळ्यात सूक्ष्म होते कारण ते प्रेषितांचे 'कातिब' होते. जैद आणि उबै इब्न काब हे दोघे प्रेषितांच्या 'अखेरच्या' कथनात सहभागी होते. या कथनाद्वारे त्यांना कुरआनच्या आयातांचा आजही टिकून असलेला क्रम थेट प्रेषितांच्या तोंडून ऐकता आला. संपूर्ण कुरआन त्यांच्या स्मरणात होते. एवढेच नाही तर त्याची लेखी प्रतही त्यांच्याकडे होती. पहिल्या खलीफाने त्यांना या पवित्र ग्रंथाचे उपलब्ध असलेले सगळे भाग एकत्र करून ते संकलित करण्याचा आदेश दिला होता (बुखारी). हा निर्णय झाल्यानंतर उमर यांनी मशिदीत जाऊन घोषित केले की ज्यांच्याकडे कुरआनचा लिखित भाग असेल त्यांनी तो आणून जैदकडे सोपवावा.

पहिल्या खलीफांच्या राजवटीत खजूराची साल, दगडी खापर आणि कातडे यावर लिहिले गेलेले कुरआन स्मरणातही पक्के झालेले होते. कुरआन एका ग्रंथात बांधले गेले, तेव्हा सोबत्यांच्या आठवणीनुसार त्यातील आयातांचा क्रम ठरवला गेला. अगदी आजतागायत तोच क्रम जतन करून ठेवलेला आहे.

जैद इब्न साबित यांच्या कामाचे स्वरूप संकलनापेक्षा जास्त एकत्रिकरणाचे होते. त्यानी लिखित कुरआनचा एक न एक भाग एकत्र केला होता. ते एकत्र करून एका ग्रंथात बांधूनच ते थांबले नाहीत. अनेकांना तोंडपाठ असलेल्या आणि मौखिक परंपरेने इतरांपर्यंत पोहोचलेल्या आयात यांची त्यानी पडताळणीही केली. कुरआनच्या मौखिक आणि लिखित स्वरूपातील देवाणघेवाणीवरील सगळ्या तार्किक शंकांचे निरसन केले गेले. त्यानंतर जैदने आयातांना योग्य क्रम देऊन कागदावर उतरवण्याचे काम सुरू केले.

हरीस मुहासिबने 'फहम अस्-सुनान' या आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, 'कुरआनचे लेखन काही नवे नव्हते', कारण खुद्द प्रेषितांनीच त्याच्या लिखाणाची व्यवस्था केली होती. ते झाडांची साल, दगडी पाटी आणि कातडे अशा निरनिराळ्या साधनांवर लिहिले गेले. ज्या माध्यमांवर कुरआन लिहिले गेले ती सगळी माध्यमे प्रेषितांच्या घरात उपलब्ध होती. पण ती कुठल्या विशिष्ट क्रमाने मांडलेली नव्हती. संग्राहकाने काय केले? तर ते सगळे घटक एकत्र केले आणि नष्ट होऊ नयेत म्हणून एका ग्रंथात बंदिस्त केले. (अल् - इतकान, खंड पहिला, पृष्ठ ४०).

मूळ प्रकटीकरण आणि लिखित मजकूर यांच्यात किंचितही

परस्परभेद राहू नये यासाठी अशी तपशीलवार व्यवस्था केली गेली. ही असाधारण काळजी घेतली गेली नसती तर स्मरणात साठवलेले कुरआन आणि लिखित आशय यांच्यात सूक्ष्म फरक झाले असते. याचे एक समर्पक उदाहरण दिले जाते. उमर यानी जैद इब्न साबित याना ही आयत ऐकवली. जे नेतृत्व करतात, पहिल्यांदा मुजाहिरांचे आणि अन्सारचे, जे प्रामाणिकपणे त्यांचे अनुकरण करतात, त्यांच्यासाठी जैदने सांगितले, की यामध्ये 'वाव' म्हणजे अन्सारनंतर 'आणि' असल्याचे आठवते. या त्याच्या आठवणीचा तपास सुरू झाला. कुरआन स्मरणात ठेवणारे इतर लोक पुढे आले आणि त्यांनी जैदचे मत खात्रीशीर असल्याचे सांगितले. त्यामुळे ग्रंथातल्या त्या आयतमध्ये 'आणि' या शब्दाची भर घालण्यात आली.

पूर्वीच्या काळी कुठल्याही ग्रंथाच्या आशयाचा प्रसार करायचा तर ते आठवणीत ठेवायचे आणि इतरांना म्हणून दाखवायचे. हा मार्ग सर्वमान्य होता. अशा काळात, कुरआन स्मरणात आणि त्याचबरोबर लिखाणानंतर सुरक्षित ठेवणे हा मार्ग अगदी अपवादात्मक म्हणावा लागेल. ही 'दुहेरी तपासणी' व्यवस्था होती. यात स्मरणशक्ती आणि लिखित मजकूर यांच्यात पडताळणीसाठी सतत तुलना केली जाई.

जैद इब्न साबीतने कुरआनचे सगळे भाग एकत्र करून संपूर्ण कुरआन एका ग्रंथात बंदिस्त केले. त्यानंतर तपासणी आणि फेरतपासणी करण्याच्या हेतूने वेगवेगळ्या सोबत्यांकडून जमवलेले सगळे साहित्य जाळून नष्ट करण्यात आले. मग हा ग्रंथ खलिफांच्या हाती सोपवला गेला. अबु बक्र यांच्या मृत्युनंतर दुसरे खलिफा उमर यांच्या पश्चात त्याचा ताबा हाफसाकडे आला. हाफसा म्हणजे उमर यांची कन्या आणि प्रेषितांची पत्नी.

उस्मान यांच्या खिलाफतीच्या कारकीर्दीत इस्लामचा प्रचंड प्रसार झाला. मुस्लिमांची संख्या अफाट वाढली होती. शिवाय इस्लामची शिकवण देणारे प्रेषितांचे सोबती इस्लामच्या कक्षेत आलेल्या निरनिराळ्या देशांमध्ये पोहोचले होते. उदाहरणार्थ, सीरियाला उबै इब्न काबने, कुफाला (कुफा हे इराकमधले एक शहर होते) अब्दुल इब्न मसूदने, तर इराणला अबु मूसा अशारीने कुरआनची शिकवण दिली. परंतु उच्चार आणि लेखनशैलीतील फरकामुळे पुन्हा एकदा मतभेद डोके वर काढू लागले. अशा मतभेदांमुळे लोक एकमेकांना बंडखोर म्हणू लागले.

इब्न अबी दाऊद याने अल् - मसाहीफ या ग्रंथात यझीद इब्न मुआविया नखाई याचा हवाला देऊन म्हटले आहे की, हुजैफ इब्न अल् - यामन एकदा कुफा मशिदीत गेले असताना त्यानी एक गट कुरआनाचे पठण करत

असल्याचे पाहिले. त्यांच्यापैकी एकाने विशिष्ट आयत म्हणून दाखवली आणि सांगितले, “अब्दुल इब्न मसूदची ही पठणाची पद्धत आहे.” दुस-या एकाने तीच आयत वेगळ्या पद्धतीने म्हटली आणि ती पठणाची अबू मूसा अल् - अशारी यांची पद्धत असल्याचे सांगितले. हे ऐकून हुजैफ संतापले आणि त्यानी त्या गटाला सुनावले. “तुमच्या आधी ग्रंथधारण करणा-यांमध्येही असेच मतभेद होते. शपथ अल्लाहची मी तडक श्रद्धावंतांच्या नेत्याकडे, उस्मान या तिस-या खलिफांकडे जातोय.”

हुजैफ सैनिकी अधिकारी होते. त्यांची नेमणूक आर्मीनिया आणि अझेरबाईजानमध्ये झाली होती. नुकतेच ते युद्धावरून परतले होते. पण मदीनेत गेल्यावर आणि प्रेषितांच्या मशिदीतले दृश्य स्वतःच्या डोळ्यांनी बघितल्यावर सरळ घरी जाण्याऐवजी ते थेट तिस-या खलीफासमोर गेले आणि त्यांना सांगितले, “तुम्ही श्रद्धावंताचे प्रमुख आहात! तुम्हाला लोकांची काळजी घ्यावी लागेल. नाहीतर यहुदी आणि ख्रिस्ती लोकांप्रमाणे ईश्वरी ग्रंथावरुन त्यांच्यात मतभेद होतील. त्याचे रक्षण करा.” उस्मान यांच्या कारकीर्दित अनेक जनसमुदायांनी इस्लाममध्ये प्रवेश केला होता. परंतु त्यांची मातृभाषा अरेबिक नसल्यामुळे त्यांची बोलण्याची पद्धत आणि उच्चार योग्य नव्हते. अगदी निरनिराळ्या अरब जमातींमध्ये शब्द उच्चारात फरक होते. त्यामुळे कुरआनच्या पठणात विविधता होती. मूळ उच्चारापासून ते वेगळे होते. याचा परिणाम असा झाला की, वेगवेगळ्या उच्चारपद्धतीनुसार कुरआन वेगवेगळ्या पद्धतीने लिहिले जाऊ लागले. इब्न कतायब लिहितो की बनी हुस्त्राईल जमात ‘हत्ता’ चा उच्चार ‘अत्ता’ असा करीत. इब्ने मसूदही त्याच जमातीचे असल्याने, त्या जमातीच्या सदस्यांना त्या उच्चारात वेगळेपणा वाटण्याचे काही कारण नव्हते. पठणाच्या अशा फरकांचे प्रतिबिंब कुरआनच्या लिखाणातही येत होते. अशा असंख्य फरकांसंदर्भात उस्मान यांनी हुजैफ इब्न यामनचा सल्ला ऐकून त्याप्रमाणे कृती केली. अबु बक्र यानी बनवलेल्या ग्रंथाच्या त्यानी अनेक प्रती बनवल्या आणि त्या प्रत्येक शहरांमध्ये वितरित केल्या. हे कामही विश्वासाने पुन्हा एकदा जैद यांच्याकडे सोपवले गेले. मदतीसाठी त्यांच्याबरोबर अकरा सहकारी देण्यात आले. तिस-या खलीफांनी दिलेल्या आदेशानुसार या बारा जणांच्या समितीने कुरेशच्या उच्चारानुसार तो सगळा मजकूर लिहून काढला. या पद्धतीने लिहिल्यामुळे इस्लामच्या प्रेषितांच्या उच्चार शैलीला पाठिंबा दिला गेला. त्याच वेळेस उस्मान खलीफा यानी जनतेला एक आदेश दिला.या आदेशानुसार ज्यांनी स्वतःच्या मर्जीने कुरआन लिहिले होते त्यांचे लेखन प्रशासनाकडे जमा

करण्यात आले. त्यांच्याच आज्ञे वरून ते जाळून नष्ट केले गेले.

या पद्धतीचा अवलंब करून कुरआनच्या सगळ्या लिखित प्रती एकसारख्या बनवल्या गेल्या, परंतु हे करत असताना नैसर्गिक फरक लक्षात घेतले गेले. सगळ्यांना कुरआन एकाच प्रकारे उच्चारता येणे शक्य नव्हते. त्यामुळे सात वेगवेगळ्या शब्द उच्चारात कुरआनचे पठण करण्याची परवानगी दिली गेली. प्रेषितांच्या मृत्युनंतर वर्षभराने अबू बक्र यांचे संग्रहाचे काम पूर्ण झाले. उस्मान यांच्या आदेशावरून प्रती बनवण्याचे काम प्रेषितांच्या मृत्युनंतर पंधरा वर्षांनी पूर्ण झाले.

कुरआनच्या या प्रती अतिशय काळजीपूर्वक विलक्षण नेमकेपणाने बनवल्या गेल्या. छपाईचे युग अवतरेपर्यंत त्या एका पिढीकडून दुस-या पिढीपर्यंत पोहोचवल्या गेल्या. त्यानंतर मुस्लिम विश्वात छपाईचे अनेक कारखाने उभे राहिले. पवित्र ग्रंथाच्या आशयाला आठवणींचा दुजोरा मिळवून देणा-या अक्षरातल्या प्रती बनवल्या गेल्या. अशा रीतीने पुन्हा एकदा स्मरणातला मजकूर आणि लेखी मजकूर यांच्या सहाय्याने अचूक आणि अस्सल प्रती तयार करण्यात आल्या. या प्रतींची मोठ्या प्रमाणावर छपाई करून त्यांचे जगभर वितरण करण्यात आले.

सगळ्या पौर्वात्यशास्त्रज्ञांनी या निर्विवाद वस्तुस्थितीला मान्यता दिलेली आहे की, कुठल्याही वेळी जगाच्या कुठल्याही कानाकोप-यात सापडणारी कुरआनची प्रत प्रेषितांनी जीवनाच्या अखेरीस मुस्लीमांकडे विश्वासाने सोपवलेल्या प्रतीशी तंतोतंत साम्य दाखवणारी असून, तिची मांडणी आजही तशीच टिकून आहे.

प्रकरण २

दैवी योजना

ईश्वराने यहूदींना 'तोराह' या पवित्र ग्रंथाचे जतन करण्याचा आदेश दिला होता. पूर्वीच्या या ग्रंथांच्या जतनाची जबाबदारी त्यांच्या अनुयायांवर होती. उलटपक्षी खुद्द ईश्वरानेच कुरआनच्या जतनाची जबाबदारी पेलली होती. आम्ही हा संदेश पृथ्वीवर पाठवला आहे, यात काही शंका नाही. आणि आम्ही खात्रीने त्याचे रक्षण करू. (१५:९) पूर्वीचे पवित्र ग्रंथही कुरआनसारखेच दैवी ग्रंथ होते. फरक इतकाच होता की, ते ग्रंथ बाळगणारे त्यांचे जतन करण्याच्या कामात अपयशी ठरले. त्यामुळे त्या ग्रंथानील मूळचे गुणधर्म हरवून गेले. कुरआनविषयी बोलायचे झाल्यास ते सुरक्षित ठेवण्यासाठी विशेष मदत पुरवण्याची जबाबदारी ईश्वराने स्वतःकडे घेतल्याने ते सुस्थितीत टिकून राहिले.

परंतु याचा अर्थ असा नाही की, कुरआनचे संरक्षण करण्यासाठी ईश्वराचे दूत स्वर्गातून पृथ्वीवर उतरतील. वर्तमान जग हे परीक्षाभूमी आहे. त्यामुळे या जीवनात मृत्युनंतरच्या जगातल्या वस्तुस्थिती आपल्यापासून अदृष्य राहतात. या कारणाने कुरआनचे संरक्षण करण्यासाठी ईशदूतांनी प्रत्यक्ष जमिनीवर उतरावे हे कधीही घडू शकत नाही.

अशा गोष्टी या जगात सामान्य असणा-या आणि असामान्य नसणा-या परिस्थितीत साधल्या जातात. हे कार्य आपल्यासारख्या सामान्य माणसाने पार पाडायचे असते. या ऐतिहासिक प्रक्रियेच्या अभ्यासातून अदृश्य अस्तित्वावरचा पडदा हटवता येत नाही. मानवी इतीहासात आजवर घडलेल्या घडामोडी ईश्वराने त्याच्या आभिवचनांची पूर्ती केल्याचे सांगतात. मुस्लिमांना आणि बिगर मुस्लिमांना, व्यक्तींना आणि समूहांना ईश्वराने या कार्यात जुंपलेले आहे. पूर्वीच्या प्रेषितांचा विचार करायचा झाल्यास, ईश्वरी ग्रंथाच्या जतनाची भक्कम खात्री देण्यासाठी पुरेसे अनुयायी मिळवण्यात ते अपयशी ठरले होते. पण इस्लामच्या प्रेषितांची गोष्ट इतर प्रेषितांपेक्षा विशेषत्वाने वेगळी आहे. निधनापूर्वी अडीच महिने आधी प्रेषितांनी अखेरची हजयात्रा पार पाडली होती. ही तीर्थयात्रा 'हज्जतुल विदा' म्हणून ओळखली जाते. या हजयात्रेसाठी अराफातच्या मैदानांवर प्रेषितांबरोबर एक लाखा चाळीस हजार मुस्लीम बांधव होते. यावरून अंदाज बांधला जातो की, त्यांच्या जीवनसमाप्तीपर्यंत स्त्रीयापुरूष मिळून श्रद्धावंतांची संख्या पाच लाखच्या

आसपास असलीच पाहिजे. पूर्वी जगाची लोकसंख्या सध्याच्या तुलनेत फारच कमी होती. हे लक्षात घेतल्यास, ही संख्या अगदी विलक्षण वाटते. प्रेषितांच्या मृत्युनंतर एकापाठोपाठ अनेक राष्ट्रांनी इस्लामचा स्वीकार केल्याने ही संख्या आकारास आली.

यानंतर घडलेली सहाय्यक घटना म्हणजे अरेबियाच्या भूमीवर आणि बाहेरच्या भूमीवर मिळालेले असंख्य विजय. यामुळे प्राचीन जगाच्या प्रचंड मोठ्या निवासी भागात मुस्लिमांचे वर्चस्व वाढत गेले. मुस्लिमांनी त्या काळचे सगळ्यात मोठे आणि सगळ्यात भक्कम साम्राज्य स्थापित केले. हे साम्राज्य इतके बळकट होते की दुस-या कुठल्याही सत्तेला सहज काबीज करता आले नाही. हजार वर्षापेक्षा जास्त काळ हे साम्राज्य पूर्ण क्षमतेने जोरदार हल्ले मोडून काढत कुरआनच्या खरेपणाचे जतन करत राहिले. नंतर छपाईच्या युगाचे आगमन होताच कुरआन नष्ट होण्याची शक्यता कायमची निकालात निघाली.

छपाईच्या युगात फक्त एका हस्तलिखितावरून लाखो प्रती छापणे शक्य झाले. प्राचीन काळी ही बाब अशक्य होती. तेव्हा प्रत्येक प्रत हाताने वेगवेगळी लिहावी लागायची. त्यामुळे प्रत्येक प्रत किंचित वेगळी व्हायची. सगळ्या प्राचीन ग्रंथांच्या बाबतीत हे घडले आहे. फक्त कुरआनच्या बाबतीतच असे घडले की, छपाई युगापूर्वी त्याच्या हजारो प्रती हाताने लिहिल्या गेल्या. त्या हस्तलिखितांमध्ये किंचीतही फरक नव्हता. हे थक्क करणारे आहे. (वस्तूसंग्रहालयांमध्ये आणि ग्रंथालयांमध्ये आजही या प्रती मोठ्या संख्येने उपलब्ध आहेत). कुरआनची परिपूर्णता टिकवून ठेवताना मुस्लिम असे दक्ष आणि संवेदनशील राहिले असतील, तर ते ईश्वराकडून मिळालेल्या विशेष मदतीमुळे.

याखेरीज या कार्यासाठी आणखी एक योजना होती जी ईश्वराकडून प्रेरित झालेली होती. ती योजना म्हणजे कुरआनचा सगळा मजकूर स्मरणात ठेवणे. कुरआनच्या बाबतीत ही पद्धत अमलात आणली गेली. अशी पद्धत जी मानवाच्या इतीहासात दुसया कुठल्याही ग्रंथासाठी पूर्वी अमलात आली नव्हती.

(ईश्वराकडून) प्रेरित झालेल्या हजारो लोकांना कुरआन सुरूवातीपासून शेवटपर्यंत तोंडपाठ होते. कुरआन अस्तित्वात आल्यापासून ते आजतागायत असे 'हाफिज' (संपूर्ण कुरआन तोंडपाठ असणारे लोक) प्रत्येक पिढीत निर्माण झाले. इतिहास असे सांगतो की, दुस-या कुठल्याही ग्रंथाच्या समर्थकांनी त्यातला मजकूर लक्षात ठेवण्यासाठी इतकी टोकाची

काळजी घेतली नव्हती. कुरआन तोंडपाठ करण्याच्या रिवाजामुळेच ते जतन करणे शक्य झाले. एका फ्रेंच पौर्वात्यशास्त्रज्ञाने या अद्वितीय व्यवस्थेचे वर्णन ‘दुहेरी तपासणी अशा शब्दात केले आहे. याचा अर्थ असा की आधी प्रत्येक प्रतीतल्या मजकुराची एकमेकांशी पडताळणी करायची आणि मग स्मरणशक्तीवरून त्याची फेरतपासणी करायची.

इस्लामच्या पंधराशे वर्षांच्या इतिहासात अंमलात आलेल्या कुरआनच्या संरक्षणाच्या प्रत्येक कृतीला ईश्वराकडून मदत मिळाली होती. परंतु, हे जग मानवाची परीक्षाभूमी बनून राहावी या हेतूने हे सगळे पडद्याआडून घडवले गेले (इथे घटनांना प्रवृत्त करणारा आणि लोकांना प्रेरित करणारा ईश्वर असला तरी, तो अदृश्य राहिला. कारण या जगात माणसाची कसोटी पाहिली जाते). निवाड्याच्या दिवशी सगळ्या वस्तुस्थिती उघड होतील. त्या दिवशी लोकांच्या लक्षात येईल की अगदी इस्लामिक क्रांतीच्या सुरुवातीपासून ते छपाई युगाच्या आगमनापर्यंत कुरआनच्या रक्षणाचे महान कार्य खुद्द ईश्वर थेटपणे पार पाडत होता. छपाईचे युग अवतरताच अत्याधुनिक पद्धतीने त्याच्या आवृत्या बनू लागल्या आणि ईश्वरी कुरआनच्या प्रसाराला चालना मिळाली.

कुरआनच्या चिरंतन सातत्यासाठीच्या विशेष ईश्वरी व्यवस्थेचा आणखी एक महत्वाचा पैलु आहे. ईश्वराला मुस्लिमांकडून फक्त कुरआनातल्या शब्दांच्या जतनाची अपेक्षा नसून, त्याहून महत्वाच्या त्यातल्या अर्थाच्या जतनाची अपेक्षा आहे. पूर्वीच्या ग्रंथधारकांची कसोटी त्यांच्या धर्मग्रंथांच्या नेमक्या शब्दरचना टिकवून सुरक्षित ठेवण्यात होती. पण मुस्लीम उम्मांहची खरी कसोटी आहे ती त्यांच्या धर्मग्रंथांचा अर्थ सुरक्षित ठेवण्याची. कुरआनवरचे भाष्य करताना जास्त भर देण्या-या गोष्टींमध्ये बदल होणार नाही याची सगळ्यात जास्त काळजी त्यांनी घेतलीच पाहिजे. कारण असा बदल पवित्र मजकुराची उद्दिष्टे बदलण्यासारखाच आहे. कुरआन इतरांसमोर पेश करताना त्यांनी त्यातली नेमकी ठाम मतेच सगळ्यांपर्यंत पोहोचवावीत. त्यात कमीजास्त होता कामा नये.

ग्रंथधारक म्हणून मुस्लिमांचे अपयश आहे ते कुरआनच्या आत्म्याचा विसर पडण्यात आणि मार्गदर्शनाचा ग्रंथ म्हणून त्याचा वापर करण्याऐवजी फक्त आशिर्वादाचा ग्रंथ म्हणून वापर करण्यात. मुस्लिमांची अधोगती या पायरीपर्यंत आली की, त्यांच्या कृती इस्लामच्या मूलभूत तत्त्वांपासून दूर वळतात. त्यांच्या धर्माचा, पवित्र ग्रंथाचा संदर्भ ते राष्ट्राभिमानाचा विषय म्हणून घेऊ लागतात. काहीजण इस्लामच्या नावाने दिखाऊपणात, बाह्य

गोष्टींमध्ये अडकून पडतात. आणखी काहीजण राजकीय फायद्यासाठी त्याचे शोषण करतात.

ही सगळी कृत्ये कुरआनच्या आणि इस्लामच्या नावाखाली स्वैर आनंद मिळवून देणारी असली तरी ती पवित्र तत्त्वांपासून विचलित झालेली, स्वतःकडून लांब गेलेली असतात. मुस्लिमांनी स्वतःला अशाच कृत्यांमध्ये गुंतवून ठेवले, तर ईश्वरी कोपातून त्यांची सुटका होणार नाही. कुरआनच्या शब्दांचे जतन करण्यात आपण कुठलीही कसूर ठेवलेली नाही या आधारावर आपल्याला माफी मिळेल या समाधानात ते असतील तर तो त्यांचा घोर गैरसमज आहे. मूळ अर्थ ओळखूही येणार नाही इतका कुरआनच्या अर्थाचा विपर्यास करण्याबद्दल ईश्वर त्यांना जबाबदार धरेल.

पूर्वीच्या ग्रंथधारकांना त्यांच्या धर्मग्रंथातील शब्दरचना बदलण्यसाठी धारेवर धरले गेले होते. मुस्लिमांनाही अशाच प्रकारे अर्थाचा अनर्थ करण्यासाठी समज दिली गेली आहे हे स्पष्टपणे लक्षात घेतले पाहिजे. या मुद्यावरून मुस्लिमांची कायम कसोटी बघितली जाते. मर्जीला येईल त्या आकलनातून कुरआनचा अर्थ बदलल्याबद्दल, ईश्वरी क्रोधापासून त्यांची सुटका होऊ शकणार.

वागण्याचे स्वातंत्र्य दिल्याशिवाय कुणाही माणसाची परीक्षा बघता येत नाही. मुस्लिमांना कुरआनचा अर्थ लावण्याचे स्वातंत्र्य आहे, पण त्यात फेरफार करण्याचे नाही. प्रत्येकाने हा मुद्दा निक्षून लक्षात घेतला पाहिजे की, इतर ग्रंथधारकांना ईश्वरी ग्रंथाचा मजकूर बदलण्यासाठी जी शिक्षा दिली गेली ती शिक्षा मुस्लिमांना त्या मजकुराचा अर्थ बदलण्यासाठी दिली जाईल. हा मुस्लिमांना जोखण्याचा मापदंड आहे. स्वतःला हव्या त्या आकलनानुसार त्यांनी पवित्र मजकुराचा अर्थ बदलला तर ईश्वराच्या शिक्षेतून त्यांना मोकळिक मिळणार नाही. प्रत्यक्ष शब्दात बदल केला नाही एवढ्याच कारणावरून त्यांना शिक्षेत सूट मिळणार नाही. आता, कुरआनच्या शब्दात बदल करायला मनाई केल्याने, मुस्लिम त्याचा अर्थ बदलू शकत नाहीत. याच मुद्यावरून त्यांना जाब विचारला जाईल.

शाश्वत सत्य :

ख्रिस्तपूर्व पंधराव्या शतकात इजिप्तमध्ये जन्मलेल्या मूसा या प्रेषितांना ईश्वराने आपला दूत म्हणून निवडले होते. त्याकाळी इजिप्तवर फिरऔन या राजघराण्याची राजवट होती. हे घराणे मूर्तीपूजक होते. या घराण्यातल्या दोन सम्राटांबरोबर प्रेषित मूसा यांची चकमक झाली. त्यापैकी एकाला ईश्वराने त्यांचा रक्षक म्हणून नेमले होते. जीवनकार्यासाठी संघर्ष करत असताना दुस-या सम्राटाची आणि त्यांची आमनेसामने गाठ पडली.

यानंतर फिरऔन सम्राटसमोर मूसा यांनी सत्याचा दैवी संदेश सादर केला, तेव्हा तो त्यांच्या विरोधात गेला. आपल्या प्रेषितत्वाचा सच्चेपणा सिद्ध करण्यासाठी मूसा प्रेषितांनी जादूने आपल्याकडची छडी सापात बदलून दाखवली. यावर फिरऔनचे म्हणणे होते की ती निव्वळ जादू होती आणि त्याचे लोकही असे हातचलाखीचे खेळ करू शकतात. यानंतर त्याने इजिप्तमधल्या सगळ्या जादूगारांना एका राष्ट्रीय उत्सवाच्या दिवशी एकत्र जमण्याचे आमंत्रण दिले. त्यांनी त्यांची श्रेष्ठ जादू दाखवावी आणि मूसा यांची जादू फिकी पाडावी हा त्यामागचा हेतू होता. ठरलेल्या दिवशी देशभरातले अतिशय विख्यात जादूगार राजदरबारात ठरल्यावेळी हजर झाले. प्रेषितांनी तिथे येऊन अशी काही जादूगिरी दाखवली की, त्यापुढे दरबारी जादूगारांची हातचलाखी निष्प्रभ ठरली. त्यावेळी मूसांनी फार महत्वाचे वक्तव्य केले. त्यातील काही भाग असा होता :

“तुम्ही जे केले ती फसवणूक होती. निःसंशय ईश्वर ती फोल ठरवेल. दुष्कृत्य करणा-यांना ईश्वर आशिर्वाद देत नाही. आपल्या शब्दसामर्थ्याने तो सत्याचे समर्थन करतो. दोषी असणा-यांना मात्र हे आवडत नाही.“

प्रेषित मूसांनी त्यावेळेस जे सांगितले ती प्रत्यक्षात ईश्वराच्या चिरंतन निवाड्याची घोषणा होती. वर्तमान जगात माणसाला स्वातंत्र्य दिलेले आहे, त्यावरून त्याची परीक्षा घेता येते. याचाच परिणाम म्हणून असत्याला माणसाची स्थिती बिघडवण्याची संधी मिळालेली आहे. पण खोटारडेपणा ही तात्पुरती स्थिती आहे. कारण आपल्या जगाची व्यवस्था इतकी परिपूर्ण आहे की ती असत्य फार काळ स्वीकारत नाही. काही काळानंतर, ती सगळा खोटेपणा नाकारते. फक्त आणि फक्त सत्यच चिरंतन राहू शकते.

ईश्वराचा हा कायदा प्राचीन काळीही व्यक्त झाला होता आणि तसाच आजही व्यक्त होतो आहे. याच कारणाने प्रेषित मूसांच्या कालखंडात त्यांना जादूचे वरदान देऊन फिरऔनच्या जादूगारांची फसवणूक ईश्वराने निष्प्रभ

ठरवली. सत्याने असत्यावर अंतिम विजय मिळवल्याचे हे अद्‌भुत प्रत्येक वेळेस त्याचे रूप वेगळे होते. हल्लीच्या काळात ईश्वराने मानवी ज्ञानात भर घातल्याने आणि विज्ञानात प्रगती झाल्याने दैवी सत्यावर कुणीही मात करू शकत नाही याची अंतिम सिद्धता शक्य झालेली आहे. कुरआनच्या प्रकटीकरणाबरोबर, पुढे घडणा-या घटना या भाषेत व्यक्त झालेल्या आहेत.

"पृथ्वीच्या कानाकोप-यात आणि खुद्द त्यांच्या अंतरंगात आम्ही आमचे संकेत देऊ. हे सत्य असल्याचे स्पष्टपणे कळेपर्यंत आम्ही हे करत राहू. तुमच्या स्वामीचे सगळ्या गोष्टींवर लक्ष असल्याचे यातून सिद्ध होत नाही का?" (कुरआन ४१:५३).

इब्ने कसीर या समीक्षकाने या आयतचा खुलासा अशा शब्दात केला आहे. "विवेकाच्या आणि तर्काच्या बाह्य मुद्यांच्या माध्यमातून लवकरच आम्ही कुरआनचे सत्य प्रत्यक्षात आणू" भावी पिढीच्या संदर्भातून कुरआनातल्या या आयतचे चिंतन होणे जरूरीचे आहे. हे ईश्वराचे बोल आहेत ज्याच्यासमोर फक्त त्या काळच्या पिढ्याच नव्हे, तर त्यांचे वंशजही ओळीने उभे होते.

ही आयत वर्तमान, भूत आणि भविष्य अशा तिन्ही काळातल्या लोकांना उद्देशून वापरली आहे. यातून अशी घोषणा केलेली आहे की, प्रकटलेल्या ज्ञानाच्या आधारे त्या काळी जे काही पेश केले गेले, त्याचा सच्चेपणा भविष्यात मानवी ज्ञानात झालेल्या विकासामुळेच सिद्ध केला जाईल. आज जो केवळ ठामपणे सांगण्याचा विषय आहे ती उद्याची वस्तुस्थिती असेल.

कुरआनची ही भविष्यवाणी पूर्ण अर्थाने सिद्ध झालेली आहे. प्राचीन काळी जादुगारांनी जादूच्या सहाय्याने सत्याचा प्रतिकार करताच ईश्वराने त्यांची जादू नष्ट करून टाकली. वर्तमान काळात सत्याचा कसलाही आधार नसताना निरीश्वरवादाचा पुरस्कार केला गेल्यावर, त्याच्या समर्थनाचे सगळे युक्तिवाद नष्ट करून टाकले. हे प्रत्येक कालखंडात घडत आले आहे. अर्थात ईश्वराचा शब्द, त्यातल्या खरेपणाला धक्का न लावता, येत्या संपूर्ण काळासाठी चिरंतन राहील हेच सत्य आहे.

THE QURAN

A book which brings glad tidings to mankind along with divine admonition, stresses the importance of man's discovery of truth on both spiritual and intellectual planes. The main themes of the Quran are enlightenment, closeness to God, peace and spirituality. The objective of the Quran is to make man aware of the Creation Plan of God.

Available in different languages
Easy to understand



Buy Online / Order Free Quran / Download / Be a Quran Distributor
www.goodwordbooks.com / www.j.mp/freequran4all

मौलाना वहीदुद्दीन खान यांच्या मराठी पुस्तकांचे भाषांतर











Born in 1925, in Azamgarh, Uttar Pradesh, is an Islamic spiritual scholar who is well-versed in both classical islamic learning and modern disciplines. The mission of his life has been the establishment of worldwide peace. He has received the Padma Bhushan, the Demiurgus Peace International Award and Sayyidina Imam-Al-Hassan Peace Award for promoting peace in Muslim societies. He has been called 'Islam's spiritual ambassador to the world and is recognized as one of it's most influential Muslims. His books have been translated into sixteen languages and are part of university curricula in six countries. He is the founder of the Centre for peace and Spirituality based in New Delhi.

हे पुस्तक खालील पत्त्यावर मिळेल : अब्दुर्रऊफ खतीब
चिपळूण
मोबा. नं.: 9850527037